# ज्ञानज्योत

२०२३–२४

नॅक ग्रेड B++ 3rd Cycle

शरीराला श्रमाकडे,
बुध्दीला मनाकडे,
आणि हृदयाला भावनेकडे
वळविणे म्हणजे शिक्षण ..!



अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे

## श्री ढोकेश्वर कॉलेज,टाकळी ढोकेश्वर


ता.पारनेर, जि. अहमदनगर – ४१४ ३०४ (महाराष्ट्र)

०२४८८–२९५३९५

- **Website :** www.shridhokeshwarcollege.org
- **Email :** tdcollege@gmail.com



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त, मा.सिताराम खिलारी (अण्णा) यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर




'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. व्ही.एस.काळे मंचावर उपस्थित संस्थेचे विश्वस्त मा.सिताराम खिलारी



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना प्राचार्य व मान्यवर



विज्ञान विभाग आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना संस्थेच्या खजिनदार मा.ॲड.दीपलक्ष्मी म्हसे पाटील व उपस्थित मान्यवर




छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त आयोजित व्याख्यान प्रसंगी प्रमुख अतिथी श्री. प्रवीण सोनवणे, व्यासपीठावर प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर




वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी उपस्थितांसमोर आपली कला सादर करताना हास्यसम्राट डी.गणेश व व्यासपीठावर उपस्थित मान्यवर

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे

## श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर

ता.पारनेर, जि. अहमदनगर - ४१४ ३०४ (महाराष्ट्र)

# ज्ञानज्योत

**२०२३-२४**

▪ संपादक ▪

प्राचार्य डॉ. रंगनाथ किसन आहेर

▪ कार्यकारी संपादक ▪

प्रा.श्री.लक्ष्मण भिकाजी कोठावळे

▪ संपादक मंडळ ▪

डॉ. विजय सुरोशी
प्रा. सोनाजी ठोंबे
डॉ. एकनाथ जाधव
प्रा. सविता पिंगट
प्रा. नामदेव वाल्हेकर
प्रा. तेजश्री उदावंत
प्रा. दादासाहेब लोखंडे
प्रा. श्रीकांत आल्हाट
श्री. बाळासाहेब गिरी

श्री ढोकेश्वर कॉलेज
टाकळी ढोकेश्वर
तेजोऽसि तेजो मे देहि ।

## वार्षिक नियतकालिक शैक्षणिक वर्ष २०२३-२४

### दि प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स नियम, ८ फॉर्म ४ प्रमाणे आवश्यक माहिती

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे<br>**श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर**<br>ता.पारनेर, जि. अहमदनगर - ४१४३०४ (महाराष्ट्र) |
| प्रकाशन काळ | : | वार्षिक |
| प्रकाशक व संपादक | : | **प्राचार्य डॉ. रंगनाथ किसन आहेर**<br>श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर<br>ता.पारनेर, जि. अहमदनगर<br>फोन : ०२४८८ - २९५३९५<br>ईमेल : tdcollege@gmail.com |
| कार्यकारी संपादक | : | **प्रा. लक्ष्मण भिकाजी कोठावळे** |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| मालकी | : | श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर<br>ता.पारनेर, जि. अहमदनगर |
| मुद्रक | : | प्रतिक प्रिंटर्स, अहमदनगर |
| फोटो सेटींग | : | एस.पी.क्रीएशन्स / ९५२७५८५९३० |
| मुखपृष्ठ | : | संपादक मंडळ निर्मीत |

---

मी प्राचार्य डॉ.रंगनाथ किसन आहेर असे जाहीर करतो की,
वर दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे.

सदर अंकात व्यक्त करण्यात आलेल्या साहित्यातील मतांशी संपादक मंडळ व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहमदनगर.

## - सन्माननिय पदाधिकारी -



मा. श्री. रामचंद्र हरिभाऊ दरे
अध्यक्ष



मा. डॉ. श्री. विवेक प्रभाकर भापकर
उपाध्यक्ष



मा. ॲड. श्री. विश्वासराव दत्तात्रय आठरे पा.
सचिव



मा. श्री. जयंत रामनाथ वाघ
सहसचिव



मा. ॲड. दिपलक्ष्मी संभाजीराव म्हसे
खजिनदार

## - विश्वस्त -



मा. डॉ. श्री. मोहनराव गंगाराम हापसे
विश्वस्त



मा. श्री. नंदकुमार भाऊसाहेब झावरे पा.
विश्वस्त



मा. श्री. गेणूजी दगडुजी खानदेशे
विश्वस्त



मा. श्री. सिताराम वि.खिलारी
विश्वस्त



मा. डॉ. श्री. चंद्रराव कृष्णराव मोरे
विश्वस्त



मा. श्री. मुकेशदादा मुळे
विश्वस्त

# भावपूर्ण श्रद्धांजली



अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे
माजी अध्यक्ष, विद्यमान कार्यकारणीतील ज्येष्ठ विश्वस्त, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी प्र.कुलगुरु
आणि शैक्षणिक क्षेत्रात अमूल्य योगदान देणारे ...

## प्राचार्य डॉ. मोहनराव गंगाराम हापसे (तात्या)

यांचे वार्धक्याने निधन झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य,
सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंद आणि विद्यार्थ्यांकडून

**भावपूर्ण श्रद्धांजली**

---

या शैक्षणिक वर्षात मायभूमीच्या रक्षणार्थ धारातिर्थी पडलेले शूरवीर,
साहित्यिक, विचारवंत, राजकारणी, शास्त्रज्ञ, गायक, संगीतकार,
अभिनेते, संस्थेतील व महाविद्यालयातील शिक्षक, सेवक, त्यांचे आप्तेष्ट,
संस्थेवर प्रेम करणारे स्नेही आणि नैसर्गिक आपत्तीत लोप पावलेले जे देशबांधव
दिवंगत झाले त्या सर्वांना 'ज्ञानज्योत' ची भावपूर्ण श्रद्धांजली





# प्राचार्यांचे मनोगत ...

प्रिय विद्यार्थी मित्रहो,

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील **'ज्ञानज्योत'** चा अंक आपल्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे. याचे महत्त्वाचे कारण असे की, भारत देशातील सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' (NEP) लागू झालेले आहे. या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये ज्ञान संपादन करणारा विद्यार्थीच जीवनामध्ये यशस्वी होणार आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी जगातील सर्वात मौल्यवान हिऱ्यापेक्षाही ज्ञानरुपी हिरा अधिक मौल्यवान आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. प्राचीन काळातील ऋषीमुनींनी सुध्दा अध्यात्म आणि विज्ञान या दोन ज्ञानशाखांच्या समन्वयातच मानवी समृद्धी सुखा-समाधानाने नांदू शकते हा सिद्धांत मांडलेला आहे. पारनेर तालुक्यामध्ये प्राचीन काळी पाराशर ऋषींनी गुरुकुल पद्धती निर्माण करुन 'पराशरगीता' व 'कृषीस्मरण' हे ग्रंथ लिहून कृषीसंस्कृती व ज्ञान संस्कृती विकसित केलेली आहे. त्याच पाराशरऋषींचे आपण सर्वजण वारसदार आहोत. हे विसरता कामा नये.

पारनेर तालुक्यामध्ये वारंवार पडणाऱ्या दुष्काळावर मात करण्यासाठी 'अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज' या संस्थेने १९९४ साली आदिवासी, डोंगरी भागातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे म्हणून 'श्री ढोकेश्वर कॉलेज' सुरु केले. आज या महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडणारे विद्यार्थी साहित्य, कला, क्रीडा, नोकरी, उद्योग, कृषी, देशसेवक, समाजसेवक व सुसंस्कृत नागरीक म्हणून समाजामध्ये विविध क्षेत्रांमध्ये काम करत आहेत याचा महाविद्यालयाला सार्थ अभिमान आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण अशा शारीरिक, बौद्धिक व नैतिक विकासासाठी महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, कमवा शिका योजना, प्लेसमेंट सेल, विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती सुविधा, व्याख्याने, राष्ट्रीय कार्यशाळा, सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा प्रकारातील खेळ यांसारखे उपक्रम वर्षभर राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व अक्षर वाङ्मयाला व्यासपीठ मिळावे म्हणून दरवर्षी **'ज्ञानज्योत'** अंकाची निर्मिती करण्यात येते. या अंकामध्ये नवीन शैक्षणिक धोरण, पर्यावरण, प्रदूषण, बळीराजा, युवा जागर, बदलती शिक्षण पद्धती, सेवा, समाजसुधारक, शिक्षण व मूल्यशिक्षण या विषयांवर विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण लेख लिहिलेले आहेत. या लेखांचे विद्यार्थी व पालक वर्ग नक्कीच स्वागत करतील असा मला विश्वास आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून महाविद्यालयात बी.एस्सी. (कॉम्प्युटर), एम.एस्सी. व एम.कॉम. हे वर्ग नव्याने सुरु करण्यात येत आहेत. त्यामुळे श्री ढोकेश्वर कॉलेज हे डोंगरी, आदिवासी भागातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना ज्ञानामृत पाजणारी कामधेनू ठरत आहे. यासाठी विद्यार्थ्यांना कवी मंगेश पाडगावकरांच्या कवितेच्या ओळी सतत प्रेरणादायी ठरतील.

**पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान ।**
**ज्ञान बनो कर्मशील कर्म ज्ञानवान ।।**
**जातीभेद, धर्मभेद, वंशभेद दूर ।**
**लाखलाख कंठातुनी हाच एक सूर ।।**
**करुणेच्या चरणाशी नत हो विज्ञान ।**
**ज्ञान बनो कर्मशील कर्म ज्ञानवान ..!**

हेच शिक्षण नवीन शैक्षणिक धोरणात अपेक्षित आहे. शेवटी पुनश्च एकदा महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे मनापासून स्वागत व हार्दिक अभिनंदन..!

**डॉ.रंगनाथ किसन आहेर**
**प्राचार्य**



# संपादकीय ...

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

'ज्ञानज्योत' हा २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील विशेषांक आपल्या हाती देताना विश्वसंत नामदेव महाराजांच्या अभंगाची आठवण होते. तो अभंग असा आहे की,

**बोलू ऐसे बोल । जेणे बोल विठ्ठल डोले ।।**

**नाचू किर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।**

या जगात ज्ञानाइतकी निर्मळ, पवित्र आणि सर्वश्रेष्ठ शक्ती दुसरी कोणतीही नाही. संत नामदेव महाराजांनी बाराव्या शतकात अज्ञानाच्या अंध:कारात चाचपडणाऱ्या दिशाहीन समाजाला कीर्तनाच्या माध्यमातून ज्ञानाचा प्रकाशमान दिवा माणुसकीच्या नात्याने जोडून विकृतीचा अंध:कार नष्ट करुन ज्ञानरुपी संस्कृतीचा दिवा प्रज्वलीत केला. कोणत्याही प्रकारची दळणवळणाची साधने नसताना हा दिवा पंजाब पर्यंत लावला गेला आणि माणसातून देवमाणूस, संतमाणूस घडविण्याचे महान कार्य केले. तशाच पद्धतीने कार्य नवीन शैक्षणिक धोरणामध्ये आपणा सर्वांना ज्ञान आणि विज्ञानाच्या माध्यमातून करावयाचे आहे. यासाठी आपण ''एकमेका सहाय्य करु । अवघे धरु सुपंथ'' या मार्गाने जावूया. नवीन शैक्षणिक धोरणाचे ज्ञान संपादन करुन एक सुसंस्कृत, आचार - विचार संपन्न नागरीक बनून भारतमातेला वैभवाच्या शिखरावर बसवू या आणि 'बलसागर भारत होवो विश्वात शोभूनी राहो' हे साने गुरुजींचे स्वप्न पुन्हा साकार होण्यासाठी कटिबद्ध होऊ या.

दरवर्षी विद्यार्थ्यांच्या साहित्यिक आणि कलागुणांना अक्षररुपात व्यक्त होण्यासाठी 'ज्ञानज्योत' या अंकाची निर्मिती करण्यात येते या अंकामध्ये नवीन शैक्षणिक धोरण, पर्यावरण, ग्रंथ हेच गुरु, सोशल मीडिया, सेवा, संस्कार, मध्ययुगीन शिक्षण प्रणाली, तंत्रज्ञान, नवीन शैक्षणिक धोरणासमोरील आव्हाने आणि उपाय यावर आधारित अभ्यासपूर्ण विद्यार्थ्यांच्या निवडक लेखांचा समावेश केलेला आहे. महाविद्यालयातील या विद्यार्थ्यांच्या बोबडिया बोलांचे विचारधन आपणास नक्कीच आवडेल असा मला विश्वास आहे.

'ज्ञानज्योत' या वार्षिक अंकाचा ज्ञानयज्ञ पूर्ण करण्यासाठी मी केवळ निमित्त मात्र आहे. हे सारे आपल्यापर्यंत पोहोचविण्यासाठी अनेकांचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभलेले आहे. यामध्ये मा.संस्था पदाधिकारी, विश्वस्त, सदस्य, सभासद, महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व शाखाप्रमुख, विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवकवृंद, विद्यार्थी या सर्वांचे मनापासून मी आभार आणि ऋण व्यक्त करतो.

'ज्ञानज्योत' चे संपादक मंडळ आणि प्रतिक प्रिंटर्स, अहमदनगर यांनी वेळेत अंक तयार केला म्हणून त्यांचाही मी आभारी आहे. समारोपाच्या शेवटी विश्वसंत ज्ञानेश्वर माऊलींच्या माय मराठी भाषेत म्हणावेसे वाटते की,

**किंबहुना तुमचे केले । धर्मकीर्तन हे सिद्धी गेले ।**

**येथ माझे जी उरले । पाईकपण ।। (१८.१७९२)**

**प्रा. लक्ष्मण कोठावळे** (विद्यापती)
**कार्यकारी संपादक**

# ।। अभिनंदनीय ।।



**प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा
'उत्कृष्ठ प्राचार्य' पुरस्कार प्राप्त



**प्रा. लक्ष्मण कोठावळे**
राज्यस्तरीय उत्कृष्ठ मराठी अध्यापन
सेवा 'कार्यगौरव पुरस्कार' प्राप्त



**प्रा. प्रतीक प्रकाश माने**
मुंबई महानगरपालिका
शिक्षकपदी निवड



**डॉ. जिजाभाऊ घुले**
मास्टर ऑफ जर्नलिझम
(प्रिंट मिडीया)



**प्रा. रोहिणी चेमटे**
सातारा जि.प.च्या
शिक्षकपदी निवड

# ।। यशवंत - गुणवंत ।।

## ✻ कला शाखा ✻



**कु. शिवानी पाखरे**
प्रथम वर्ष कला - प्रथम



**कु. शुभांगी उमाप**
प्रथम वर्ष कला - द्वितीय



**कु. काजल ठाणगे**
प्रथम वर्ष कला - तृतीय



**कु. कविता नरवडे**
द्वितीय वर्ष कला - प्रथम



**कु. सोनाली भांबेरे**
द्वितीय वर्ष कला - द्वितीय



**कु. वृषाली पानसरे**
द्वितीय वर्ष कला - तृतीय



**कु. रत्ना अहिरे**
तृतीय वर्ष कला - प्रथम



**कु. पुजा साठे**
तृतीय वर्ष कला - द्वितीय



**सचिन कोळेकर**
तृतीय वर्ष कला - तृतीय

# ।। यशवंत - गुणवंत ।।

## * वाणिज्य शाखा *



कु. शुभांगी गोडसे
प्रथम वर्ष वाणिज्य - प्रथम



किशोर औटी
प्रथम वर्ष वाणिज्य - द्वितीय



कु. शुभांगी केदारी
प्रथम वर्ष वाणिज्य - तृतीय



कु. तनुजा नरड
द्वितीय वर्ष वाणिज्य - प्रथम



यश झावरे
द्वितीय वर्ष वाणिज्य - द्वितीय



कु. पायल घनवट
द्वितीय वर्ष वाणिज्य - तृतीय



कु. पुजा शिंदे
द्वितीय वर्ष वाणिज्य - तृतीय



कु. प्रियंका गोरडे
तृतीय वर्ष वाणिज्य - प्रथम



अभिषेक आंधळे
तृतीय वर्ष वाणिज्य - द्वितीय



कु. पुजा देशमाने
तृतीय वर्ष वाणिज्य - तृतीय

# ।। यशवंत - गुणवंत ।।

## * विज्ञान शाखा *



कु. काईनात खान
प्रथम वर्ष विज्ञान - प्रथम



सुयोग गाजरे
प्रथम वर्ष विज्ञान - द्वितीय



कु. अक्षदा कांगुणे
प्रथम वर्ष विज्ञान - तृतीय



कु. अंकिता वाळुंज
द्वितीय वर्ष विज्ञान - प्रथम



कु. सोनाली भुतांबरे
द्वितीय वर्ष विज्ञान - द्वितीय



कु. सायली वाळुंज
द्वितीय वर्ष विज्ञान - तृतीय



कु. वैष्णवी झावरे
तृतीय वर्ष विज्ञान - प्रथम



कु. पल्लवी वाळुंज
तृतीय वर्ष विज्ञान - द्वितीय



कु. निकिता माने
तृतीय वर्ष विज्ञान - तृतीय

## ।। यशवंत - जिमखाना विभाग ।।



अतिषकुमार पंडित
आंतर विभागीय बॉक्सींग, सायकलिंग, वेटलिफ्टिंग स्पर्धेत सहभाग



संदेश झावरे
आंतर विभागीय सायकलिंग स्पर्धेत सहभाग



कु. श्रद्धा ठाणगे
आंतर विभागीय सायकलिंग स्पर्धेत सहभाग



सार्थक वाळुंज
आंतर विभागीय कुस्ती स्पर्धेत ब्रांझ मेडल प्राप्त



रोशन भोसले
आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत ब्रांझ मेडल प्राप्त



महेश खोडदे
आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धेत ब्रांझ मेडल प्राप्त



अर्जुन मंचरे
आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धेत ब्रांझ मेडल प्राप्त



गणेश मंचरे
आंतरमहाविद्यालयीन बॉक्सींग स्पर्धेत सहभाग



कु. सेजल वाळुंज
आंतरमहाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धेत सहभाग



कु. पुजा शिंदे
आंतरमहाविद्यालयीन बुद्धीबळ स्पर्धेत सहभाग



कु. सोनाली भुतांबरे
आंतरमहाविद्यालयीन बुद्धीबळ स्पर्धेत सहभाग

# शैक्षणिक उपक्रम : रा.से.यो.



राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब आयोजित
जनजागृती व्याख्यान



रा.से.यो. विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या समारोप प्रसंगी
मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे श्री. तारकाराम झावरे व उपस्थित



कार्यशाळा उद्‌घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना
डॉ. बाळासाहेब सागडे तसेच उपस्थित विद्यार्थी, मान्यवर




राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित नदी संवर्धन व स्वच्छता
उपक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर



रा.से.यो. विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या समारोप प्रसंगी मार्गदर्शन
करताना तिखोल गावचे सरपंच मा. संदीप ठाणगे व उपस्थित मान्यवर



राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या नदी संवर्धन कार्यशाळेअंतर्गत
नदीची स्वच्छता करताना स्वयंसेवक



राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबीरात
श्रमदान करताना शिबीरार्थी स्वयंसेवक



राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबीरात
श्रमदान करताना शिबीरार्थी स्वयंसेवक

# शैक्षणिक उपक्रम : कार्यशाळा




मानव अधिकार कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना
प्रा. लक्ष्मण कोठावळे तसेच मंचावर उपस्थित मान्यवर




राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कार्यशाळेत मत व्यक्त करताना
एक सहभागी प्राध्यापिका स्वाती फापाळे




मानव अधिकार कार्यशाळेत मनोगत व्यक्त करताना
डॉ. भाऊसाहेब खिलारी तसेच मंचावर उपस्थित मान्यवर



मानव अधिकार कार्यशाळा प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन
करताना ॲड. वैभव लोंढे तसेच उपस्थित मान्यवर



'पुष्परचना' कार्यशाळेत सहभागी झालेले विद्यार्थी व
सहभागी विद्यार्थ्यांनी बनविलेले विविध पुष्पगुच्छ




राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आयोजित केलेल्या
नदी संवर्धन कार्यशाळा प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. अरुण नरसाळे




राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आयोजित केलेल्या
नदी संवर्धन कार्यशाळेप्रसंगी मान्यवरांचे आभार प्रदर्शन
करताना प्रा. नामदेव वाल्हेकर



राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित
'मतदार जनजागृती' कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन
करताना मा. प्रांताधिकारी व उपस्थित

# वार्षिक स्नेहसंमेलन व इतर उपक्रम



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी महाविद्यालयास संविधानाची उद्देशिका भेट देताना ग्रामपंचायत सदस्य बापूसाहेब रांधवण, संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी व इतर मान्यवर




वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी उपस्थितांसमोर आपली कला सादर करताना हास्य सम्राट डी. गणेश (मुंबई)



वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात फुड फेस्टिवलचा आनंद घेताना प्रमुख पाहुणे, महाविद्यालयाचे प्राचार्य व इतर मान्यवर




वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये आपली कला सादर करताना सहभागी महाविद्यालयीन विद्यार्थीनी




वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये समुहनृत्य सादर करताना महाविद्यालयीन विद्यार्थीनी




वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये लोककला सादर करताना सहभागी महाविद्यालयीन विद्यार्थी एक क्षण



'मराठी भाषा गौरव दिन' प्रसंगी ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन उद्घाटन करताना आनंदसिंधू वृद्धाश्रमाचे संस्थापक मा. विलास महाराज लोंढे प्राचार्य व मान्यवर



महाविद्यालयात आयोजित 'फुड फेस्टिवल' मध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या पदार्थांचा आस्वाद घेताना प्राचार्य तसेच उपस्थित मान्यवर

# शैक्षणिक उपक्रम : क्रीडा, एन.सी.सी. व इतर



आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेतील एक चुरशीचा क्षण




आंतर महाविद्यालयीन पॉवर लिफ्टिंग व शरीरसौष्ठव स्पर्धेत महाविद्यालयाचा सहभागी विद्यार्थी अर्जुन मंचरे



आंतरमहाविद्यालयीन सायकलिंग स्पर्धेचे उद्घाटन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर व उपस्थित मान्यवर



आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेतील एक चुरशीचा क्षण




राष्ट्रीय छात्र सेना (NCC) विभाग आयोजित 'माझी आई माझ्या महाविद्यालयात' या कार्यक्रमात आपल्या आईचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना विद्यार्थी




राष्ट्रीय छात्र सेना (NCC) विभाग आयोजित कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर विद्यार्थ्याला प्रमाणपत्र प्रदान करताना तसेच उपस्थित मान्यवर



'आंतरराष्ट्रीय एड्स दिन' कार्यक्रमात रॅलीमध्ये डॉ. वाळूंज, प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर,प्राध्यापक तसेच विद्यार्थी



महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची विविध ठिकाणी नोकरीसाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर, उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापक वृंद

# विविध शैक्षणिक उपक्रम



विज्ञान विभाग आयोजित कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करताना प्रमुख पाहुणे डॉ. दिलीप ठुबे व उपस्थित मान्यवर



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख वक्ते प्रा.डॉ. व्ही.एस.राऊत



विज्ञान विभाग आयोजित शैक्षणिक सहल कोल्हापूर भेट प्रसंगी छत्रपती शाहू महाराज राजवाडा, कोल्हापूर



विज्ञान विभाग आयोजित 'पालक मेळावा' या कार्यक्रमप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन व प्रबोधन करताना पालक व उपस्थित मान्यवर



वाणिज्य विभाग आयोजित 'आत्मनिर्भर करिअर ऑप्शन्स इन अकाऊंटस् ॲण्ड टेक्सेशन' या कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना सी.ए. राजेंद्र डांगी



वाणिज्य विभाग आयोजित 'करिअर कौन्सलिंग प्रोग्राम' या कार्यक्रमात उपस्थितांना आभार मानताना प्रा. पिंगट एस.पी.



संविधान दिनानिमित्त संविधानाची शपथ देताना उपप्राचार्य विरेंद्र धनशेट्टी व विद्यार्थी



राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित 'रांगोळी स्पर्धा' चे निरीक्षण करताना परीक्षक व मान्यवर

# शैक्षणिक उपक्रम : क्षणचित्रे



'मेरी माटी - मेरा देश' कार्यक्रमांतर्गत मातीचे संकलन करण्यासाठी कलशाचे पूजन व उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर



'भूगोल विषयातील करिअरच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. घुंगार्डे दत्तात्रय तसेच भूगोल विभाग प्रमुख डॉ. विजय सुरोशी व प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर



महाविद्यालयात नव्याने प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ



महाविद्यालयामध्ये वृक्षारोपण करताना 'केईएम हॉस्पिटल' चे डॉक्टर बाळासाहेब बांडे, प्राचार्य, प्राध्यापक वृंद

## विशेष अभिनंदन : कॅम्पस् इंटरव्ह्यु मधुन विविध पदांवर निवड



**Chedhe Sanket**
Klassic Wheels
Pvt. Ltd.



**Dhole Pravin**
Klassic Wheels
Pvt. Ltd.



**Repale Saurabh**
Klassic Wheels
Pvt. Ltd.



**Shaikh Abhujar**
Klassic Wheel
Pvt. Ltd 1



**Salve Dayasagar**
Klassic Wheels
Pvt. Ltd.



**Pawade Pranay**
Indian Army



**Gaikwad Darshan**
Indian Army



**Pratik Khandake,**
Indian Army



**Bhambere Sonali**
Police, Meera
Bhaindar, Mumbai



**Deshmukh Rutuja**
HDB Finance Pvt. Ltd.



**Shinde Santosh**
Prison Dept.
Govt. of MH



**Dhus Manoj**
Samarth college of
Computer science



**Awate Saurabh**
Excise Sub inspector,
Dhule



**Waghunde Pravin**
Health Department,
Govt. of Maharashtra



**Gayatri Thube**
Qualified in
C.A.Intermediate
Exam



**Chemate Rohini,**
Graduate Teacher



**Rohokale Arjun**
Graduate Teacher



**Mane Pratik**
Mumbai MNP,
Graduate Teacher



**Phapale priyanka**
Dhole Patil Jr.
College



**Bhand Prashant**
Homi Bhabha
Research Center

# विशेष अभिनंदन : कॅम्पस् इंटरव्ह्यु मधुन विविध पदांवर निवड


Rokade Rohini
Indian Navy


Khodade Pradip
Indian Navy


Walunj Milind
Indian Army


Kalamkar Viraj
Indian Army


More Nikhil
Indian Army Police


Kharmale sonali
Maharashtra Police


Bhaik Sushma
Maharashtra Police


Chikane Snehal
Maharashtra Police


Shinde Punam
Maharashtra Police


Rohokale Pratiksha
Fire Brigade, Mumbai


Khandale Vrushali
Fire Brigade, Mumbai


Dhanashree Vyavahare
HDB Finance


Pallavi Narad
HDB Finance


Sarode Sumedh
HDB Finance


Chemate Vishal
Exide Battery


Auti Abhishekh
Exide Battery


Bande Sanket
Exide Battery


Gaykhe Suhas
Exide Battery


Satkar Mayur
Exide Battery


Salunke Pratiksha
Post Office


Rajguru Chitra
Maharashtra Police


Panmand Priyanka
Maharashtra Police


Suyog Rokade
Indian Navy


Gayakhe Pramod
Maharashtra Police


Ghule Kiran
Maharashtra Police


Pallavi Bhaik
Maharashtra Police


Abhang Supriya
Maharashtra Police


Jadhav Ashwini
Maharashtra Police

सर्व यशवंत आणि गुणवंताचे हार्दिक अभिनंदन
व पुढील वाटचालीस शुभेच्छा

# अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज,

लालटाकी रोड, अहमदनगर - ४१४ ००१.

## कार्यकारी मंडळ

| अ.नं. | नांव | पद |
|---|---|---|
| १. | मा. श्री. रामचंद्र हरिभाऊ दरे | अध्यक्ष |
| २. | मा. डॉ. विवेक प्रभाकर भापकर | उपाध्यक्ष |
| ३. | मा. ॲड. विश्वासराव दत्तात्रय आठरे | सचिव |
| ४. | मा. श्री. जयंत रामनाथ वाघ | सहसचिव |
| ५. | मा. ॲड. दीपलक्ष्मी संभाजीराव म्हसे | खजिनदार |
| ६. | मा. डॉ. मोहनराव गंगाराम हापसे | विश्वस्त |
| ७. | मा. श्री. नंदकुमार भाऊसाहेब झावरे पाटील | विश्वस्त |
| ८. | मा. श्री. गेणूजी दगडूजी खानदेशे | विश्वस्त |
| ९. | मा. श्री. सीताराम विठ्ठलराव खिलारी | विश्वस्त |
| १०. | मा. डॉ. चंद्रराव कृष्णराव मोरे | विश्वस्त |
| ११. | मा. श्री. मुकेश माधवराव मुळे | विश्वस्त |
| १२. | मा. ॲड. माणिकराव नामदेवराव मोरे | सदस्य |
| १३. | मा. प्रा. अर्जुनराव तात्याभाऊ पोकळे | सदस्य |
| १४. | मा. सौ. अरुणा अशोकराव काळे | सदस्या |
| १५. | मा. डॉ. अभय गेणूजी खानदेशे | सदस्य |
| १६. | डॉ. बाळकृष्ण देवराम मरकड | सदस्य |
| १७. | श्री. दिपक रामचंद्र दरे | सदस्य |
| १८. | श्री. शंतनू मोहनराव हापसे | सदस्य |
| १९. | श्री. राजेंद्र चंद्रराव मोरे | सदस्य |
| २०. | श्री. भाऊसाहेब सीताराम खिलारी | सदस्य |
| २१. | डॉ. बाळासाहेब बबनराव सागडे | सेवक स्विकृत सदस्य |
| २२. | श्री. संजय रामचंद्र म्हस्के | सेवक स्विकृत सदस्य |



# अंतरंग ...

मराठी विभाग ..

हिंदी विभाग ..

विभागीय अहवाल ..



# मराठी विभाग

आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ।
शब्दांचीच शस्त्रे यत्न करु ।।१।।
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन ।
शब्द वाटू धन जन लोका ।।२।।
तुका म्हणे पहा शब्दचि हा देव ।
शब्दचि गौरव पूजा करु ।।३।।

- संत तुकाराम

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|---|
| १. | सेवा | वैष्णवी जयराम खैरे |
| २. | श्रीराम मंदीराचा इतिहास | दर्शन ईश्वर गायकवाड |
| ३. | मानवी संस्कृती व पुराणातील नैतिकतत्त्वे | प्रतिक बबन खांडके |
| ४. | भारतातील बदलती शिक्षण व्यवस्था आणि आजचा विद्यार्थी | उत्कर्षा राजेंद्र लोंढे |
| ५. | पर्यावरण संरक्षण काळाची गरज | विशाल वाळुंज |
| ६. | संत गाडगेबाबा | रेश्मा नारायण चव्हाण |
| ७. | छत्रपती शाहू महाराज | नवनाथ विलास भागवत |
| ८. | महात्मा गांधी | प्रणिता विश्वनाथ शिंदे |
| ९. | लोकमान्य टिळक | पायल नवनाथ खोडदे |
| १०. | आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे रहस्य उलगडणे : भविष्यातील प्रवास | खान कायनात व महामुनी शीतल |
| ११. | आनंद द्विगुणीत करा | प्रा.डॉ.सुदाम वीर |
| १२. | आनंद | आरती ज्ञानदेव गायके |
| १३. | युवा जागर | आरती पवार |
| १४. | नवीन शैक्षणिक धोरण आणि संत तुकारामाची शिकवण | आदेश पिराजी नवले |
| १५. | प्रवचन | सुजाता सुरेश कोठावळे |
| १६. | समाजमाध्यमे आणि भारतीय समाज | पुजा शिवाजी गुंड |
| १७. | सोशल मिडियातील वाचन संस्कृती | विश्वम दिपक बांडे |
| १८. | पारनेर भूषण डॉ.बाबा आढाव | तेजश्री बाळू घोलप |
| १९. | ग्रंथ हेच गुरु | सोनाली धनंजय भुतांबरे |
| २०. | पर्यावरण संतुलन | वैष्णवी बाळासाहेब बोऱ्हुडे |
| २१. | पार | विशाल अशोक चव्हाण |
| २२. | शिक्षण काल आणि आज | आकांक्षा गोरख गोरडे |
| २३. | ग्रंथ देवो भव | प्रेम बाळासाहेब सोनवणे |
| २४. | पर्यावरण संवर्धन काळाची गरज | सायली भाऊसाहेब वाळुंज |
| २५. | बळीराजा बोलतोय | राहुल जबाजी शिंदे |

# सेवा

जे ज्ञानाचा कुरुटा । तेथ सेवा हा दारवंटा
स्वाधीन करी सुभटा । ओळगोनी ।।

वरील ओवीत विश्वसंत ज्ञानेश्वर माऊली सेवेची व्याख्या सांगतात ज्ञानरुपी घराचा उंबरठा म्हणजे सेवा आहे. सेवा ही परमार्थ व समाजसेवेचे प्रवेशद्वार आहे अशा सेवेचे सर्वसाधारण सात प्रकार आहेत.

१) **देहसेवक –** काही माणसे फक्त आपल्या देहाची सेवा करतात. खावे, प्यावे मजा करावी या विचाराचे ते असतात दुसऱ्यांचा ते विचार करत नाहीत परंतु ही सेवा समाजमान्य ठरत नाही.

२) **प्रपंच सेवक –** यालाच कुटूंबसेवक असे म्हणतात हा पहिल्यापेक्षा बरा असतो निदान घरातील आई–वडील, पत्नी, मुले यांची तो सेवा करतो.

३) **लक्ष्मी सेवक –** हा रात्रंदिवस लक्ष्मी म्हणजे पैसा कमविण्याच्या विचारात दंग असतो. पैसा हे जीवन जगण्याचे साधन आहे असे समजतो पैसा म्हणजे माणसापेक्षा महत्त्वाचा आहे असे त्याला वाटते.

४) **समाजसेवक –** आपल्या गावातील गरीब लोकांच्या मुलांच्या शिक्षणाची सेवा करावी समाजाच्या कल्याणासाठी आयुष्य खर्च करावे हा चांगला विचार अशा माणसांच्या मनात येतो व तशी ते कृतीही करतात ही सेवा करत असताना त्यांना मेवाही मिळत असतो यामध्ये गावचे सरपंच, तालुक्याचे आमदार, जिल्ह्याचे खासदार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, देशाचे पंतप्रधान ही माणसे समाजसेवाच करत असतात पण त्यांना मेवा मिळत असतो.

५) **देशसेवक –** म.गांधी, लो.टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, साने गुरुजी, अण्णासाहेब हजारे यासारख्या लोकांच्या देहात आणि मनात देशप्रेम असते. मातृभूमीची सेवा करता करता हा देह झिजावा म्हणून ते देशसेवा करतात.

तुजसाठी मरण ते जनन
तुजविण जनन ते मरण

हा भाव त्यांच्या मनामध्ये असतो आपल्या भारतमातेची सेवा करणारे सर्वश्रेष्ठ देशसेवक आहेत.

हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।१।।

परमेश्वर सेवेत आयुष्य जावे यासाठी ते परमेश्वराला प्रार्थना करतात.

धन्य आम्ही जन्मा आलो ।
दास विठोबाचे झालो ।।

अशा या भक्तांचा भाव असतो प्रपंच करता असताना सावता महाराज, नामदेव महाराज, संत एकनाथ महाराज, संत तुकाराम महाराज, संत निळोबाराय महाराज देवाचीच सेवा करता होते.

७) **संत सेवक –** संतांची सेवा करणारे ते संत सेवक माणसाने संसाराचा दास होण्यापेक्षा संत सेवेचा दास व्हावे संतांची सेवा करावी म्हणजे संत जसे वागतात तसे वागावे जीवनात दया, क्षमा, शांती असावी.

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ।
भेदाभेद भ्रम अमंगळ ।।

या वचनाप्रमाणे वागणे ही खरी संतांची सेवा आहे.

**संत सेवेचे पाच प्रकार :–**

१) **संतांची सेवा –** संतांची सेवा म्हणजे देवाची सेवा आहे कारण संत म्हणजे देवाचेच रुप आहे.

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।।
तोचि साधु । ओळखावा देव तेथेची जाणावा ।।

२) **संतांची सेवा –** संत ज्ञानेश्वर महाराज ते संत निळोबाराय महाराजापर्यंतचे सर्व संत यांनी जगाच्या कल्याणासाठी देह झिजविला त्यांची सेवा करावी कराण संत हे मायबाप आहेत.

३) **संतांची सेवा –** संतांची सेवा म्हणजे गुरुजी सेवा आहे कारण

ज्ञानियांचा गुरु राजा महाराज ।
म्हणती ज्ञानदेव तुम्हा ऐसे ।।

असा आदरभाव संत तुकाराम महाराजांनी संत ज्ञानदेवांबद्दल प्रकट केला आहे.

**४) संतांची सेवा –** संत हे ज्ञानमूर्ती आहेत ज्ञानदेव म्हणजे ज्ञानाचा ईश्वर ज्ञानेश्वरी ग्रंथ म्हणजे वाङ्मयातील ज्ञानमूर्ती आहे.

गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी ।
ब्रह्मानंद लहरी प्रकट केली ।।

असा गौरव उद्गार ज्ञानदेवांबद्दल नामदेव महाराजांनी काढलेला आहे.

**५) संतांची सेवा –** संतांची सेवा म्हणजे आई–वडिलांची सेवा आहे संत हे मायबाप आहेत. संत एकनाथ महाराज म्हणतात.

सर्व सुखाची लहरी । ज्ञानाबाई अलंकापुरी ।।
वेदशास्त्र देती ग्वाही । म्हणती ज्ञानाबाई आई ।।

**रामायणातील सेवा –** भारतीय संस्कृतीचा प्राचीन ग्रंथ म्हणजे महर्षी वाल्मिक ऋषींचा 'रामायण' ग्रंथ आहे या ग्रंथामध्ये सेवेचे ९ प्रकार सांगितले आहेत.

१) श्रीरामाची सेवा करणारे हनुमंत आहेत. हनुमंतांने सीता शोध लावला अहि–महि रावणाकडून श्रीराम लक्ष्मणास सोडविले, वानरांना श्रीराम दर्शन घडविले, लक्ष्मणासाठी द्रोणगिरी आणिला, सीतामातेस रामदर्शन घडविले, भरतास नंदीग्रामी श्रीराम आगमनाची वार्ता सांगितली.

२) श्रीरामाच्या सेवेचे फलित हनुमंताच्या ह्र्दयातील श्रीरामदर्शन.

३) ब्रह्मदेवाने जांबुवंताच्या रुपात श्रीरामाची सेवा केली.

४) आदिशक्ती सीतामाता होऊन श्रीरामाची सेवा केली.

५) शेषाने लक्ष्मण होऊन श्रीरामाची सेवा केली.

६) शंख व चक्र हे भरत व शत्रुघ्न होऊन श्रीरामाची सेवा केली.

७) इंद्राने वालीचे रुप घेऊन श्रीरामाची सेवा केली.

८) सूर्याने सुग्रीव होऊन श्रीरामाची सेवा केली.

९) सर्व भक्तांनी वानरांची रुपे घेऊन श्रीरामाची सेवा केली.

शेवटी सेवेचे सार एवढेच आहे.
खरा तो एकची धर्म । जगाला प्रेम अर्पावे ।।

**खैरे वैष्णवी जयराम**
टी.वाय.बी.ए. (मराठी)

## श्रीराम मंदिराचा इतिहास



अयोध्येतील श्रीराम मंदिराचा इतिहास हिंदू पौराणिक कथा आणि पौराणिक कथांमध्ये खोलवर रुजलेला आहे, त्याचे मूळ प्राचीन काळापर्यंत आहे. मंदीराची कथा हिंदू धर्मातील एक महत्त्वपूर्ण देवता आणि रामायणातील महाकाव्य कथा भगवान राम यांच्या पूजनीय आकृतीभोवती फिरते. पौराणिक घटक आणि सांस्कृतिक महत्त्व असलेल्या या कथनाने शतकानुशतके कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धा आणि भावनांना आकार देण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

**पौराणिक पाया :–** श्रीराम मंदिराची पौराणिक मुळे रामायणात सापडतात, वाल्मिकी ऋषींना श्रेय दिलेले एक प्राचीन हिंदू महाकाव्य, रामायण भगवान विष्णूचा सातवा अवतार, भगवान राम यांचे जीवन आणि साहसांचे वर्णन करते. हिंदू पौराणिक कथेनुसार, भगवान रामाचा जन्म अयोध्येत राजा दशरथ आणि राणी कौशल्या यांच्या पोटी झाला. महाकाव्याची सुरुवात राम आणि त्याचे तीन भाऊ भरत, लक्ष्मण आणि शत्रुघ्न यांच्या दिव्य जन्मापासून होते. रामाच्या आयुष्याची सुरुवातीची वर्षे लक्ष्मीचा अवतार असलेल्या सीतेशी त्यांचा विवाह झाला होता. तथापि, त्याची सावत्र आई कैकेयीच्या योजनांमुळे रामाचे वनात

गमन झाले. राक्षस राजा रावणाच्या विरुद्ध पौराणिक युध्दाकडे नेणाऱ्या घटनांची मालिका चालू करते.

रामायणाचा मध्य भाग, ज्याला ''रामायण युद्ध'' किंवा लंकेची लढाई म्हणून ओळखले जाते, रामाचा रावणावर विजय आणि सीतेची सुटका करण्यात आली. अयोध्येला विजयी होऊन परत आल्यानंतर, रामाचा राजा म्हणून राज्याभिषेक करण्यात आला, जो आदर्श शासन ''रामराज्य'' म्हणून ओळखला जातो. रामायणाच्या कथेत कर्तव्य, नीतिमत्ता आणि वाईटावर चांगल्याचा विजय या विषयांचा समावेश आहे.

**अयोध्या हे पवित्र निवासस्थान आहे.** भगवान रामाचे जन्मस्थान असलेल्या अयोध्येला हिंदू परंपरेत खूप महत्व आहे. हे शहर धर्माचे (धार्मिकतेचे) प्रतीक आणि आदर्श राज्याचे प्रतीक म्हणून चित्रित केले आहे. अयोध्या हे भगवान रामाचे दैवी निवासस्थान आहे हा विश्वास पिढ्यानपिढ्या पसरला आहे, ज्यामुळे हिंदूसाठी एक खोल भावनिक आणि आध्यात्मिक संबंध वाढला आहे.

रामायणात अयोध्येचे वर्णन भव्य राजवाडे, हिरवीगार बागा आणि उदात्त नागरिकांनी सुशोभित केलेले भव्य शहर असे केले आहे. कथा रामाच्या शासनाखालील युरोपियन समाजाचे एक ज्वलंत चित्र रंगवते, न्याय, सद्गुण आणि करुणा या तत्त्वांवर जोर देते. भगवान रामाच्या जन्मासह अयोध्येचा संबंध दैवाशी जोडू इच्छिणाऱ्या भक्तांसाठी शहराला एक पवित्र तीर्थक्षेत्र बनवते.

**जन्मभूमी आणि बाबरी मशीद :–**''जन्मभूमी'' या शब्दाचा संस्कृतमध्ये ''जन्मभूमी'' असा अनुवाद होतो आणि अयोध्येच्या जन्मभूमीला रामायणाच्या कथेत मध्यवर्ती स्थान आहे. परंपरेने अयोध्येतील नेमके ठिकाण ओळखले जाते जेथे रामाचा जन्म पवित्र जन्मभूमी म्हणून झाला असे मानले जाते. भक्त हे स्थान विशेषत: शुभ मानतात आणि नंतरच्या शतकांमध्ये हे महत्त्वपूर्ण ऐतिहासिक आणि धार्मिक विवादाचे केंद्रबिंदू बनले.

मुघलांच्या काळात अयोध्येतील बाबरी मशिदीच्या बांधकामाभोवती हा वाद फिरतो. ऐतिहासिक माहितीनुसार, ही मशीद १६ व्या शतकात मुघल सम्राट बाबरचा सेनापती मीर बाकी याने बांधली होती. रामायणात रुजलेली स्थानिक हिंदू श्रद्धा, भगवान रामाचे जन्मस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जागेवरच मशीद बांधली गेली असे प्रतिपादन करते.

जन्मभूमी वरील परस्परविरोधी दाव्यांमुळे शतकानुशतके सुरु असलेल्या तणाव आणि वादांना जन्म दिला. मशीद धार्मिक आणि सांस्कृतिक सहअस्तित्वाचे प्रतीक म्हणून उभी राहिली परंतु विशेषत: आधुनिक युगात ती वादाचे कारण बनली.

**ऐतिहासिक दृष्टीकोन :–** प्रवासी आणि विद्वानांच्या ऐतिहासिक नोंदी आणि खाती अयोध्येतील जन्मभूमीच्या सभोवतालच्या विकसित कथेची झलक देतात. इंग्रज प्रवासी विल्यम फिंचने १६११ मध्ये अयोध्या भेटीदरम्यान अवशेषांची नोंद केली परंतु मशिदीचा उल्लेख केला नाही. १७ व्या शतकात, लाल दासांच्या अवैध विलासासारख्या लेखांद्वारे या ठिकाणी मशिदीचे स्वरुप सूचित केले जाते.

१८ व्या शतकात अयोध्येला भेट देणारे जेसुइट धर्मप्रसारक जोसेफ टायफेन्थलर यांनी भगवान रामाशी संबंधित किल्ल्याचा विध्वंस आणि त्या जागी मशीद बांधण्याविषयी लिहिले. १८१० मध्ये फ्रान्सिस बुकाननसह त्यानंतरच्या अभ्यागतांनी, मशिदीच्या जागी रामाला समर्पित असलेल्या मंदिराच्या अस्तित्वाची नोंद केली. अभ्यागतांची, मशिदीच्या जागी रामाला समर्पित असलेल्या मंदिराच्या अस्तित्वाची नोंद केली.

बाबरी मशिदीवरील शिलालेखांच्या सत्यतेच्या भोवती वाद निर्माण झाला आहे, दाव्याने ते बरेच नंतर जोडले गेले आहेत, ज्यामुळे बाबरच्या काळातील मशिदीच्या वास्तविक ऐतिहासिक संबंधाविषयी प्रश्न उपस्थित झाले आहेत. या दाव्यांच्या ऐतिहासिक सत्यतेवरील वादविवाद जन्मभूमी

गाथेमध्ये गुंतागुंत वाढवतात.

**आधुनिक रामजन्मभूमी आंदोलन :–** २० व्या शतकात विविध हिंदू संघटनांच्या नेतृत्वाखालील रामजन्मभूमी आंदोलनाची तीव्रता दिसून आली. विश्व हिंदू परिषद, व्यापक हिंदू राष्ट्रवादी परिवार संघ परिवाराचा एक भाग, जन्मभूमीच्या जागेवर भव्य मंदिर बांधण्यासाठी पाठिंबा गोळा करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

१९८० च्या दशकात, विहिंप आणि इतर संलग्न संघटनांनी जन्मभूमी पुन्हा निर्माण करण्यासाठी आणि राम मंदिराच्या उभारणीसाठी रॅली काढल्यामुळे चळवळीला वेग आला. ''जय श्रीराम'' च्या जल्लोषाचा जयघोष देशभरात घुमला आणि भक्तांनी घोषणेसह निधी आणि विटांचे योगदान दिले.

**बाबरी मशीद पाडली :–** रामजन्मभूमी आंदोलनाचा कळस ६ डिसेंबर १९९२ रोजी झाला, जेव्हा अयोध्येतील वादग्रस्त जागेवर विहिप आणि भारतीय जनता पक्ष (भाजप) यांनी आयोजित केलेल्या कारसेवकांचा (स्वयंसेवक) मोठा मेळावा झाला. परिस्थिती चिघळली, त्यामुळे बाबरी मशीद हिंसकपणे पाडण्यात आली.

मशिदीच्या विध्वंसाचे दूरगामी परिणाम झाले, आंतर–जातीय दंगली आणि भारतातील हिंदू आणि मुस्लिम समुदायांमध्ये तणाव निर्माण झाला. पाकिस्तान आणि बांगलादेशातील हिंदू मंदिरांवर झालेल्या हल्ल्याच्या अहवालांसह या घटनेचे भारताच्या सीमेपलीकडेही परिणाम झाले.

**कायदेशीर लढाई आणि सर्वोच्च न्यायालयाचा निकाल :–** बाबरी मशीद विध्वंसानंतर, विवादित जागेच्या मालकी आणि स्थितीवरुन कायदेशीर लढाया सुरु झाल्या. विविध शीर्षक विवाद आणि कायदेशीर कार्यवाही उघडकीस आली, ज्यामध्ये अनेक पक्षांनी जमिनीवर दावा केला आहे. ९ नोव्हेंबर २०१९ रोजी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निकाल दिल्याने हे प्रकरण टोकाला पोहोचले. न्यायालयाने जन्मभूमीच्या जागेवर राम मंदिर बांधण्याच्या बाजूने निर्णय दिला, तसेच जमिनीचा स्वतंत्र तुकडा अयोध्या येथे मशीद बांधण्यासाठी वाटप करण्याचे निर्देश दिले.

**श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्राची निर्मिती :–**सर्वोच्च न्यायलयाच्या निकालानंतर, भारत सरकारने श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्राची स्थापना केली, राम मंदिराच्या बांधकामाची देखरेख करण्यासाठी सोपवलेला ट्रस्ट. प्रमुख सदस्यांचा समावेश असलेल्या ट्रस्टला निधी उभारणी, नियोजन आणि बांधकामाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी देण्यात आली होती.

**मंदिर बांधणीची सुरुवात :–** ५ ऑगस्ट २०२० रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयोजित केलेया पायाभरणी समारंभासह मार्च २०२० मध्ये राम मंदिराच्या बांधकामाला अधिकृतपणे सुरुवात झाली. हा कार्यक्रम अयोध्या आणि संपूर्ण भारताच्या सांस्कृतिक आणि धार्मिक इतिहासातील एक महत्त्वपूर्ण क्षण ठरला.

बांधकाम प्रक्रियेला तात्पुरत्या निलंबनाचा सामना करावा लागला, ज्यात एक कोविड – १९ साथीच्या रोगामुळे समाविष्ट आहे. तथापि, प्रकल्प कायम राहिला, आणि मे २०२३ पर्यंत, ७०% गाऊंडवर्क आणि ४०% छताचे काम पूर्ण करुन, लक्षणीय प्रगती झाली.

**प्रभू राम मूर्तीची नियोजित स्थापना :–** गर्भगृहात प्रभू राम मूर्तीच्या स्थापनेचा अभिषेक सोहळा २२ जानेवारी २०२४ रोजी होणार आहे. श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय या सोहळ्याचे नेतृत्व करतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना या शुभ सोहळ्याला उपस्थित राहण्याचे औपचारिक निमंत्रण मिळाले.

**भूमिपूजन सोहळा :–** ५ ऑगस्ट २०२० रोजी भूमिपूजन समारंभानंतर मंदिराच्या बांधकामाची अधिकृत सुरुवात झाली. या समारंभात वैदिक विधींचा समावेश होता, ज्याचा शेवट

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पायाभरणी म्हणून ४० किलो चांदीची वीट बसवण्यात आली. या कार्यक्रमापूर्वी धार्मिक विधी आणि प्रार्थनांची तीन दिवसीय मालिका होती.

**बांधकामावर प्रतिक्रिया :-** राम मंदिराच्या उभारणीवर विविध स्तरातून विविध प्रतिक्रिया उमटल्या आहेत. काही पुजारी आणि धार्मिक नेत्यांनी समारंभादरम्यान योग्य विधी प्रक्रियेतील विवादांबद्दल चिंता व्यक्त केली. जम्मू आणि काश्मीरचा विशेष दर्जा रद्द केल्यापासून एक वर्ष पूर्ण झालेल्या ५ ऑगस्टच्या निवडलेल्या तारखेबद्दलही टीका झाली.

पाकिस्तानाने या जागेवरील ऐतिहासिक वादाचा हवाला देत बांधकाम सुरु केल्याबद्दल भारतावर अधिकृतपणे टीका केली. दरम्यान, विविध भारतीय राजकीय नेत्यांनी भूमीपूजन समारंभाचे सांस्कृतिक आणि धार्मिक महत्त्व अधोरेखित करुन त्याचे कौतुक केले.

**अलीकडील विकास आणि भविष्यातील योजना :-** ऑगस्ट २०२१ मध्ये, लोकांना बांधकाम पाहण्याची परवानगी देण्यासाठी सार्वजकिन पाहण्याचे ठिकाण स्थापित केले गेले. मोडतोड काढणे आणि पायाभरणीचे काम सुरुच राहिले, सप्टेंबर २०२१ च्या मध्यापर्यंत रोलर - काँक्रिटचे ४७-४८ थर पूर्ण झाले.

जानेवारी २०२३ मध्ये, दोन शालिग्राम खडक, अंदाजे ६० दशलक्ष वर्षे जुने आणि २६ आणि १४ टन वजनाचे, नेपाळमधील गंडकी नदीतून पाठवण्यात आले. गर्भगृहातील रामलल्लाची मूर्ती कोरण्यासाठी या खडकांचा वापर करण्यात आला. मे २०२३ पर्यंत, श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने अहवाल दिला की ७०% जमिनीचे काम आणि ४०% छताचे काम पूर्ण झाले आहे.

**अभिषेक आणि रामोत्सव :-**८२६ स्थानिक स्वराज्य संस्थांमधील धार्मिक कार्यक्रमांच्या मालिकेतील 'रामोत्सवा'साठी उत्तर प्रदेश सरकारने रु. १०० कोटींची तरतूद करुन प्राणप्रतिष्ठा (अभिषेक) सोहळ्याची तयारी सुरु आहे. डिसेंबर २०२३ मध्ये या कार्यक्रमांची सुरुवात झाली आणि १४/१५ जानेवारी रोजी मकर संक्रांतीपासून ते २२ जानेवारी रोजी राम मंदिराच्या उद्घाटनापर्यंत भव्य उत्सवात समाप्त होईल.

अभिषेक सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह इतर राजकीय नेते आणि मान्यवरांना आमंत्रित करण्यात आले आहे. पाहुण्यांच्या यादीत उद्योगपती, वैज्ञानिक, अभिनेते, सैन्य अधिकारी, आध्यात्मिक नेते आणि पुरस्कार विजते यांचा समावेश आहे.

**देणगी आणि निधी उभारणी :-** मंदिर ट्रस्टने ५५०-६०० दशलक्ष लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी देशव्यापी ''जनसंपर्क आणि योगदान अभियान'' सुरु केले. रु. १० आणि त्याहून अधिकच्या ऐच्छिक देणग्या स्विकारल्या गेल्या. भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी जानेवारी २०२१ मध्ये रु. ५,०१,००० चे पहिले योगदान दिले. एप्रिल २०२१ पर्यंत, संपूर्ण भारतातील देणग्यांमधून सुमारे रु. ५,००० कोटी जमा झाले. विशेष म्हणजे या मोहिमेला मुस्लिम आणि ख्रिश्चन समुदायातील सदस्यांकडून योगदान मिळाले.

काही राजकीय व्यक्तींनी प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करुन निधी संकलनाबाबत टीका केली. भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे खाती डिजिटल करण्यासाठी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसचा सहभाग होता.

**भारतीय पुरातत्व सर्वेक्षण - पुरावे :-** भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (ASI) ने साइटच्या पुरातत्व पुराव्याचा अभ्यास करण्यासाठी दोन महत्त्वपूर्ण उत्खनन केले, पहिले १९७८ - ७९ मध्ये आणि दुसरे २००३ मध्ये.

बीबी लाल यांच्या नेतृत्वाखाली पहिल्या उत्खननादरम्यान, टीमला हिंदू मंदिराच्या अवशेषांपासून बनवलेल्या मशिदीचे १२ खांब सापडले. १२ व्या आणि १३ व्या शतकातील मंदिरांमध्ये आढळणाऱ्या समृद्धी दर्शविणारी पूर्ण कलश चिन्हे खांबांवर होती. मंदिराच्या वैशिष्ट्यांशी सुसंगत,

मानव आणि प्राणी यांचे चित्रण करणारी टेराकोटा शिल्पे देखील शोधण्यात आली.

२००३ च्या उत्खननात, ५० पेक्षा जास्त खांब सापडले, ज्यामुळे मशिदीच्या खाली एक हिंदू मंदिर आहे असा विश्वास दृढ झाला. उत्खननकर्त्यांना मंदिर प्रणाली, ‘प्रणाली’, ‘शिखर’ आणि इतर वास्तुशास्त्रीय घटक सापडले. टेराकोटाचे अवशेष, देव, देवी आणि मानवी आकृती दर्शविणाऱ्या २६३ तुकड्यांसह, मंदिराचा आणखी पुरावा प्रदान केला. या ठिकाणी दोन अवशेषांवर ‘विष्णू हरी शिला फलक’ चा शिलालेख आढळून आला, जो हिंदू मंदिराच्या अस्तित्वाचे समर्थन करतो.

**निष्कर्ष :–** अयोध्येतील श्रीराम मंदिराचा इतिहास हा पौराणिक कथा, दंतकथा, ऐतिहासिक घटना आणि समकालीन सामाजिक राजकीय चळवळींच्या धाग्यांनी विणलेला टेपेस्ट्री आहे. त्याचे महत्व धार्मिक सीमांच्या पलीकडे आहे, लाखो लोकांच्या सांस्कृतिक आणि भावनिक लोकांचा समावेश आहे. राम मंदिराचे बांधकाम केवळ भौतिक रचनाच नाही तर विश्वास, लवचिकता आणि भगवान रामाच्या महाकथेचा चिरस्थायी वारसा दर्शवते. जसजसा अभिषेक समारंभ जवळ येत आहे. तसतसा तो भारताच्या सांस्कृतिक भूदृश्यातील एक निश्चित क्षण चिन्हांकित करतो, पौराणिक कथा, इतिहास आणि तेथील लोकांच्या सामूहिक चेतना यांच्यातील खोलवर रुजलेल्या संबंधांना बळकट करतो.

**दर्शन ईश्वर गायकवाड**
इतिहास विभाग

## मानवी संस्कृती व पुराणातील नैतिक तत्त्वे

मानवाचा विकास शोधताना मानवी संस्कृतीच्या विविध अंगांशी पुराणकथांचा निकटचा संबंध येत असतो. याचे विवेचन पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**पुराणकथा आणि धर्म व संस्कृती :–**

पुराणकथांचा धर्माशी अत्यंत निकटचा संबंध आहे. पुराणकथा स्वत: धर्मभावनेतून जन्मलेल्या असतात आणि त्या धर्मभावनेला पुष्टही करतात. त्याचप्रमाणे, पुराणकथा हा आजपर्यंतच्या विज्ञानयुगपूर्व मानवी संस्कृतीचा एक मूलभूत व अविभाज्य घटक असून त्यांच्या अभ्यासामुळे मानवी संस्कृतीचा इतिहास समजावयास मदत होते. पुराणकथा या त्यांच्या नायक – नायिकांचा इतिहास सांगत नाहीत, तर कथानिर्मात्याच्या मनाचा इतिहास सांगतात, असे म्हटले जाते. कारण ज्यांनी या कथा निर्माण केल्या आणि पिढ्यानपिढ्या जपल्या, त्या लोकांचे आचारविचार,जीवनपध्दती, आशा–आकांक्षा इ. त्या कथांतून प्रतिबिंबित झाल्या आहेत, असे दिसते. तात्पर्य, एखाद्या समाजाची प्राचीन काळातील सांस्कृतिक अवस्था काय होती, हे त्याच्या पुराणकथांवरुन कळते. कला, धर्म, कर्मकांड, यातुक्रिया इत्यादींना उत्तेजन देऊन संस्कृतीला समृद्ध करण्यामध्ये पुराणकथांचा वाटा मोठा असतो. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात सांस्कृतिक एकात्मता निर्माण करण्यामध्ये पुराणकथांचा वाटा फार मोठा आहे.

**पुराणकथा व विज्ञान :**

आधुनिक मानवाप्रमाणेच आदिम मानवाच्या मनातही विश्वाच्या निर्मिती विषयी जिज्ञासा होती. पाऊस कसा पडतो, ग्रहणे का होतात, जग कोणी निर्माण केले इ. प्रश्नांची उत्तरे शोधण्याची त्या मानवाचीही धडपड चालू होती. सत्याचा शोध घेता घेता त्याने पुराणकथेतून या प्रश्नांना उत्तरे दिली असल्यामुळे पुराणकथा हे आदिम मानवाचे विज्ञान होते, असे एक मत आहे. परंतु आदिम मानवाच्या पुराणकथांना त्याचे विज्ञान मानणे, ही मानवी संस्कृतीच्या अभ्यासातील एक घोडचूक आहे, असे बी. मॅलिनोस्कीने म्हटले आहे. पुराणकथा

व विज्ञान या दोघांचा प्रवास अत्यंत भिन्न दिशांनी चाललेला असतो. पुराणकथेत एक वैश्विक व अंतिम असे सत्य शाश्वत काळातही व्यक्त झाले आहे. असे मानले असले तरी पुराकथेतील घटनेत काहीही बदल न करता त्यात तंतोतंत पुनरावृत्ती करीत रहाणे, हे पुराणकथेत अभिप्रेत असते. याउलट, पूर्वी सापडलेल्या सत्यातील दोष व अपूर्णता दूर करुन त्याला सदैव नवे रुप देत जाणे, हे विज्ञानाचे स्वरुप असते. दोहोंतील या भेदामुळेच पुराणकथा या विज्ञानाच्या प्रगतीला खीळ घालू शकतात.

पुराणकथा म्हणजे आदिम मानवाचे प्राथमिक तत्त्वज्ञान होते, असेही म्हणता येते. तत्त्वज्ञानात जसा वैश्विक सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न असतो, तसाच पुराणकथांतूनही आढळतो. पुराणकथांतील सत्य हे आध्यात्मिक असते आणि त्यात सत्, असत्, आभासात्मक इ. शब्द आढळत नसले, तरी त्यात शब्दांमागचा आशय मात्र उपस्थित असतोच, असे मीर्शा ईलिआने म्हटले आहे. परंतु हे भारतीय पुराणकथांना लागू नाही. ऋग्वेदात ‘सत् व असत्’ ही द्वंद्वे याच शब्दांनी सांगितली आहेत. धर्म व तत्त्वज्ञान यांतील बहुसंख्य सिद्धांतावर आधारलेल्या वा त्या सिद्धांतानांच नाट्यरुप देऊन तयार झालेल्या अनेक पुराणकथा असतात. या कथांमुळे त्या सिद्धांताला पुष्टी मिळते आणि ते जनमानसात रुजतात. त्यातून शोध प्रक्रिया सुरु होते.

**पुराणकथा व कला :**

निर्मिती, विषय, अभिव्यक्तीचीच पद्धत इ. अनेक दृष्टींनी विविध कलांचा व पुराकथांचा घनिष्ठ संबंध असून पुराणकथा हे कलांचे अक्षय प्रेरणास्थान आहे. पुराणकथांमुळे कलांची निर्मिती होण्यास मदत झाली आणि उलटपक्षी कलांमुळे पुराणकथांचा आशय घेऊन श्रेष्ठ कलाकृती निर्माण होत आहेत. ग्रीक पुराकथांचा कर्मकांडाशी असलेला संबंध तुटलेला असूनही साहित्यकृती व इतर कलाकृतींमुळे त्या शेकडो वर्षे टिकून राहिल्या आहेत. पुराणकथा प्रारंभीच्या काळात मौखिक परंपरांनी आलेल्या असल्या तरी, त्या काळातही त्यांच्यामध्ये अनुषंगिक म्हणून का होईना, कथेचे आणि रंजकतेचे तत्व होतेच. त्यामुळे पुराणकथांचा प्रथमपासूनच साहित्याशी संबंध होता. होमरची ओडिसी व इलिअड ही महाकाव्ये, भारतातील रामायण, महाभारत ही आर्ष महाकाव्ये, कालिदारासाचे रघुवंश इत्यादींवरुन पुराणकथा व साहित्य यांचा संबंध किती निकटचा होता, हे दिसून येते. महाकाव्यातील नायकनायिकांच्या चरित्रांत पुराणकथांतील देवदेवींची प्रतिबिंबे आढळतात, यावरुन हा संबंध स्पष्ट होतो.

कल्पनाविलास, प्रतीकात्मकता, सूचकता, अतिशोयक्ती इ. तत्त्वे काव्य व पुराणकथा या दोहोंतही असल्यामुळे दोहोंचा संबंध घनिष्ठ असल्याचे स्पष्ट होते. नाट्यकलेवर विषय आणि तो सादर करण्याची पद्धत या दोन्ही दृष्टींनी पुराकथांचा फार मोठा प्रभाव होता. टेओडोर गास्टर या अमेरिकन विचारवंताने पूर्व भूमध्य समुद्रालगतच्या देशांतील प्राचीन संस्कृतींचा अभ्यास करुन पुराणकथा व कर्मकांड यांच्या संबंधातून नाटक निर्माण झाले, असे मत मांडले आहे. प्राचीन काळी देवांनी स्वर्गात जी कृत्ये केली, ती नाट्याच्या रुपाने पृथ्वीवर दाखिण्याच्या प्रयत्नातून प्रारंभीची नाट्यकला निर्माण झाली, असे दिसते.ग्रीक शोकांतिका, जपानमधील ‘नो’ नटके व जावामधील ‘वायांग’ नाटके ही पुराणकथांतूनच निर्माण झाली. भारतातील भास, कालिदास इत्यादींच्या नाटकांचे विषय व वातावरण पुराणकथांशी संबद्ध होते. विशिष्ट घटनानाट्यात्मक शैलीत मांडण्याच्या पद्धतीमुळेही पुराकथांचा नाट्याकलेशी संबंध येतो.

नृत्यकलेचा प्रारंभ शंकर, पार्वती इ देवतांपासून झाला, या अर्थाच्या हिंदू पुराणकथा असून आदिम मानव कर्मकांडाच्या वा समारंभाच्या प्रसंगी केल्या जाणाऱ्या नृत्यांतून पुराणकथांचाच आशय व्यक्त करीत आहे. इंद्राने पाऊस पाडावा म्हणून जेव्हा यज्ञ केला जाई, तेव्हा कुमारिका डोक्यावर घट घेऊन अग्नीभोवती नृत्य करीत असत. पशूंचे चर्म वा मुखवटे

धारण करुन जी नृत्ये केली जातात, त्यांतून पुरशाणकथांतील वातावरणाची निर्मिती केली जाते. संगीताचा नृत्याशी असलेला संबंध, ऑपेरासारख्या संगीतप्रकारातून असलेले पुरणकथात्मक विषय, यक्षगंधर्वादींचे संगीतप्रेम इ. मार्गांनी संगीत हे पुरणकथांशी निगडित असते. स्थापत्यकला, शिल्पकला, मूर्तिकला, चित्रकला, वास्तुकला इत्यादींची समृद्धी तर पुराणकथात्मक विषयांमुळेच झाली आहे. इतकेच नव्हे तर पुराणकथांच्या अध्ययनाखेरीज या कलांचे अध्ययनच पुर्ण होऊ शकत नाही. इमारतीचा पाया खोदताना तो पृथ्वी धारण करणाऱ्या शेषादींच्या मस्तकावर आणण्याचा प्रयत्न करणे वा स्वर्गीय मंदिराची प्रतिकृती म्हणून पृथ्वीवर मंदिर तयार करणे इ. असंख्य प्रकार पुराणकथा व उपरिनिर्दिष्ट कला यांचा संबंध दर्शविणारे आहेत.

**पुराणकथा व इतिहास :–**

इतिहास (विशेषत: प्राचीन इतिहास) आणि पुराणकथा या दोहोंमध्ये भूतकालीन घटनांचे निवेदन असल्यामुळे त्या दोहोंचे वेगळेपण दाखविणे अवघड असते. शिवाय इतिहासाच्या अभ्यासकांना इतिहास जितका सत्य वाटतो. तितक्याच, किंबहुना त्याहून अधिक प्रमाणात श्रद्धाळू लोकांना पुराणकथांची सत्यता पटत असल्यामुळेही काही अडचणी निर्माण होतात. अर्थात अभ्यासकांच्या दृष्टीने इतिहासात वास्तवाचे व पुराणकथेत कल्पितांचे दर्शन घडते, हा फरक असतोच. शिवाय, भूतकाळातील घटनांचे अचूक ज्ञान प्राप्त करणे, हा इतिहासाचा उद्देश असतो, तर पूर्वधारणेनुसार कर्म करणे हा पुरणकथांचा उद्देश असतो. ज्ञान हा त्यांचा उद्देश नसतो. मानवजातीने दीर्घकाळपर्यंत इतिहासाविना आपला प्रवास केला आहे ; परंतु तिने पुराणकथांची सोबत मात्र नेहमीच घेतली आहे. असे असले, तरी व्यवहारात भूतकाळातील घटनांची अचूक वास्तवता निश्चित करणे, हे अवघड असते. कारण, एकीकडे अलौकिकतेमुळे काही ऐतिहासिक घटनांना व अलेक्झांडर, कृष्ण इ. पुरुषांच्या जीवनांना पुराणकथांचा रंग प्राप्त होतो, तर दुसरीकडे देवविषयक काही कल्पित पुराणकथा समाजात इतक्या जिवंतपणे रुजलेल्या असतात, की त्या कथा म्हणजे वीरांची ऐतिहासिक चरित्रे, अशा वाटू लागतात.

काही वेळा एकाच घटनेच्या निवेदनात इतिहास व पुराणकथा यांचे मिश्रण झालेले दिसते. ऐतिहासिक घटनांचे पुराणकथांत रुपांतर होताना कोणत्या प्रक्रिया घडतात, याविषयी मीर्शा ईलिआने केलेले विवेचन महत्त्वाचे आहे. त्यांच्या मते कोणतीही ऐतिहासिक घटना दीर्घकाळापर्यंत जशीच्या तशी लोकांच्या स्मरणात राहू शकत नाही. त्यांच्यापुढे ईश्वर, पूर्वज वा एखादा वीर यांनी प्राचीन काळात केलेल्या महकृत्यांचे आदर्श वा मूलबंध (आर्किटाइप्स) असतात. लोक हळूहळू ऐतिहासिक घटनेचा प्रवाह त्या मूलबंधाशी एकरुप करुन टाकतात. मग तो वीरपुरुष वा त्याचे महत्कृत्य स्वत:च्या ऐतिहासिक स्वरुपात शिल्लक न राहता, त्या मूलबंधाशी सुसंगत अशी व्यक्ती वा घटना बनून लोकांच्या स्मरणात राहते. कृष्णाला वा शिवाजीला मानव न मानता विष्णूचा वा शिवाचा अवतार मानण्यात हीच प्रवृत्ती दिसते, असे म्हणता येईल.

सर्व पुराणकथांचे मूळ ऐतिहासिक घटनांमध्ये असते, असे मत इ..स.पू. ३०० च्या सुमारास होऊन गेलेल्या यूहेमरस या ग्रीक विद्वानाने मांडले होते. मूळचे मानव असलेले झ्यूस वगैरे लोक आपल्या महत्तकृत्यामुळे देव मानले गेले, संस्कृतीला उत्तेजना देणारा झ्यूस हा राजा, क्रीट येथे मरण पावल्यावर तेथे त्याची कबर बांधलेली आढळते. प्रॉमिथिअस मातीतून स्त्री–पुरुष निर्माण करीत होता, याचा अर्थ तो प्रत्यक्षात मातीच्या मूर्ती तयार करीत होात इ. विचार त्याने व त्याच्या अनुयायांनी मांडले होते. आधुनिक काळात हर्बर्ट स्पेन्सरने या मताला काहीशी प्रतिष्ठा मिळवून दिली ; तथापि हे मत आता मागे पडले आहे. त्याच्या आधी काही काळ ईजिप्तमधील हेकॅटेउसने क्रोनस, रीया, झ्यूस, हेरा या ग्रीक देवता आणि इसिस व ओसायरिस या ईजिप्ती देवता मूळच्या मानव असल्याचे मानले होते. भारतातही वैदिक देवतांचे स्वरुप स्पष्ट करताना ‘वृत्र हा

त्वष्ट्याच्या पुत्र होता' अशा पद्धतीने विवेचन करणारे ऐतिहासिक होते, असे निरुक्तात म्हटले आहे. प्रत्यक्षात मात्र, पुराणकथांना इतिहास मानल्यामुळे पुराणकथा व इतिहास दोहोंपैकी कशाचेच यथार्थ ज्ञान होत नाही. तसेच, एका व्यक्तीला जो पवित्र इतिहास वाटतो, तो दुसऱ्याला कल्पित कथा वाटण्याची शक्यता असल्यामुळे पुराणकथेला इतिहास व इतिहासाला पुराणकथा म्हटले जाण्याचा धोका संभवतो. कथेतील सर्व कथातत्त्वांचे मिश्रण झाल्याचेही आढळू शकते.

**निष्कर्ष :–**

'पुराणातील वांगी पुराणात' ही म्हण रुढ असली तरी पुराणात मानवी संस्कृतीचा विकास कसा होत गेला याचे दर्शन घडते. १८ पुराणातून ऐतिहासिक भारतीय राज्यांच्या वंशावली मिळतात. पुराणातील कल्पोकित कथा आज वैज्ञानिकांनी शोध घेऊन काही प्रत्यक्ष साकारल्या आहेत. रामायणातील पुष्पक विमान आधुनिक विमानात रुपांतर हे उत्तम उदाहरण आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रात व्यावसायिक नैतिकता शोधणे काळाची गरज बनली आहे.

**प्रतिक बबन खांडके**
इतिहास विभाग

## भारतातील बदलती शिक्षण व्यवस्था आणि आजचा विद्यार्थी



भारतातील शिक्षण व्यवस्थेचे बदलते आणि आजचे विद्यार्थी एक अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. भारतातील शिक्षण व्यवस्थेत काही अत्यंत महत्त्वाचे बदल घडून आले आहेत, ज्यामुळे आजचे विद्यार्थी अनेक नवीन अनुभवांमध्ये आणि परिस्थितींमध्ये सामुग्रीसह आहेत.

**१. डिजिटल शिक्षण :** भारतात डिजिटल शिक्षणाचे क्षेत्र वाढत आहे. अनेक विद्यालये आणि कॉलेज आता ऑनलाईन शिक्षण प्रदान करतात. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक साधने आणि तंत्रज्ञान मिळतात.

**२. संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबादारी :** आजचे विद्यार्थी संवेदशील आहेत आणि सामाजिक जबाबदारीच्या क्षेत्रात सक्रियपणे सहभागी आहेत. त्यांना समाजाच्या समस्यांचा आणि सामाजिक क्षेत्रातील बदलांचा अवलंबुन आहे.

आधुनिक युगात, विद्यार्थ्यांना आपल्या समाजाच्या समस्यांचा आणि बदलांची जागरुकता आहे. त्यांच्यात उत्साह, अभिमान आणि सामाजिक संवेदनशीलता असते. त्यांची संवेदनशीलता त्यांना सामाजिक समस्यांचा विचार करण्यास आणि त्यांचा समाधान करण्यास सक्षम करत

आजचे विद्यार्थी विविध क्षेत्रात सक्रियपणे सहभागी आहेत, जसे की सामाजिक सेवा, पर्यावरण संरक्षण, मानवाधिकार आणि सामाजिक न्याय, शिक्षणातील विपरीतता आणि इतर अनेक क्षेत्रे. त्यांना स्वतंत्रता आणि सामाजिक संबंधांची मूल्यांकन करण्यासाठी सामाजिक कार्यालयांत सर्वसाधारण स्थाने योगदान करण्याची अवधारणा दिली जाते.

**३. अनुसंधान आणि नवीन प्रौद्योगिकी :** विद्यार्थ्यांना आज अनुसंधान करण्याची विशेष शिक्षण आणि साधने मिळतात.

आधुनिक प्रौद्योगिकीच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना विशेष अभ्यासाची आणि अनुभवाची संधी मिळते, ज्यामुळे त्यांना नवीन प्राद्योगिकीचा विकास करण्याची प्रेरणा मिळते.

विद्यार्थ्यांना आधुनिक विज्ञान आणि प्रौद्योगिकीच्या क्षेत्रात अध्ययन करण्याची संधी मिळते, ज्यामध्ये त्यांना विविध प्रकारच्या अनुसंधानांमध्ये सहभागी होण्याची संधी दिली जाते. त्यांच्या सोबत, त्यांना नवीन प्रौद्योगिकीच्या विकासात सहाय्य करण्यासाठी विभिन्न अनुसंधान संस्थांमध्ये स्थानिक वा आंतरराष्ट्रीय स्तरावर अनुसंधान करण्याची संधी मिळते.

विद्यार्थ्यांना त्यांच्या पारस्परिक संपर्कातून, सक्रिय असलेल्या विद्यार्थ्यांना या क्षेत्रात संलग्न होण्याची संधी असते. त्यांना विशेष शिक्षण आणि प्रशिक्षण योजना आणि कार्यक्रम सांगितले जातात, ज्यामुळे त्यांना नवीन प्रौद्योगिकीच्या विकासात सक्षमता मिळते आणि त्यांना समुदायात सेवा करण्याची अवधारणा मिळते.

प्रौद्योगिकीच्या क्षेत्रात संलग्न होण्याची अवघड स्थिती आहे कारण त्याचा अध्ययन करण्यासाठी उच्च शैक्षणिक स्तर आणि तंत्रज्ञान आवडत असतात. परंतु, सामान्यत: उच्च शिक्षण संस्थांमध्ये या क्षेत्रात काही प्राविण्य प्राप्त करण्यासाठी अभ्यास घेतला जातो आणि त्यामुळे त्यात संलग्न होण्याची संधी अधिक असते.

**४. कौशल्य विकास :** विद्यार्थ्यांना कौशल्ये विकसित करण्यासाठी विविध प्रकारचे सामाजिक, सांस्कृतिक आणि औद्योगिक कार्यक्रम आयोजित केले जातात. ह्या कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नवीन कौशल्ये त्यांच्या सामाजिक आर्थिक आणि आत्मविश्वासाची वृद्धी होते. या कार्यक्रमांमध्ये निम्नलिखित कार्यक्रम समाविष्ट केले जातात :

१. कौशल्य शिबिरे : कौशल्य शिबिरे आयोजित केली जातात ज्यामध्ये विविध क्षेत्रांतील विशेष तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना नवीन कौशल्ये शिकवितात.

२. कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रम : विभिन्न क्षेत्रांमध्ये कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केली जातात ज्यामध्ये विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये शिकवितात.

३. आयोजन आणि प्रबंधन क्षमता : इतर विद्यार्थ्यांसह सहकार्य करण्यासाठी आणि कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन आणि प्रबंधन करण्याची क्षमता विकसित करण्यासाठी आयोजित केल्या जातात.

४. सामूहिक कार्यक्रम : सामूहिक कार्यक्रम आयोजित केली जातात ज्यामध्ये विद्यार्थ्यांना सामूहिक सहकार्य, संवाद आणि संघर्षात्मक निर्धारण करण्याचा अभ्यास सांगितला जातो.

या प्रकारे, विविध प्रकारच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यामुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्यांची वृद्धी होते आणि त्यांचा आत्मविश्वास वाढते. या कौशल्यांच्या विकासाच्या प्रक्रियेत सहभागी असल्यामुळे विद्यार्थ्यांना समाजातील समस्यांचे समज आणि समाधान करण्याच्या क्षमता विकसित होतात आणि त्यांना विभिन्न क्षेत्रात यश मिळते.

**५. मानव अधिकार आणि सामाजिक न्याय :** विद्यार्थ्यांना मानव अधिकारांच्या आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांची चर्चा करण्याची अवधारणा देण्याची आवश्यकता अत्यंत महत्त्वाची आहे. या चर्चेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सामाजिक संवेदनशीलता आणि सामाजिक न्याय या संबंधित प्रश्नांच्या समज सापडते. त्यामुळे त्यांना आपल्या समाजातील विविध समस्यांचा आणि अन्यायाची समज आहे, आणि त्यांना समस्यांचे समाधान करण्याच्या प्रकारांची प्रेरणा मिळते.

विद्यार्थ्यांच्या समाजातील समस्यांचे समाधान करण्यासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा मिळते, आणि त्यांनी समाजातील बदल करण्याच्या दिशेने काम करण्याचे सामर्थ्य मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांना सामाजिक कामगिरीसाठी उत्साहित केले जाते, ज्यामुळे समाजात बदलाची गरज मान्य



केली जाते.

मानव अधिकारांच्या आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांची चर्चा विद्यार्थ्यांना समाजातील समस्यांचा समज आणि समाधान करण्यासाठी प्रेरित करते आणि त्यांना सामाजिक जागरुकता आणि सामाजिक न्यायासंबंधित कामगिरीसाठी सक्रिय बनवते.

आजचे विद्यार्थी आधुनिक युगातील सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक सामग्रीसह आहेत सामाजिक जबाबदारीच्या क्षेत्रात सक्रियपणे सहभागी आहेत. या बदलल्या शिक्षण व्यवस्थेमुळे त्यांना अधिक विकसित आणि समृद्ध भविष्यात सहाय्य करण्याची संधी मिळते.

**उत्कर्षा राजेंद्र लोंढे**
एस.वाय.बी.एस्सी.

## पर्यावरण संरक्षण काळाची गरज



पर्यावरण संरक्षण हा आधुनिक युगातील एक महत्वाचा विषय आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपल्याला पर्यावरणाची आवश्यकता आहे, आपल्याला स्वच्छ जल, हवा आणि भूमी आवश्यक आहे. ही आवश्यकता आपल्या संपूर्ण समाजाच्या अधिकारांची आहे. जनसंख्येची वाढ होण्याने पर्यावरणाची अवघड स्थिती अधिक वाटते. आपल्याला सर्वांगीण पर्यावरण संरक्षणाच्या मार्गावर चालनं आणि जनतेची जागरुकता वाढवने आवश्यक आहे. या विषयावर जाणून घेऊया.

**पर्यावरणाची आवश्यकता :-**

पर्यावरण संरक्षण हा मानवी आणि प्राणी संसाराच्या सर्वत्र समाजाचा विचार करते. एक तोफगर किव्हा सागर, सर्वांगीण रुपातील प्राणी आणि वनस्पती अभ्यासाच्या गोष्टी आहेत. पर्याववरणातील स्थिरता हे सर्व जीवनाच्या बाबतीतील महत्त्वाचे आहे. प्राण्यांचे आणि वनस्पतींचे संरक्षण हे समग्र जगातील संतुलित वातावरण बनवण्यात मदत करते. त्याच्यामागे, स्वच्छ आणि सुखी आणि सामर्थ्यपूर्ण पर्यावरण हे आरोग्य आणि तत्त्वज्ञानात वृद्धी करण्याचे आणि आपल्या जीवनात आनंद आणण्याचे हेतू आहे.

**पर्यावरण संरक्षणाचे उपाय :-**

पर्यावरण सरक्षणाच्या कार्याचा सुरुवातीला सर्वांना समजणं आवश्यक आहे की त्याचा महत्त्व किती मोठे आहे. धोरण, आचरण आणि अंगठ्यांचे बदल लावणं हा सर्वांच्या जीवनात आवश्यक आहे. तसेच प्रभावी कायद्यांचे व्यावसायिक अंमलता आणणे आवश्यक आहे त्यांना पर्यावरणाच्या आधारावर काम करण्याचे पर्याय मिळतात.

वनस्पतींचे संरक्षण : लागवड, अभ्यास आणि वनस्पतींच्या प्रदुषणाचा आढावा घेऊन संरक्षण करणे हे एक महत्त्वाचे पर्यावरण संरक्षाचे उपाय आहे.

जलसंरचना : जलसंधारण, जलसंपादन आणि जलमान्यता ह्या प्रक्रियांमध्ये संशोधन करणे आणि योजना तयार करणे आवश्यक आहे.

वातावरण : हवा प्रदूषण, ध्वनि प्रदूषण आणि अनियमित वातावरण प्रबंधन यांचे संशोधन करणे आणि त्यांच्या नियंत्रणासाठी उपाय तयार करणे आवश्यक आहे.

पर्यावरणीय संरक्षण योजना : पर्यावरण संरक्षणासाठी योजना तयार करणे, कायद्यांमध्ये संशोधन करणे आणि योजना कार्यान्वित करण्याची जबाबदारी आहे.

शिक्षण आणि जागरुकता : लोकांना पर्यावरणाच्या महत्त्वाची जागरुकता वाढवून त्यावर संवेदनशीलता वाढवण्याचे हेतू आहे.

**पर्यावरण संरक्षाचे फायदे :-**

पर्यावरण संरक्षणाचे अनेक फायदे आहेत. ते आहेत. वातावरणातील स्थिरता, स्वच्छ जल, वायु आणि भूमी, वनस्पतींचा संरक्षण, वनस्पतींच्या संरक्षणाच्या सर्व अभ्यासाची मदत, जलसंपादन, जलसंरचन आणि जलमान्यता.

पर्यावरण संरक्षणाची गरज नकारात्मक प्रभावांना कमी करणे आणि समृद्ध आणि स्थिर सुनिश्चित करणे हे आमचे कर्तव्य आहे. आपल्याला आपल्या पर्यावरणाची काळजी घेत आपल्या भविष्याची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाइी सहयोग करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील संतांनी पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व आणि त्याचे प्रमुख तत्व समाजात प्रबोधन करण्यात महत्त्वाचे भूमिका बजावली आहे. त्यांच्या अभंगांमध्ये पर्यावरण संरक्षणाचे संदेश सरळ, सोपे आणि शक्तिशाली प्रकारे सामाजिक अथवा आध्यात्मिक दृष्टिकोनातून समाजात प्रसारित केले आहे. या संतांचे अभंग समाजातील लोकांच्या मनात नैतिक, सामाजिक आणि पर्यावरणिक जागरुकता वाढविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. खास करुन, भक्तिमय आणि कल्साणकारी काव्यांच्या माध्यमातून त्यांनी पर्यावरण संरक्षणाचे संदेश सामाजिक अभिवृद्धीसाठी प्रस्तुत केले आहे.

संत तुकाराम महाराज यांचे अभंग त्यांच्या साधनेमध्ये पर्यावरण संरक्षणाच्या महत्त्वाचे आणि साधनांचे सारांश प्रस्तुत करतात. त्यांच्या अभंगामध्ये प्राणी आणि पर्यावरणाच्या संबंधाचे महत्त्व आहे. त्यांनी प्राणीविषयक, वनस्पतिविषयक आणि पर्यावरणाच्या संरक्षणाच्या उपायांबद्दल चर्चा केली आहे. त्यांचे अभंग सामाजिक विचारांच्या प्रेरणासाठी आहे आणि जनतेला आपल्या पर्यावरणीय कर्तव्यांचे भावनात्मक अनुभव प्रदान करते.

देवाचे अभंग अशी अनेक जनतेसाठी आदर्श स्रोत आहेत ज्यामुळे पर्यावरण संरक्षणाच्या विषयातील सामाजिक जागरुकता वाढते. या अभंगांमध्ये पर्यावरणाचे महत्त्व, जलसंधारण, जलसंपादन, वनस्पतींचे संरक्षण, वातावरणी तसेच जनतेला पर्यावरणाच्या संरक्षणाच्या उपायांची माहिती देण्यात आली आहे.

संत ज्ञानेशवर महाराजांच्या अभंगांमध्ये प्राणीविषयक, प्रकृतीविषयक आणि पर्यावरण संरक्षणाच्या तत्त्वांचे उपदेश आहेत.

**वाळुंज निशांत**
टी.वाय.बी.एस्सी. (बॉटनी)



# संत गाडगेबाबा



विदर्भात अमरावती जिल्हयात दर्यापूर नावाचा एक तालुका आहे. या तालुक्यात भुलेश्वरी नदीच्या काठावर 'शेणगाव' नाच्या एका छोट्या खेड्यात झिंगरोजी जानोरकर व सखुबाई यसा परीट समाजातील दांपत्याच्या पोटी डेबू नावाच्या मुलाचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ साली झाला. तेच 'संत गाडगेबाबा' होत.

डेबूचे वडीलांकडे बऱ्यापैकी शेतीवाडी असूनही बोकड कापून कंदूरी करणे, त्यानिमित्ताने मद्यपान करणे व नातेवाईकांनाही पाजणे, सावकाराकडून कर्ज काढून नवस फेडणे आदि अंधश्रद्धायुक्त परंपरेमुळे त्यांना दारिद्र्य येऊन त्यांचे अकालीच निधन झाले. पुढे आठ-नऊ वर्षाचा डेबू आईसह मामाच्या गावाला, दापुऱ्याला आला. अनेक वर्ष सखुबाईंनी भावाच्या शेतात कष्ट केले, तर डेबूने मामाची गुरे-ढोरे सांभाळली. १८९२ साली डेबूचा कमालपूरचे धनाजी खल्लारकर यांची मुलगी 'कुंती' हिच्याशी विवाह पार पडला. पुढे १८८६ मध्ये भारतभर दुष्काळ पडला. डेबुचा मामा कर्जात बुडाला. सावकाराने मामाच्या शेतीवर जप्ती आणली. परंतु डेबूजीह जाणोरकरांनी सावकाराशी अटीतटीचा संघर्ष केला. पैसे देऊनही सावकार मामाची जमीन हडपू पहात होता. त्या विरोधात डेबुजींनी जो प्रतिकार केला,तो पाहून संपूर्ण गाव चकीत झाले. शेवटी सावकाराने माघार घेऊन माफी मागितली. परंतु पुढे डेबुजींनी घर सोडले ! त्यांच्यात आमुलाग्र बदल झाला. अंधश्रद्धा आणि सावकाराच्या कर्जात बुडालेल्या समाजाला ते प्रबोधन करु लागले. रोगराई पसरुन साथीचे रोग येतात, म्हणून त्यांनी हातात झाडू घेऊन स्वच्छता सुरु केली. एखाद्या गावात जाऊन ते सारा गावच स्वच्छ करुन टाकत. स्वतःहून कोणी काही खाण्यास दिले तरच स्विकारत. रात्री त्याच गावात ते कीर्तनही करत. त्यांच्या अंगावरील वस्त्र म्हणजे फक्त एक साधे धोतर आणि खांद्यावर पांढरे उपरणे बस एवढेच. जवळ पाण्यासाठी म्हणून एक छोटे गाडगे राही ; म्हणून लोक त्यांना 'गाडगेबाबा' म्हणू लागले. गावोगाव ते पायी फिरु लागले. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर भ्रमंती केली. मूल जन्माला आले की, लोक नवस फेडण्याच्या निमित्ताने बोकड, कोंबडे कापत. स्वतः दारु पित. पाहुण्यांनाही पाजतात. त्यासाठी सावकाराकडे जमीन गहाण ठेवून कर्ज घेतात. परिणामी कर्जबाजारी होतात. लग्नातही हुंडा देतात. कर्ज काढून विवाह, सणात खोट्या प्रतिष्ठेपायी खूप खर्च करतात. त्यामुळे सावकाराची जप्ती येई. या गोष्टी लक्षात घेऊन रात्रीच्या कीर्तनात बाबा लोकांना आवाहन करत, 'कर्ज काढून सण करु नका, व्यसने करु नका. नवस करु नका, कोबंडे बकरे कापू नका, मुलाबाळांना शाळेत घाला, त्यांना शिकू द्या'

'गोपाळा गोपाळा, देवकी नंदन गोपाळा'

हे त्यांचे आवडते भजन होते. कीर्तनातून ते प्रबोधन करत. प्रबोधनाची भाषा साधी व सोपी अशी लोकांची ग्रामीण बोली असे. त्यांचे अभंगही त्यांनीच रचलेले असत. तुकोबांचे अनेक अभंग बाबांच्या तोंडपाठ होते. 'देव देवळात नसून तो आंधळ्या पांगळ्यांच्या ठिकाणी वसत असतो !' हा त्यांचा आवडता सिद्धांत होता. बाबांच्या विचारांनी प्रभावित होऊन अनेक धनिक मंडळी त्यांना देणग्या देत. या देगण्यांतून त्यांनी शाळा बांधल्या. गरजू विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे बांधली. गोरक्षण शाळा बांधल्या. पाणपोया, अन्नछत्रं आणि वृद्धाश्रमं बांधले. देणगीदारांना पत्र पाठवून त्यांच्या पैशाचा विनियोग कसा केला, हे ते जरुर कळवत. 'संत गाडगे महाराज मिशन' नावाची एक संस्था आज हा सारा व्याप पुढे चालवत आहे.

एकदा कीर्तन करत असताना त्यांचा मुलगा वारला ; अशी बातमी त्यांना आली. परंतु कीर्तन न थांबवता, 'येणारा कधी तरी जाणारच' म्हणून त्यांनी कीर्तन पुढे चालूच ठेवले ! अंधश्रद्धा, अस्पृश्यता, निरक्षरता, व्यसनाधिनता आणि अस्वच्छता या मानवतेच्या खऱ्या शत्रुंच्या विरोधात त्यांनी मोहिम राबवली. त्यांची ही दूरदृष्टी आजही समाजास आवश्यक अशीच आहे. हा आधुनिक संत आणि समाजसेवक २० डिसेंबर १९५६ रोजी वैकुंठवासी झाला.

**रेश्मा नारायण चव्हाण**
टी.वाय.बी.ए. (मराठी)

## छत्रपती शाहू महाराज



'कागल' चे संस्थानिक असणारे घाटगे या घराण्यात शाहुंचा जन्म २६ जुलै १८७४ रोजी झाला. चौथ्या शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर साताऱच्या महाराणींनी शाहूंना दत्तक घेतले. वयाच्या २० व्या वर्षी म्हणजे १८९४ या वर्षी शाहूंना संस्थानचा 'राजा' म्हणून राज्याभिषेक झाला.

अत्यंत रांगड्या व्यक्तिमत्वाचा हा राजा अल्पावधीतच संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झाला. पेशवाईमध्ये दलित, मागासवर्गीय आणि बहुजनांची स्थिती अत्यंत हलाखीची झाली होती. या वर्गासाठी शाहू महाराजांनी जे ऐतिहासिक स्वरुपाचे कार्य केले, त्यामुळे दलित व बहुजन वर्गामध्ये एक नवा आत्मविश्वास आणि स्वाभिमानाचा अंकूर फुटला. राजवाड्यात त्यांनी दलित नोकर ठेवले. भर सभेत दलितांच्या हातचे पाणी पिणे, दलितांना हॉटेल टाकावयास लावून तिथे सर्वांसमक्ष चहा घेणे, प्रशासनात अस्पृशांना मानाची पदे देणे, संस्थांनाच्या नोकऱ्यात बहुजन व दलितांसाठी राखीव जागा ठेवणे ; अशी नाना प्रकारची उपाययोजना करुन त्यांनी काम केले होते. शतकानुशतकांच्या अमानवी शृंखला तोडताना शाहूमहाराजांना प्रचंड त्रास झाला. शैक्षणिक क्षेत्रात महाराजांनी क्रांतिकारी कार्य केले. प्रत्येक जातीतील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी वसतीगृहे सुरु केली. समाजातील सर्व घटकांना शिक्षण मिळाले पाहिजे, असा त्यांचा दृष्टिकोन होता. म्हणून त्यांनी अनेक शाळा, महाविद्यालये आणि वसतीगृहांना सरकारी अनुदाने देऊन प्रोत्साहन दिले. महात्मा फुलेंचा शैक्षणिक दृष्टिकोन त्यांनी पुढे चालवला म्हणून सुशिक्षित स्त्रियांचे प्रमाण वाढले.

शाहूमहाराजांनी ब्राहणांच्या अहंकाराला आणि मनमानीपणाला पहिल्यांदा लगाम लावला. त्यासाठी भिक्षुकवर्गाशी जबरदस्त संघर्ष केला. वेदोक्त प्रकरणात तर टिळकांनी सरळ सनातनी ब्राह्मणांची बाजू घेतली, परंतु या वादात राजर्षी शाहूमहाराजांचा निर्विवादपणे विजय झाला. या प्रकरणामुळे महाराष्ट्रात ब्राह्मण व ब्राह्मणेतर असे दोन गट पडले. १९०२ मध्ये त्यांनी कोल्हापूर राज्यात पन्नास टक्के जागा या ब्राह्मणेतरांसाठी राखीव ठेवल्या. १९१७ साली 'मोफत प्राथमिक शिक्षण' ही योजना राबवली. १९२० साली वेठबिगारीची पद्धत बंद करुन टाकली. अस्पृश्यांना प्रतिष्ठेचे जीवन जगता यावे, म्हणून त्यांना त्यांच्या आवडीचा व्यवसाय करण्यासाठी परवानगी व अर्थसहाय्य केले. ब्राह्मणेत्तर चळवळीला आर्थिक व राजकीय ताकद पुरवताना त्यांनी ब्राह्मणेत्तर पत्रकारितेलाही भरपूर अर्थसहाय्य केले, कारण त्यांचे

महत्त्व त्यांना उमगले होते ! शाहू महाराजांवर आर्यसमाजाचा मोठा प्रभाव होता. या समाजाच्या परिषदांना ते उपस्थित राहत. परंतु ज्योतिबा फुलेंच्या सत्यशोधक समाजालाही त्यांनी पाठिंबा दिला. १९१३ मध्ये कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची जी शाखा सुरु करण्यात आली, तिची प्रेरणाच महाराज होते !

शेतकऱ्यांच्या हलाखीची परिस्थितीस कारण ठरलेल्या दुष्काळ व अवर्षण यावर मात करण्यासाठी 'राधानगरी' धरणाचा प्रकल्प उभारला. सुधारित पद्धतीने शेती करता येते, हे त्यांनी आपल्या युरोपच्या प्रवासात पाहिले होते. तो प्रयोग संस्थानात करण्यासाठी त्यांनी 'आधुनिक शेती संस्था' स्थापन केली. शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळण्यासाठी व व्यापार वाढवण्यासाठी 'शाहुपुरी' नावाची सर्व सोयीसुविधांनी युक्त अशी बाजारपेठ उभी केली. रोममध्ये त्यांनी पाहिलेल्या कुस्तीच्या आखाड्याचे मैदान कोल्हापुरात बांधून घेतले. तरुणांना कुस्ती, कबड्डी, मल्लयुद्ध आदी मैदानी खेळांसाठी शासकीय अनुदान देऊन प्रोत्साहन दिले. 'कुस्ती' या क्रीडा प्रकारावर प्रेम करणारा, स्वत: 'पैलवान' असणारा शूर व धाडसी राजा खेळाचा व सांस्कृतिक परंपरेचा रसिक होता. सर्वच कलाप्रकारांना महाराजांनी राजाश्रम दिला. वयाच्या अवघ्या ४८ व्या वर्षी हा लोककल्याणकारी राजर्षी हे जग सोडून गेला.

**नवनाथ विलास भागवत**
टी.वाय.बी.ए. (मराठी)

## महात्मा गांधी



२ ऑक्टोबर १८६९ रोजी मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म गुजरात राज्यातील 'पोरबंदर' या गावात झाला.

१८८७ मध्ये ते मॅट्रिक उत्तीर्ण होऊन बॅरिस्टर होण्यासाठी १८८८ मध्ये इंग्लंडला रवाना झाले. १८११ मध्ये बॅरिस्टर होऊन ते भारतात परतले. मुंबई येथे उच्च न्यायालयात त्यांनी वकिली सुरु केली. त्यांच्या अंगी असलेला पराकोटीचा प्रामाणिकपणा व सत्य बोलण्याचा आग्रह, यामुळे वकिली व्यवसाय करणे अवघड होऊन बसले. दरम्यान कएा हिंदी कंपनीचे वकीलपत्र घेऊन एक खटला चालवण्यासाठी त्यांना दक्षिण आफ्रिकेला जावे लागले. त्या ठिकाणी त्यांना वर्णभेदाला सामोरे जावे लागले. काळा आणि गोरा असा भेद तेथे शिगेला पोहचला होता. आशियायी लोकांना कृष्णवर्णीय म्हणून अतिशय तुच्छ वागणूक मिळत होती. त्या विरोधात त्यांनी आफ्रिकेत संघर्ष सुरु केला. आशियायी बांधवांच्या हक्कासाठी सुरु केलेल्या लढ्याचे मुखपत्र म्हणून त्यांनी 'इंडियन ओपिनियन' हे वृत्तपत्र सुरु करुन लढा आणखी तीव्र केला. हा संघर्ष त्यांनी सत्याग्रहाच्या व उपोषणाच्या मार्गाने दिला. त्यामुळे सर्वजण चकीत झाले. सत्याग्रह आणि बहिंसेच्या मार्गाने लढा देता येतो व आपले स्वातंत्र्य व मुलभूत हक्क मिळवता येतात, हे गांधीजीने दाखवून दिले.

दक्षिण आफ्रिकेच्या वास्तव्यात मोहनदास नावाचा हा तरुण वकील अंतर्बाह्य बदलून गेला आणि 'महात्मा गांधी' म्हणून जगाला एक नवा दीपस्तंभ मिळाला. अखेर 'सत्याग्रह' नावाच्या अस्त्रापुऐ दक्षिण आफ्रिकेचे सरकार नमले व तेथील कृष्णवर्णीयांचे जगणे सुसह्य झाले. याच दरम्यान भारतात

ब्रिटिश विरोधी चळवळ सुरु होती. गोपाळ कृष्ण गोखले यांनी गांधींना भारतात येऊन काँग्रेसच्या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळीत झोकून देण्याचे आवाहन करुन भारतभ्रमण करण्याची सुचना केली. महात्मा गांधी गोखलेंना आपले 'राजकीय गुरु' मानत. त्यांची सुचना आज्ञा मानून ते भारतात परतले आणि काँग्रेसच्या कार्यात झोकून दिले. १९१७ मध्ये त्यांनी बिहारमधील चंपारण्य जिल्ह्यात निळीच्या मळ्यात काम करणाऱ्या मजुरांची पिळवणूक थांबवण्यासाठी सत्याग्रह केला. युरोपियन मळेवाल्यांनी स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावून निळीचे मळे उभे केले. त्यात ते मजुरांकडून कमी पैशात जास्त काम करुन घेत. या सत्याग्रहाने संपूर्ण भारताचे लक्ष वेधून घेतले. युरोपियन उद्योजक वठणीवर आले. १९१८ मध्ये गुजरात मधील 'खेडा' येथे गांधीजींनी गरीब शेतकऱ्यांकडून अव्वाच्या सव्वा शेतसारा वसूल करणाऱ्या ब्रिटिश शासनाविरोधात मोठे सत्याग्रहाचे आंदोलन उभे केले. त्यांच्या अहिंसेच्या आंदोलनाने इंग्रज सरकारही गोंधळून गेले.

१९२० मध्ये लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधीकडे आले. त्यानंतर त्यांनी असहकार चळवळ सुरु केली. ब्रिटिशांना कोणतेही सहकार्य करायचे नाही. हा या चळवळीचा आशय होता. त्यास स्वदेशी चळवळीची जोड दिल्यामुळे ब्रिटिश सरकार हादरले ! महात्मा गांधीजींनी वापरलेल्या या अभिनव शस्त्राने संपूर्ण जग आश्चर्यचकीत झाले !! १२ मार्च १९३० रोजी गांधीजींनी 'सविनय कायदेभंग' ची चळवळ सुरु करुन दांडी यात्रा काढली. साबरमती आश्रम ते दांडी हे २५० मैलांचे अंतर त्यांनी पदयात्रा काढून कापले व मिठावर बसवलेला कर धुडकावून लावला. १९४२ च्या 'चले जाव' आणि 'करा किंवा मरा' असे आदेश त्यांनी काँग्रेसच्या पुढारी, कार्यकर्ते आणि भारतीय जनतेला देऊन उरली सुरली ब्रिटिश सत्ता डळमळीत करुन टाकली. अखेर गांधीजींच्याच नेतृत्त्वात भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. भारतीय जनतेने त्यांना 'राष्ट्रपिता' ही पदवी दिली. गांधीजींनी आपल्या मतांचा व भूमिकांचा समाजात प्रसार व्हावा म्हणून 'यंग इंडिया' नावाचे वृत्तपत्र चालवले. स्वदेशीचा प्रसार व्हावा म्हणून खादीचे कपडे वापरण्याचा ते आग्रह धरत. दलितांना ते 'हरिजन' म्हणत. जातीभेद त्यांना मान्य नव्हता. 'अस्पृश्यता' ही परमेश्वराला मान्य नसून सारीच परमेश्वराची लेकरे आहेत, असे ते मानत. 'राजा राम पतित पावन सीता राम' हे त्यांचे आवडते भजन होते.

'माझे सत्याचे प्रयोग' हे त्यांनी लिहिलेले पुस्तक प्रचंड गाजले. 'खेड्याकडे चला' असा नारा त्यांनी देऊन संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित केले. भारत-पाकिस्तान फाळणीस गांधीजींना जबाबदार ठरवून हिंदू धर्माच्या ठेकेदारांनी त्यांची ३० जानेवारी १९४८ या दिवशी हत्या केली. एका महान युगकर्त्याचा अंत झाला.

**प्रणिता विश्वनाथ शिंदे**
टी.वाय.बी.ए. (मराठी)



# लोकमान्य टिळक



२३ जुलै १८५६ या दिवशी रत्नागिरी जिल्ह्यातील 'चिखली' या गावी बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म झाला. शालेय जीवनात टिळक कुशाग्र बुद्धिमत्तेचे आणि एकपाठी होते. पुढील शिक्षणासाठी टिळक पुण्यात आले. तेथील 'डेक्कन' या प्रसिद्ध महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला. गंजपेठेतील लहुजी वस्ताद यांच्या तालमीत जाऊन त्यांनी व्यायाम व कुस्तीचे धडे घेतले.

१८७१ मध्ये त्यांचा विवाह झाला, तर १८७२ मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. १८७७ साली त्यांनी डेक्कन कॉलेजमधून पदवी प्राप्त केली. नंतर त्यांनी कायद्याचा अभ्यास सुरु केला. या काहात त्यांना गोपाळ आगरकर व चिपळूणकर हे मित्र मिळाले. आपल्या मित्रांसमवेत त्यांनी ब्रिटिशांच्या विरोधात रणशिंग फुंकले. स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर, लोकांना जागे करणे आवश्यक होते. त्यासाठी शिक्षणाचा प्रसार होणे आवश्यक होते, म्हणून टिळकांनी आगरकर व चिळूणकरांच्या मदतीने 'न्यु इंग्लीश स्कूल' ही शाळा सुरु केली. २४ ऑक्टोबर १८८४ रोजी पुणे येथे 'डेक्कन एज्युकेशन महाविद्यालयाची' स्थापना केली. याच संस्थेने २ जानेवारी १८८५ या दिवशी 'फर्ग्युसन महाविद्यालय' सुरु केले. या महाविद्यालयातून राष्ट्रवादी विचारांचे हजारो विद्यार्थी बाहेर पडले ! लोकांमध्ये राष्ट्रवादी विचारांची जोपासना करण्यासाठी २ जानेवारी १८८१ रोजी त्यांनी 'मराठा' हे इंग्रजी वर्तमानपत्र सुरु केले. ते 'मराठा' चे संपादक म्हणून काम पाहू लागले. ४ जानेवारी १८८१ रोजी 'केसरी' हे मराठी वर्तमानपत्र सुरु करुन त्याची जबाबदारी आगरकरांवर टाकली. या वृत्तपत्रांनी समाजप्रबोधनाचे काम चोख बजावले. हिंदुस्थान हे एक अखंड राष्ट्र आहे, ही भावना टिळकांनी लोकांमध्ये रुजवली. जनतेमध्ये वैचारिक आदान प्रदान व्हावे व ऐक्याची भावना निर्माण व्हावी, म्हणून १८९३ मध्ये टिळकांनी 'गणेशउत्सव' व १८९५ मध्ये 'शिवजयंती' सुरु करुन लोकांची राष्ट्रीय अस्मिता जागी केली. १५ एप्रिल १८९६ रोजी रायगडावर शिवजंयतीचा सोहळा आयोजित करुन आपल्या दैदिप्यमान इतिहासाचे भान करुन दिले. वृत्तपत्र आणि वक्तृत्व या माध्यमातून त्यांनी इंग्रजांच्या विरोधात रान पेटवले. म्हणून एक इंग्रज विचारवंत 'व्हॅलेटाईन चिरोल' त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' असे संबोधतो.

१८८९ मध्ये टिळकांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे काँग्रेसमध्ये क्रान्तिकारी बदल होऊन आधी 'राजकीय सुधारणा व नंतर समाजसुधारणा' अशी जहाल भूमिका टिळकांनी मांडली. 'जहालवादी' म्हणूनच ते ओळखले जातात. १८९६ मध्ये पुण्यात प्लेगची साथ आली. तसेच अवर्षण होऊन दुष्काळ पडला. परंतु सरकार निष्क्रिय होते. अधिकारी लोकांना त्रास देत. म्हणून टिळकांनी केसरीतून सरकारचे 'डोके ठिकाणावर आहे काय ?' हा जळजळीत अग्रलेख लिहिला. त्यामुळे ब्रिटिशांच्या विरोधात जनमत प्रक्षुब्ध झाले. चाफेकर नावाच्या तरुणाने रँड नावाच्या एका ब्रिटिश अधिकाऱ्याला गोळ्या घालून मारले. परिणामी टिळकांना २७ जुलै १८९७ रोजी सरकारने अटक करुन त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. त्यांना १८ महिन्यांची शिक्षा सुनावली.

१९०५ मध्ये गर्व्हनर जनरल कर्झनने बंगालची फाळणी केली. हिंदू मुसलमानात फूट पाडून देशाचे विभाजन करण्याचा सरकारचा डाव टिळकांनी ओळखून प्रचंड आंदोलन उभे केले. परदेशी मालावर बहिष्कार टाकण्याचे आंदोलन चालवल्यामुळे ब्रिटिश सरकार हादरले. बंगालची फाळणी सरकारने रद्द केली. परंतू केसरीतून लेख लिहून व प्रक्षोभक

भाषणे करुन ब्रिटिश साम्राज्य उलथून टाकण्याचा राजद्रोहाचा आरोप ठेवून २४ जून १९०८ रोजी टिळकांना अटक केली व त्यांना सहा वर्षांची कारावासाची शिक्षा सुनावली. त्यांना ब्रह्मदेशात मंडाले येथील तुरुंगात एकांतवासात ठेवण्यात आले. याच तुरुंगात त्यांनी 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला. 'ओरायन' व 'दी आर्क्टिक होम इन दी वेदाज' हे दोन ग्रंथही टिळकांनी तेथेच पूर्ण केले. त्यांच्या अचाट बुद्धीसामर्थ्याने विचवारवंतांचे डोळे दिपून गेले. वैज्ञानिक संदर्भ व संशोधन मूल्य असलेली त्यांची ही ग्रंथसंपदा जगभर मान्यता पावली आहे.

१९१४ साली टिळकांची मंडाले मधून मुक्तता करण्यात आली. होमरुल आंदोलनात त्यांनी 'स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' अशी घोषणा केली. तिला प्रचंड प्रसिध्दी मिळाली. 'टिळक हिंदू धर्मातील जातीव्यवस्थेचे समर्थक असून कर्मकांडांना त्यांचा विरोध नव्हता', असा गंभीर आरोप त्यांचे विरोधक करत.

अखेर १ ऑगस्ट १९२० रोजी मुंबई येथे सरदारगृहात हा तळपता सूर्य अस्ताला गेला.

**पायल नवनाथ खोडदे**
टी.वाय.बी.ए. (मराठी)

## आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे रहस्य उलगडणे : भविष्यातील प्रवास

तंत्रज्ञानाच्या सतत विकसित होत असलेल्या लँडस्केपमध्ये एक संकल्पना सर्वोच्च आहे : आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय). आपण वापरत असलेल्या स्मार्टफोनपासून स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवर मिळणाऱ्या शिफारशींपर्यंत आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये त्याची उपस्थिती आहे. परंतु एआय म्हणजे नेमके काय आणि त्यात इनके अफाट आश्वासन आणि कुतूहल का आहे ?

त्याच्या मुळाशी, एआय म्हणजे मशीन, विशेषत: संगणक प्रणालीद्वारे मानवी बुद्धिमत्ता प्रक्रियेचे सिम्युलेशन. या प्रक्रियांमध्ये शिकणे (माहिती चे संपादन आणि माहिती वापरण्यासाठी नियम), तर्क (अंदाजे किंवा निश्चित निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी नियमाचा वापर करणे) आणि स्वयं-सुधारणा यांचा समावेश आहे. एआयचे अंतिम ध्येय म्हणजे अशी प्रणाली तयार करणे जे सामान्यत: मानवी बुद्धिमत्तेची आवश्यकता असणारी कार्ये करु शकतात. आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे आकर्षण त्याच्या अमर्याद क्षमतेत आहे. हेल्थकेअरपासून फायनान्सपर्यंत, शिक्षणापासून मनोरंजानापर्यंत, एआयमध्ये उद्योगांमध्ये क्रांती घडवून आणण्याची प्रक्रिया सुरळीत करण्याची आणि निर्णय क्षमता वाढविण्याची क्षमता आहे.

उदाहरणार्थ, हेल्थकेअरमध्ये, एआय-संचालित निदान साधने उल्लेखनीय अचूकतेसह वैद्यकीय प्रतिमांचे विश्लेषण करु शकतात, ज्यामुळे रोगांचे लवकर निदान करण्यात डॉक्टरांना मदत होते. फायनान्समध्ये, एआय अल्गोरिदम बाजाराच्या ट्रेंडचा अंदाज लावू शकतात आणि पूर्वीपेक्षा अधिक अचूकतेने गुंतवणुकीच्या संधी ओळखू शकतात.

तथापि, एआयची पूर्ण क्षमता ओळखण्याच्या दिशेने प्रवास त्याच्या आव्हानांशिवाय नाही. अल्गोरिदममधील पूर्वग्रह आणि नोकरीच्या विस्थापनाची संभाव्यता यासारख्या नैतिक विचारांकडे काळजीपूर्वक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. हे धोके कमी करण्यासाठी एआय प्रणाली निष्पक्ष, पारदर्शक आणि जबाबदार आहेत याची खात्री करणे महत्वाचे आहे. याव्यतिरिक्त, डेटा गोपनीयता आणि सुरक्षिततेबद्दल चिंता आहे, कारण एआय सिस्टम प्रभावीपणे कार्य करण्यासाठी मोठ्या प्रमाणात डेटावर अवलंबून असतात.

ही आव्हाने असूनही, एआयमधील वेगवान प्रगती आश्चर्यचकित आणि प्रेरणा देत आहे. मशीन लर्निंग, नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग आणि रोबोटिक्स मधील यशामुळे एकेकाळी जे शक्य वाअले होते त्याच्या सीमा ओलांडल्या जात आहेत. उदाहरणार्थ, सेल्फ - ड्रायव्हिंग कारच्या विकासामुळे वाहतुकीत क्रांती होईल, रस्ते सुरक्षित होतील आणि वाहतूक कोंडी कमी होईल. शिवाय, एआय म्हणजे केवळ मानवी बुद्धिमत्तेची नक्कल करणे नव्हे तर ती वाढविणे देखील आहे. मानव-कृत्रिम बुद्धिमत्ता सहकार्यात सर्जनशीलता, नावीन्य आणि उत्पादकतेचे नवीन स्तर उघडण्याची क्षमता आहे. एआय साधनांचा वापर करुन, कलाकार अभूतपूर्व कलाकृती तयार करु शकतात, शास्त्रज्ञ अभूतपूर्व शोध लावू शकतात आणि शिक्षक विद्यार्थ्यांसाठी शिकण्याचे अनुभव वैयक्तिकृत करु शकतात.

आर्टिफिशियल इंटेलिन्सने परिभाषित केलेल्या नव्या युगाच्या उंबरठ्यावर आपण उभे असताना, त्याच्या विकासाकडे आणि तैनातीकडे सावधगिरीने आणि दूरदृष्टीने पाहणे आवश्यक आहे. धोरणकर्ते, तंत्रज्ञ, नीतिशास्त्रज्ञ आणि एकूच समाज यांच्यातील सहकार्य एआय-संचालित भविष्य घडविण्यासाठी आवश्यक आहे ज्याचा सर्वांना फायदा होईल. शेवटी, कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या काळातील सर्वात गहन तांत्रिक प्रगतीपैकी एक आहे.उद्योगांमध्ये बदल घडवून आणण्याची, मानवी क्षमता वाढवण्याची आणि जगातील काही महत्त्वाच्या आव्हानांना सामोरे जाण्याची त्याची क्षमता अफाट आहे. तथापि, ही क्षमता ओळखण्यासाठी नैतिक, सामाजिक आणि आर्थिक परिणामांचा काळजीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे. एआय जबाबदारीने आणि नैतिकतेने आत्मसात करुन, आपण बुद्धिमान मशीनद्वारे चालविलेल्या उज्ज्वल, अधिक सर्वसमावेशक भविष्याकडे वाटचाल करु शकतो.

**कायनात खान, महामुनी शितल**
एस.वाय.बी.एस्सी.

## आनंद द्विगुणीत करा

आपलं मन सक्रिय राहण्यासाठी सतत एक प्रेरणा हवी असते. पण ही प्रेरणा ज्या गोष्टींमधून मिळते, त्याच आज थांबलेल्या, अनिश्चित अवस्थेत आहेत. रोजच्या आयुष्यात शिक्षण, उत्तम करिअर आणि स्वप्नांचा पाठलाग करण्याची तयारी करत असतो. मग प्रवेश परीक्षा, नियमित अभ्यास, चांगल्या नोकरीच्या पर्यायाचा शोध, नोकरीतून मिळणारा आर्थिक मोबदला, व्यवसायाचे नियोजन यांसारख्या गोष्टींतून सक्रिय राहण्याची प्रेरणा मिळत असते. मात्र, सध्या याबाबची अनिश्चितता मानसिक आरोग्य खालावण्यात हातभार लावत आहे. प्रेरणेचा अभाव, अनासक्ती वाटणे, आयुष्यातला अर्थ हरवल्यासारखा वाटणे, उदास वाटणे, मन कशात न रमणे आणि यांची तीव्रता वाढली, तर नैराश्य अशा लक्षणांमध्ये रुपांतरित होऊ शकते.

प्रेरणा पुन्हा शोधून आणणं हा एक मस्त सकारात्मक उपाय यावर लागू पडेल. त्यासाठी एखादा आनंददायी, स्वत:च्या आवडीनुसार एखादा प्रकल्प हाती घेणं आपल्याला उपयोगी पडेल. म्हणजे काय, तर साधारण अजून काही आठवडे लॉकडाऊन चालू राहणार आहे हे जर गृहित धरलं, तर त्या काळात आपल्याला आनंद देईल किंवा आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास होईल असा, वैयक्तिक, व्यावसायिक किंवा शैक्षणिक पातळीवरचा एखादा उपक्रम हाती घेणं.

कॉलेजमध्ये दुर्लक्षित झालेल्या एखाद्या विषयाची

उजळणी कोणत्या रंजक, नव्या पद्धतीनं करता आली तर ? अभ्यास व कॉलेजमुळे गाणं सुटलं असेल तर आता नव्यानं काही रियाज, नवी गाणी बसवणं, जुन्यांची उजळणी असं काही करता येईल का ? वाचनाची आवड असणाऱ्यांनी वाचनाचा प्रकल्प हाती घेणं, आपापले छंद पुनरुज्जलीवित करणं, असं काही करता येईल. स्वयंपाक, घरकाम व त्या निमित्ताने स्वावलंबन शिकून घेणे हा सुद्धा एक मस्त उपक्रम ठरु शकतो. अर्थात तो मुलं आणि मुली दोघांसाठी महत्त्वाचा आहे. शिक्षण व नोकरीच्या निमित्ताने कुटुंबापासून लांब, एकटं रहावं लागणं हे नेहमीचं झालं आहे. त्यामुळे स्वत:ची काळजी घेता येणं, स्वयंपाक, घराची स्वच्छता, अगदी कपडे–भांडी स्वच्छ करणं हे सुद्धा करता येणं काळाची गरज आहे. घरकाम करणाऱ्या मावशी येऊ शकत नसल्याने यानिमित्ताने थोडीफार मदत होईल.

**उपक्रम कसा असावा ?**

- आपल्याला आनंद मिळणं किवा कोणत्याही प्रकारचं शिक्षण मिळणं आवश्यक आहे.
- या प्रकल्पाला काहीतर मोजमाप करता येईल असे रुप हवं.ढोबळ काहीतरी करण्यापेक्षा रोज एक तास वाचन किंवा आठवड्याला एक गाणं, असं काहीतरी मोजता येईल असं ठरवलं तर मनाला स्पष्टता येईल.
- महत्त्वाची गोष्ट म्हणजे नियमितता. रोज एखादी कृती करणं आपल्या मनाला स्थिरतेकडे न्यायला मदत करतं. नियमितता, आपल्या मनाला गुंतवून ठेवते, सुरक्षिततेची भावना निर्माण करते व रोजचा टास्क पूर्ण केल्यानंतर काही करुन दाखवल्याचं समाधान सुद्धा देते. यासोबतंच आत्मविश्वास, आयुष्यातला अर्थ व आनंद यांची जाणीव नव्याने होते.

**मनाचं समाधान महत्त्वाचं**

मला या 'प्रोजेक्ट लॉकडाऊन' चा खूप सुंदर अनुभव आला. मी ज्ञानार्जन व आनंदार्जन एकत्र करण्याचं ठरवलं. म्हणजेच आवडीच्या क्षेत्रातलं नवं शिकण्याचा विचार केला. शाळेत असताना पेंटिंगची मला खूप आवड होती. तेव्हा चारकोल व ॲक्रेलिक पेंटिंग करायचे. पण वॉटरकलर शिकले नव्हते. पण लॉकडाऊनमध्ये हे चॅलेंज स्वीकारलं. यू ट्यूब व काही पुस्तकांचा आधार घेऊन रोज एक पेंटिंग करायचं ठरवलं. कुठल्याही समाजमाध्यमांवर टाकण्याची घाई न करता, नितळ आनंदाखातर हे केलं आणि या प्रोजेक्टमुळे आज माझं छोटं प्रदर्शनच भरेल एवढी चित्र तयार झाली. शिवाय चित्र काढणं हा माझ्यासाठी मेडिटेशनचा प्रकार झाला. त्यातून नवं कौशल्य शिकल्याचा आनंद वेगळाच. मन शांत राहणं हा त्याचा अजून एक फायदा म्हणता येईल. रोज सकाळी उठताना आज कोणतं पेंटिंग करायचं ही नव्या दिवसाबद्दलची उत्सुकता तात्पुरती का होईना पण सध्याच्या आयुष्याला मस्त अर्थ देऊन जाते.

**संवाद साधू या ?**

आपल्या आयुष्याला नेहमीसुद्धा खोलवर अर्थ देणारी गोष्ट म्हणजे आपली नाती, आपली माणसं. या नात्यांना नवजीवन देणं हेही एक सुंदर सकारात्मक काम असू शकतं. दूर असलेली मित्रमंडळी, बऱ्याच दिवसात, वर्षात संपर्क तुटलेली काही नाती या वेळेत एकमेकांशी बोलून फुलवली जाऊ शकतात. यासाठी इंटरनेट व व्हिडीओ कॉलिंग आहेच. आताचा वेळ ही त्या नात्यांसाठी एक सुवर्णसंधी आहे. संवाद ही साधी सोपी गोष्ट त्या व्यक्तिंनरा परत तुमच्या जवळ आणू शकेल. दूरच्या नात्यांबरोबरच घरातली, जवळची नाती नव्याने खुलवण्यासाठी सुद्धा ही वेळ उत्तम आहे. आपले पालक, बहिणभावंड, आजीआजोबा व तुमच्यासोबत राहणाऱ्या व्यक्ती असतील, त्यांच्याशी रोजच्या घाईगडबडीत आपला अर्थपूर्ण संवाद होत नसे. आता सक्तीनं का होईना पण सगळ्यांना एकत्र वेळ मिळाल्याने संवाद साधणं सकारात्मक अनुभव देऊ शकतं.

आनंद असा छोट्या उपक्रमांमधून मिळत असतो.

**प्रा.डॉ.सुदाम वीर**
(वाणिज्य विभाग)

## आनंद

'कोणीतरी आपलं ऐकून घेतंय' ही मोलाची भावना घरातल्या जवळच्या नात्यांना देणं आपल्याला मनस्वी समाधान देणारं ठरु शकतं.

या निमित्ताने मला वैयक्तिक पातळीवर अनेक नव्या जाणीवा झाल्या. आपण अनेक गोष्टींना रोजच्या जीवनात नकळत गृहित धरत होतो. घरकाम करणाऱ्या मावशींमुळे आपला केवढा वेळ रोज वाचतो, हे त्यांना सुट्टी दिल्यावर लक्षात आलं. घरात असलेलं अन्नधान्य, भाज्या-फळं, पुरवून, वाया न घालवता कसं वापरायला हवं ते समजलं. वास्तविक आपल्याकडे अशा कित्येक गोष्टी आहेत. ज्यांच्यासाठी कृतज्ञ राहू शकतो, त्या आपल्याकडे आहेत म्हणून आनंदी राहू शकतो, याची रोज नव्याने जाणीव होत आहे. ही नवी कृतज्ञतेची भावना जोपासणं मनाला आनंद व समाधान देते आहे. रोज अशा चार गोष्टींची यादी करणं हा एक नवा छंदच बनला आहे. तुम्हीही असं काहीतरी करुन पहायला हरकत नाही. अगदी आपल्या घरात प्यायचं, वापरायचं पाणी येतं, रोज खाली कचरा घेऊन जाणारी गाडी येते, घरातून काम करण्यासारखं माझं काम आहे, इंटरनेट, फोन यासारखी साधनं आहेत, प्रेमाची माणसं आपल्या आयुष्यात आहेत, डॉक्टर, पोलिस व अत्यावश्यक सेवा पुरवणारे कर्मचारी अहोरात्र आपल्यासाठी काम करत आहेत. या आणि अशा अनेक गोष्टी खरंच विचार करायला लावतात. की आजपर्यंत आपण गृहित धरत असलेलं हे आयुष्य एका प्रकारे आपल्याला 'आपण किती भाग्यवान आहोत' ही आठवणंच करुन देऊ पहातंय का ?

वरील चिंतनावरुन आपलं मन सक्रिय राहण्यासाठी जगण्यामध्ये आनंद आवश्यक असतो. रोजच्या जीवनामध्ये छोट्या छोट्या गोष्टीत आनंद मिळतो. यामुळे मन प्रसन्न राहते. यामून आपण आनंद द्यावा आणि घ्यावा. यानिमित्ताने सांगावेसे वाटते, की एखाद्या गरजुला मदत केली, गरिबाला अन्नदान करणे, वृद्धांची सेवा करणे यातून खरच किती आनंद मिळतो.

**आरती ज्ञानदेव गायखे**
टी.वाय.बी.कॉम.

## युवा जागर



युवक निष्क्रीय कधीच नव्हता आणि यापुढेही असू शकणार नाही, फक्त त्याची कार्यक्षमता कुठे व्यस्त होते यावर बऱ्याचशा गोष्टी अवलंबून आहेत. आज स्वत:ला व्हाईट कॉलर समजून घेणारा वर्ग मग ते पालक असोत किंवा युवक यांना आठवड्याच्या कष्टानंतर विश्रांती म्हणून विकएन्डच्या नावाखाली वेगवेगळ्या सेलीब्रेशनला महत्त्व दिले जाते. पार्टी आणि पार्ट्यांमधल्या नशा हे आधुनिक जिवन शैलीचं प्रमाणं मानलं जावू लागलं आहे. स्टेटस सिंबॉलच्या नावाखाली ज्या काही गोष्टी केल्या जातात त्यातून व्यक्ती जास्तीत जास्त स्वार्थी बनत चालला आहे. त्यापेक्षाही महत्वाचं की तो सामाजिकदृष्ट्या निष्क्रीय होत चालला आहे. याचाच फायदा घेऊन काही अपप्रवृत्तींनी सामाजिक व्यवस्था आपल्या हातात घेतली. राजकारण एक शाप असल्यासारखं किंवा राजकारण एक वाईट क्षेत्र असल्याचं चित्र डोळ्यासमोर ठेऊन युवकांना गाफिल ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे फेसबुक, ट्वीटर व कॉलेज कट्ट्यावरील गप्पांच्या फडामध्ये राजकारण व राजकारण्यांना दुषणे देण्यापलीकडे फारस काही करण्याच्या भानगडीत युवक पडत नाही. अशावेळी जेव्हा २०२० साली भारताने महासत्ता बनण्याचं स्वप्न बघितले ते पुर्ण करण्यासाठी

आवश्यक असणारी युवकांची संख्या जास्तीत जास्त प्रमाणामध्ये असणारा आपला हा भारत देश चालवायचा कसा याचा विचार होणे गरजेचं आहे. राजकारण हा प्रत्येकाच्या आयुष्याचा अविभाज्य घटक आहे. जीवनाच्या बहुतांशी महत्त्वाच्या प्रश्नांसाठी किंवा समस्यांसाठी राजकीय व्यवस्थेवर अवलंबून रहावे लागते. जर असे असेल तर एक युवक म्हणून आपले एकूण राजकारण आणि समाजकारण युवक कधी जाणून घेणार ? युवक म्हणून आपले एकूण राजकारण आणि समाजकारण युवक कधी जाणून घेणार ? युवक म्हणून आपण व्यवस्था बदलू शकतो अस पोकळ आत्मविश्वासाने बढाया मारण्यापेक्षा लोकशाहीच्या हितासाठी, लोकशाही जाणून घेण्यासाठी शिक्षण आणि प्रसाराच्या माध्यमातून देशातील घटना, राजकीय आणि सामाजिक व्यवस्था शिकवली जाते. संविधान समजून सांगितले जाते. पण ते पेपरमध्ये उत्तरे लिहिण्याच्या पलीकडे वास्तवात वापरण्यासाठी त्याचा विचार केला जात नाही.

एका बाजूला मुबलक प्रमाणामध्ये बहुतेक साधनांची कमाई केल्यामुळे ऐशोआरामामध्ये जीवन जगत असताना स्टेटस सिंबॉल म्हणून किंवा आठवडाभर आलेला क्षीण घालवण्यासाठी विकएन्ड सेलीब्रेट केला जातो आणि त्यातून संपूर्ण जग विसरुन काही क्षण जगण्याचा अनुभव घेतला जातो. असा युवा वर्ग आहे पण तो काही प्रमाणात तर दुसऱ्या बाजुला मुलभूत गरजेच्या पुर्ततेसाठी अविरत धडपडणारा, कष्ट करणारा आणि स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्यासाठी झटणारा युवा वर्ग आहे. तो मोठ्या प्रमाणात आहे पण त्यालाही आपण जीवनात यशस्वी होऊन विकएन्ड सेलीब्रेशन करत असल्याची स्वप्न पडतात. आज सामाजिक उद्दिष्टाने काम करणाऱ्याला बावळट म्हणून हिणवणारा वर्ग ही वाढायला लागला आहे. असे जरी असले तरी भारताला महासत्ता बनवण्यासाठी ज्यांनी प्रयत्न केले त्यांच्या विचारांनी प्रेरीत होऊन महासत्ता असलेल्या भारतामध्ये राहण्यासाठी उत्सुक असणारा व त्यासाठी व्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी स्वत:एक व्यवस्थेचा घटक बनून व्यवस्थेचा अभ्यास करणारा व संधी मिळताच तीचे परीवर्तनातून सोनं करणारा एक ध्येयवेडा युवा वर्गही आपल्याला याच सामाजिक व्यवस्थेमध्ये पहायला मिळतो. यावरुन आपल्या लक्षात येईल की आपली व्यवस्था खराब आहे असे अजिबात नाही.

संपूर्ण जगाला हेवा वाटावा अश्या मुबलक प्रमाणात नैसर्गिक साधन संपत्ती व मानवी साधन संपत्तीचा सुरेख संगम आपल्या देशामध्ये आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये स्वकर्तृत्वाने जगाचे नेतृत्त्व करु शकतील असे वैचारीक व बौद्धिक सामर्थ्य आपल्या युवकांमध्ये आहे. अपप्रवृत्तीला भस्म करु शकेल असा विस्फोट प्रत्येक युवकामध्ये आहे. गरजआहेतीफकक्तएकासृजनशील फुंकाराची, एका जागराची, हा जागर घडवणारा आहे 'युवाजागर अभियान'

• युवकांना युवकांच्या सामर्थ्याची जाणीव निर्माण करुन देण्यासाठी युवकांनी चालवलेले असे हे 'युवाजागर अभियान'.
• युवकांच्या मनामध्ये सामाजिक जाण, जबाबदारी यांचे भान निर्माण करुन, युवकांच्या माध्यमातून सक्रीय, सामाजिक स्थितंतराच स्वप्न पाहणारं अभियान म्हणजे 'युवाजागर अभियान'.
• लोकशाहीच्या रक्षणासाठी अस्तित्वात असणाऱ्या राजकीय व्यवस्थेचं विश्लेषण करुन आपल्या अधिकार व कर्तव्याविषयी जागरुकता वाढवण्याचे अभियान म्हणजे 'युवाजागर अभियान'.
• माझा वेळ आई, वडील, मित्र मैत्रिणी, नातेवाईक याचबरोबर देशाचाही आहे अन् मी देशासाठी द्यायला तयार आहे असं माणनाऱ्या युवकांचा समुह म्हणजे 'युवाजागर अभियान'.
• स्त्री पुरुष समानतेच्या तत्त्वाने सामाजिक अपप्रवृत्तीवर घाव घालून विधायकतेचा डोंगर उभा करण्यासाठी एकत्र आलेला प्रवाह म्हणजे 'युवाजागर अभियान'
• तंत्रशिक्षण आणि माहिती तंत्रज्ञानाबरोबरच सामाजिक मुल्यांची जोपासना करणारा असा हा एक 'युवाजागर

अभियान'.

हा युवा जागर प्रत्येकाने घडवायचा आहे. आपण प्रत्येक जण दर आठवड्याला तीन तासाचा पिक्चर बघतो पण दर महिन्याच्या चौथ्या रविवारी युवकांच्या स्मृतीपटलावर विकसित भारताचा चित्रपट आणि त्या चित्रपटातील नायकाच्या भुमिकेमध्ये भारतीय सर्वसामान्य युवक हे आमचं आजच स्वप्न आपण उद्या सत्यात उतरावयाचं आहे.

**आरती पवार**
टी.वाय.बी.ए. (भूगोल)

## नवीन शैक्षणिक धोरण आणि संत तुकारामांची शिकवण



महाराष्ट्र आणि भारत देशाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आध्यात्मिक जडणघडणीत संत तुकाराम महाराजांची शिकवण दिशादर्शक आहे. देशामध्ये सुरु झालेले नवीन शैक्षणिक धोरणाचा विचार करता आज संस्कारक्षम मूल्यशिक्षणाची घसरण शाळा आणि महाविद्यालयांमध्ये होताना दिसत आहे. ही मूल्य शिक्षणाची घसरण थांबवण्यासाठी संत तुकाराम महाराजांच्या शिकवणीची गरज शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक आहे. म्हणूनच संत तुकाराम महाराजांच्या निवडक अभंगातील शिकवणुकीचा विचार या लेखामध्ये मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

समाजामध्ये प्राचीन, मध्ययुगीन आणि आजच्या काळातही धर्म, पंथ, वंश आणि जातिभेद सुरुच आहे परंतू या सर्वांमध्ये भेदाभेद करु नये अशी शिकवण देणारा एक अभंग आहे.

विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।।१।।
आईकाजी तुम्ही भक्त भागवत । कराल ते हित सत्य करा ।।२।।
कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।३।।
तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दु:ख जीव भोग पावे ।।४।।

सर्व प्राणिमात्र एकाच परमेश्वराची लेकरे आहेत यामध्ये श्रेष्ठ–कनिष्ठ हा भेद करणं अमंगळ आहे म्हणून संत तुकाराम महाराज या अभंगात समाजाला सांगतात हे भागवत भक्तांनो तुम्ही जीवनामध्ये जे कराल ते सत्य करा कोणाचाही तुम्ही मत्सर करु नका ज्याप्रमाणे हात,पाय,नाक,कान,डोळे हे एकाच देहाचे अवयव आहेत यापैकी एकाला जरी सुख किंवा दु:ख झाले त्याचा भोग संपूर्ण देहाला भोगावा लागतो म्हणून तुम्ही चांगले वागा हा अभंग वारकरी संप्रदायाचे ब्रीद वाक्य आहे याच अभंगाची शिकवण नवीन शैक्षणिक धोरणाने स्विकारली तर सुसंस्कारित विद्यार्थी आणि समाज घडेल.

समाजामध्ये आज गरीब आणि श्रीमंत अशी दरी वाढत चालली आहे संत तुकाराम महाराजांनी जनताजनार्दनामध्ये देव पाहावा हे शिकवण दिली.

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।।१।।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।२।।
मृदु सबाह्य नवनीत । तैसे सज्जनांचे चित्र ।।३।।
ज्यासि अपंगिता नाही । त्यासि धरी जो ह्रदयी ।।४।।
दया करणे जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ।।५।।
तुका म्हणे सांगू किती । त्याचि भगवंताच्या मूर्ती ।।६।।

या अभंगांमध्ये संत तुकाराम महाराज म्हणतात की, जो साधू गरीब रंजल्या गांजल्या लोकांचे दु:ख आपले समजून

दूर करतो तोच खरा साधू आहे व देवही आहे अशा साधुचे ह्रदय नवनीतासारखे मऊ आणि प्रेमळ असते. चित्त अतिशय शुद्ध असते. ज्याला या जगामध्ये कोणीच नाही त्याला हा साधू आपल्या ह्रदयाशी धरतो गरीब आणि दु:खी समाजावर तो पुत्रवत प्रेम करतो. समाजामधील असे सज्ञन साक्षात भगवंताच्या चालत्या बोलत्या मूर्ती असतात.

भारतीय संस्कृती मातृदेवोभव, पितृदेवोभव, अतिथी देवोभव: आणि आचार्य देवोभव माणणारी आहे जे आई-वडिल आपल्या मुलांना शिकवितात, चांगले संस्कार करतात अशा सुसंस्कृत मुलांच्या आई वडिलांना संत तुकाराम महाराज धन्यवाद देताना म्हणतात.

आपुलिया हिता असे जो जाणता ।
धन्य माता-पिता तयाचिया ।।१।।
कुळी कन्या-पुत्र होती जी सात्विक ।
तयाचा हरिख वाटे देवा ।।२।।
गीता भागवत करीती श्रवण ।
अखंड चिंतन विठोबाचे ।।३।।
तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा ।
तरी माझ्या देवा पार नाही ।।४।।

संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, साने गुरुजी, अण्णासाहेब हजारे यांना आई-वडिलांनी आध्यात्मिक संस्काराची शिकवण दिली म्हणून ते जगाचे मार्गदर्शक झाले म्हणून त्यांच्या मातृ-पितृ दैवतांना धन्यवाद देणे महत्त्वाचे आहे अशा पवित्र देश आणि कुळामध्ये जन्म घेणाऱ्या कन्या-पुत्रांचा आनंद आणि हेवा महाराजांना वाटतो. जी मुहे कसे जगावे यासाठी गीताग्रंथ व जीवनाचे सार्थक कसे करावे यासाठी श्रीमद्भभागवत ग्रंथाचे श्रवण करतात भगवंताचे अखंडपणे नामस्मरण करतात अशा सात्विक मुला मुलींची सेवा करण्याचे भाग्य मिळावे अशी इच्छा महाराज या अभंगात व्यक्त करतात.

समाजामध्ये आज वृद्धाश्रमांचे प्रमाण वाढत आहे पुंडलिकाने आई-वडिलांची सेवा केली, प्रभू रामचंद्र पितृ वचनासाठी वनवासात गेला त्याच भूमीमध्ये आज मुले आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवतात ही शोकांतिका आहे नवीन शैक्षणिक धोरणात या अभंगातील शिकवण रुजवली तर वृद्धाश्रमांचे प्रमाण कमी होऊन आई-वडील मुलांकडे आनंदाने राहतील भौतिकदृष्ट्या आपण कितीही समृद्ध झालो आणि आपण आपली संस्कृती विसरत चाललो तर विकृतीच वाढेल यासाठी गरज आहे संत तुकाराम महाराजांच्या मूल्य शिक्षणाची.

माणसाचे खरे निस्वार्थी सगे सोयरे हे वृक्षवल्ली आहेत आंबा आपणाला छाया आणि गोड फळे देतो या झाडांचीच मानवाने कत्तल सुरु केली आहे. निसर्गाची जंगले नष्ट करुन मानवनिर्मित सिमेंटची जंगले निर्माण झाल्याने पर्यावरणास धोका निर्माण झालेला आहे या पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी वृक्षवल्ली हे आपले सोयरे आहेत त्यांचा आपण सांभाळ केला पाहिजे हे महाराज या अभंगात सांगतात.

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे ।
पक्षीही सुस्वरे आळविती ।।१।।
येणे सुखेरुचे एकांताचा वास ।
नाही गुणदोष अंगा येत ।।२।।
आकाश मंडप पृथ्वी आसन ।
रमे तेथे मन क्रीडा करी ।।३।।
कथा कमंडलु देह उपचारा ।
जाणवितो वारा अवसरु ।।४।।
हरिकथा भोजन परवडी विस्तार ।
करोनी प्रकार सेवू रुची ।।५।।
तुका म्हणे होय मनासी संवाद ।
आपुलाची वाद आपणासी ।।६।।

वृक्षवल्ली आणि त्या झाडावर सुस्वर आवाजात भगवंताला आळवणारे पक्षी हे आपले सगे सोयरे आहेत या निसर्गाच्या एकांत वासात आपणाकडे कोणताही दोष येत नाही. आकाशाचा मंडप वसुंधरेचे आसन यावर विराजमान झाल्यावर आपले मन रममाण होते होऊन निसर्गाशी खेळू लागते अशा

वनराईमध्ये भगवंताची कथा करण्यास मन आनंदाने तयार होते आणि हरिकथेचे भजन मनामध्ये भक्तीभाव निर्माण करते आणि आपले मन आपल्या मनाशी संवाद करण्यास लागते. महाराजांची ही पर्यावरणाची शिकवण जगाने कृतीमध्ये आणली तर पृथ्वीचा स्वर्ग होण्यास वेळ लागणार नाही.

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये व्यावसायिक शिक्षणावर भर देण्यात आलेला आहे पण हा व्यवसाय कसा करावा धन म्हणजे पैसा कसा कमवावा आणि आपला गृहस्थाश्रम कसा करावा याची शिकवण देणारा हा अभंग मूल्यशिक्षणाची व व्यवसायाची गुरुकिल्ली आहे

जोडूनिया धन उत्तम व्यवहारे ।
उदास विचारे वेंच करी ।।१।।
उत्तमची गती तो एक पावेल ।
उत्तम भोगील जीवखाणी ।।२।।
परोपकारी नेणे परानिंदा ।
परस्त्रिया सदा बहिणी माया ।।३।।
भूतदया गायी पशूचे पालन ।
तान्हलेल्या जीवन वनामाजी ।।४।।
शांतीरुपे नव्हे कोणाचा वाईट ।
वाढवी महत्व वडीलाचे ।।५।।
तुका म्हणे हेचि आश्रमाचे फळ ।
परमपद बळ वैराग्याचे ।।६।।

युवापिढीने व्यवसायाभिमुख शिक्षण घेऊन उत्तम प्रकारे व्यवसाय करावा त्यातून मिळते ते धन म्हणजे लक्ष्मी असते कष्टाने मिळवलेल्या धनावर चांगले जीवन जगता येते तो समाधानी राहतो अशा प्रकारे चांगले जीवन जगणारा परस्त्रिया बहिणी समान मानतो असा मनुष्य गृहस्थाश्रमामध्ये राहतो व गाय, पशु, पक्षी या प्राणीमात्रांचा सांभाळ करतो आपल्या वाडवडिलांचे महत्त्व वाढवित जातो आणि अशा प्रकारचा आश्रम म्हणजे वैराग्यातील गृहस्थाश्रमच असतो अशी महाराज शिकवण देतात.

विज्ञानयुगामध्ये सुद्धा सुशिक्षित लोकांच्या अंधश्रध्दा फारशा कमी झालेल्या दिसत नाहीत या वर्गांच्यासुद्धा अंधश्रद्धा सुशिक्षित आहेत अशा माणसाने भोंदू लोकांच्या नादी लागू नये असे महाराज सांगतात.

ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करोनी म्हणती साधू ।।१।।
अंगा लावून राख । डोळे झाकूनी करीती पाप ।।२।।
दावून वैराग्याच्या कळा । भोगी विषयाच्या सोहळा ।।३।।
तुका म्हणे सांगू किती । जळो तयारी संगती ।।४।।

मोबाईमध्ये सुद्धा अंधश्रद्धांची अंधश्रध्देने माहिती सांगितली जाते हे विदारक सत्य आहे. भोंदू लोकांवर कडाडून ते टीका करतात. नवसायासे पुत्र होती । तरी का करावा लागे पती ।। अशी परखड शब्दात ते अंधश्रध्दा निर्मूलनाचे काम करतात भोंडू अंगाला राख लावतात आणि विषयाचा भोग भोगतात. अशा लोकांची संगती जळो असा स्पष्ट इशारा महाराज देतात.

थोडक्यात नवीन शैक्षणिक धोरणाचा विचार करताना संत तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीतील विचारांचा जर अभ्यास केला तर सुसंस्कृत समाज निर्माण होऊन जगात परमानंदाचे समाधान निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही त्यासाठी गरज आहे संत तुकाराम महाराजांच्या शिकवणुकीचे विचार कृतीत आणण्याची.

**आदेश पिराजी नवले**
एस.वाय.बी.ए. (मराठी)



## प्रवचन

हरे राम हरे राम, राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ।।

–प्रार्थना–

महायोगपीठे तटे भीमरथ्य वरं पुंडरीकाय दातु मुनिंद्रै ।
समागत्य तिष्ठतमानदकंद परब्रह्मलिंग भजे पांडुरंगम ।

–प्रवचन सेवेची ओवी–

तैसे माझा साक्षात्कारी । सरे अहंकाराची वारी ।
अहंकार लोपी अवधारी । द्वैत जाय ।। (ज्ञा. ११–६९४)

**अर्थ –** भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगातात माझे दर्शन झाल्यावर अहंकाराची येरझार संपते आणि अहंकाराचा नाश झाल्यावर द्वैत जाते हे लक्षात ठेव.

**संदर्भ –** प्रस्तुत प्रवचनरुपी सेवेसाठी निवडलेली ओवी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ज्ञानेश्वरी ग्रंथातील विश्वरुपदर्शनयोग या ११ व्या अध्यायातील ६९४ क्रमांकाची ओवी आहे.

**भूमिका –** वारकरी संप्रदायामध्ये अहंकाराला थारा नाही हा अहंकार जाण्यासाठी देवाची व संतांची वारी आहे. अहंकार गेल्यावर भगवंत ह्रदयात नांदतो व मग ठायीच बैसोनी करा एकचित्त या उक्तीप्रमाणे रहावयाचे असते. वारकरी संप्रदायाच्या आचार–विचार प्रणालीने जीवन जगावे म्हणजे घर भगवंताची वस्ती होईल यासाठी वारी असते.

**स्पष्टीकरण –** देहातील अहंकाराचा त्याग करण्यासाठी संतांनी पंढरीची वारी करावी हे सांगितले वारकरी संप्रदाय हा भारतातील सर्वधर्मभाव असणारा संप्रदाय आहे.

**संप्रदायाचा उगम –** वारी म्हणजे येरझार वारकरी म्हणजे कामक्रोध या विकरांवर जो वार करतो तो वारकरी असतो वारकरी संप्रदयाचा उगम सांगणारा एक अभंग आहे.

आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा ।
मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य ।।१।।
मच्छिंद्राने बोध गोरक्षाशी केला ।
गोरक्ष वोळला गहिनीप्रती ।।२।।
गहिनी प्रसादे निवृत्ती दातार ।
ज्ञानदेवा सार चोजविले ।।३।।

भगवान शंकर, मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, निवृत्तीनाथ, ज्ञानदेव अशी वारकरी संप्रदायाच्या उगमाची परंपरा आहे यास माळकरी, भागवत पंथ असेही म्हणतात.

**संस्थापक –** संत ज्ञानेश्वर महाराजांनी या भागवत पंथाची स्थापना केली. शके १२१२ साली नेवासा या गावी पैस नावाच्या खांबाला पाठ टेकून संस्कृतमधील गीतारुपी ज्ञानभंडार ज्ञानेश्वरीच्या रुपाने मराठी भाषेत आणले.

संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।

**धर्ममुद्रा –** श्री विठ्ठल ही वारकरी संप्रदायाची धर्ममुद्रा आहे.

धर्माची तू मूर्ती । पाप पुण्ये तुझे हाती ।।

**देवता –** महाराष्ट्राचे आराध्य दैवत भूवैकुंठ पंढरपुरामध्ये करकटेवर हात ठेवून भक्तांची वाट पाहणारा श्री विठ्ठल वारकरी संप्रदायाची देवता आहे.

विठो माझा लेकुरवाळा असा हा देव आहे.

**कुळाचार –** श्री विठ्ठलाची पूजा नामस्मरण हा वारकरी संप्रदायाचा कुळाचार आहे ही विठाई देवी म्हणजे कुळीचे दैवत आहे.

**व्रत –** दर पंधरा दिवसाची एकादशी हे व्रत वारकरी भाविक करतात.

आम्हा व्रत एकादशी । देव केस केशव तीर्थ तुळशी ।।१।।
आणिक नेणो बा साधन । आमुचा विषय हरिकीर्तन ।।२।।
संतसंगती निरंतर । प्रेम धन हे भांडार ।।३।।
विनवी विष्णुदासाचा नारा । आमुची ऐसी परंपरा ।।४।।

**बीजमंत्र –** रामकृष्ण हरी हा वारकरी संप्रदायाचा बीजमंत्र आहे रामाचा आचार, कृष्णाचा उच्चार आणि हरीचा जप म्हणजे राम कृष्ण हरी मंत्र आहे. भजनाची, कीर्तनाची सुरुवात याच नामस्मरणाने केली जाते.

**भाषा –** वारकरी संप्रदायाने मराठी भाषा स्विकारली आहे. मराठी भाषेचा गौरव करताना संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

माझा मराठीची बोलु कौतुके ।
परी अमृतातेही पैजा जिंके ।

ऐसी अक्षरे रसिके मिळवीन ।। (६-१४)

**संप्रदायाचे ग्रंथ –** गीता, भागवत, रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, अभंगगाथा हे वारकरी संप्रदायाचे ग्रंथ आहे. संत ज्ञानेश्वर महाराज ते संत निळोबराय महाराजांपर्यंतचे ग्रंथ वारकरी संप्रदायांने प्रमाणभूत मानलेले आहेत.

**ध्वजा –** प्रत्येक देवाचा, पंथाचा, संप्रदायाचा, देशाचा ध्वज असतो वारकरी संप्रदायाने भगवी पताका हा ध्वज स्विकारलेला आहे भगवा म्हणजे भयरहित, गर्व रहित वागणारा तो भगवी पताका खांद्यावर घेऊन पंढरीची वारी करणारा वारकरी.

**साधन –** नाम जप पंढरीची वारी हे साधन श्री विठ्ठल या दैवताची वारी करणे हे वारकऱ्यांचे साधन आहे. माझे कुळीचे दैवत ।। बाप माझा पंढरी नाथ ।।

**तीर्थक्षेत्रे –** पंढरपूर, आळंदी, देहू, पिंपळनेर, नेवासा, पैठण, त्र्यंबकेश्वर, ताराबाद, अरणभेंडी, मंगळवेढा ही वारकरी संप्रदायाची तीर्थक्षेत्रे आहेत. सर्व संतांची समाधी मंदिरे यांचा या तीर्थक्षेत्रामध्ये समावेश होतो.

**घोषणा –** पुंडलिक वरदा हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ भगवान की जय, जगद्‌गुरु संत तुकाराम महाराज की जय, संत निळोबाराय महाराज की जय ही वारकरी संप्रदायाची घोषणा आहे.

**ब्रीदवाक्य –** विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ।
भेदाभेद भ्रम अमंगळ ।।

हे वारकरी संप्रदायाचे ब्रीदवाक्य आहे आणि प्रतिज्ञाही आहे.

**बोधवाक्य –** म्हणोनी कुळ जातिवर्ण ।
अवघेचि गा अकारण ।
एथ अर्जुना माझे पण । सार्थक ऐका ।। (९-४५६)

**तत्त्वज्ञान –** चिदविलासवाद ब्रह्मसत्य जग मिथ्या हे वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान आहे.

**मानचिन्ह –** तुळशीहार गळा काशे पितांबर ।
आवडे निरंतर हेचि ध्यान ।।

असा अभंग नित्य म्हणावा व कंठी तुळशीमाळ धारण करावी हे वारकरी संप्रदायाचे मानचिन्ह आहे.

**स्नानसंध्या –** ब्रह्म मुहूर्तावर देह स्नान व सकाळ, सायंकाळ ज्ञानदेवांचा हरिपाठ म्हणणे ही वारकऱ्यांची नित्य संध्या आहे.

**शिकवण –** आता तरी पुढे हाची उपदेश ।
नका करु नाश आयुष्याचा ।।

ही वारकरी संप्रदायाची शिकवण आहे प्रपंच व परमार्थ नीटनेटका करावा संसाराचा भार देवाच्या पायावर वहावा.

**कार्य –** आम्हा सापडले वर्म । करु भागवत धर्म ।।
हे वारकरी संप्रदायाचे कार्य आहे.
नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।
कीर्तनाच्या माध्यमातून ज्ञानदीप जगात लावण्याची प्रतिज्ञा सर्व संतांनी केलेली आहे.

**माहेर –**

माझे माहेर पंढरी । आहे भिवरेच्या तीरी ।।१।।
बाप आणि आई । माझी विठ्ठल रुखुमाई ।।२।।
पुंडलिक बंधू आहे । त्याची ख्याती काय सांगू ।।३।।
माझी बहीण चंद्रभागा । करीतसे पाप भंगा ।।४।।
एका जनार्दनी शरण । करी माहेरची आठवण ।।५।।

भूवैकुंठ पंढरपूर हे वारकरी संप्रदायाचे माहेरघर आहे.

**आद्य प्रवर्तक –** भक्तामाजी अग्रमणी ।
पुंडलिक महामुनी ।।

भक्त पुंडलिक हे वारकरी संप्रदायाचे आद्य प्रवर्तक आहे.

अशा प्रकारची विचारप्रणाली वारकरी आचारीत असतो म्हणून देव त्यांच्या घरी येतो मग अहंकाराची वारी सरते

पुंडलिक वरदा हरि विठ्ठल
श्री ज्ञानदेव तुकाराम
पंढरीनाथ भगवान की जय ।
हरि ॐ शांति: । शांति: । शांति: ।।

**सुजाता सुरेश कोठावळे**
एफ.वाय.बी.ए.

# ''समाज माध्यमे आणि भारतीय समाज''

**प्रस्तावना :–**

आधुनिक डिजिटल युगात समाज माध्यमे गतिमान आणि परिवर्तनकारी शक्ती म्हणून उदयास आला आहे, ज्याने लोकांचा संवाद आणि जगाशी संलग्न होण्याच्या पद्धतींना आकार दिला आहे. त्याचा उदय क्रांतिकारक असून त्याने भौगोलिक सीमा ओलांडून खंडांमधील व्यक्तींना वास्तविकतेशी जोडले आहे. Facebook आणि Twitter सारख्या प्लॅटफॉर्मच्या आगमनापासून ते Instagram सारख्या प्रतिमा–केंद्रित आणि Tik-Tok सारख्या व्हिडिओ – सामायिकरण ॲप्सच्या प्रसारापर्यंत सोशल मीडियाने स्वत:ला जागतिक समाजामध्ये गुंतागुंतीने विणले आहे, ज्याकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही इतका खोलवर प्रभाव टाकला आहे.

**भारतीय समाजावर सोशल मीडियाचा प्रभाव**

सोशल मीडियाचा प्रभाव जागतिक स्तरावर उमटत असल्याने, वैयक्तिक समाजांवर त्याचा वेगळा प्रभाव समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. डिजिटल युगामुळे होणारे सखोल सामाजिक बदल भारतीय संदर्भात स्पष्ट केले जातात, जेथे पारंपारिक नियम आणि आधुनिक संवेदना सहसा एकत्र असतात. भारतीय समाजावर सोशल मीडियाच्या परिणामांचे बारकावे समजून घेणे ही सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आणि आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता उलगडण्याची गुरुकिल्ली आहे. भारतात सोशल मीडियाचे परिणाम व्हर्च्युअल परस्परसंवादाच्या पलीकडे आहेत. ते राजकीय व्यवस्थेत शिरतात तसेच ग्राहकांच्या वर्तनावर प्रभाव टाकतात, सांस्कृतिक पद्धतींना आकार देतात आणि मानसिक आरोग्याच्या गतिशीलतेवर देखील प्रभाव पाडतात. म्हणूनच, सोशल मीडिया आणि भारतीय समाज यांच्यातील परस्परसंवादाचे केवळ सर्वसमावेशक विश्लेषण नाही तर या डिजिटल युगातील गुंतागुंतीला सामान्य करण्यासाठी देखील आवश्यक आहे. या शोधनिबंधाच्या माध्यमातून भारतातील सोशल मीडियाच्या परिचयाचा ऐतिहासिक संदर्भ व त्याचे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम यांचा शोध घेण्यात येणार आहे. भारतीय राजकारणातील सोशल मीडियाची भूमिका, सांस्कृतिक गतिमानतेवरील प्रभाव, गोपनीयतेची याबाबत चर्चा करण्यात आली आहे. भविष्यातील सोशल मीडिया आणि भारतीय समाज यांच्यातील बहुआयामी संबंध प्रकाशित करुन, जगातील सर्वात वैविध्यपुर्ण आणि मोठी लोकसंख्या असलेल्या राष्ट्राच्या एकाच्या संदर्भात डिजिटल कनेक्टिव्हिटीच्या परिवर्तनीय सामर्थ्याला सखोल समजून घेण्यास हातभार लावण्याचे ध्येय आहे.

भारतीय समाजावर सोशल मीडियाचे सकारात्मक परिणाम –

अ. A संवाद आणि संपर्क –

**१. भौगोलिक अडथळे तोडणे –**

सोशल मीडियाने भौगोलिक अडथळे तोडून संवादात क्रांती घडवली आहे. अंतर आणि वेळेच्या मर्यादा ओलांडून जगभरातील लोकांशी संपर्क आणि संवाद साधण्यास सक्षम आहे. विशेषत: अशा भारतीय प्रवाशांसाठी सोशल मीडिया फायदेशीर ठरले आहे जे दूर असूनही आपल्या मातृभूमीशी आणि संस्कृतीशी मजबूत संबंध ठेवू शकतात.

**२. मित्र आणि कुटुंबाशी पुन्हा संपर्क साधणे –**

सोशल मीडियाने भारतीयांना मित्र आणि दूरच्या कुटुंबातील सदस्यांशी पुन्हा संपर्क साधण्यासाठी आभासी जागा उपलब्ध करुन दिली आहे. स्थलांतर किंवा कामाच्या बांधिलकीमुळे विभक्त झालेली कुटुंबे या प्लॅटफॉर्मचा वापर दैनंदिन अनुभव आणि क्षण शेअर करण्यासाठी करु शकतात.

**ब. माहिती प्रसार –**

**१. बातम्या आणि माहितीची सुलभता –**

सोशल मीडियाने बातम्या आणि माहितीचे लोकशाहीकरण केल्याने भारतातील मोठ्या लोकसंख्येला ते सहज उपलब्ध झाले आहे. यामुळे सामाजिक–आर्थिक स्थिती आणि भूगोल यांसारख्या माहितीतील पारंपारिक अडथळे दूर झाले आहेत, तसेच विविध घटकांतील व स्तरांतील लोकांना

वर्तमान घटनांबद्दल माहिती मिळत आहे. विश्वासार्ह स्त्रोतांकडून अद्ययावत बातम्यांचे त्वरित सामायिकीकरण केले जाते.

**२. जनजागृती मोहीम आणि सामाजिक कारणे –**

सोशल मीडिया हे भारतातील जनजागृती मोहिम चालवण्यासाठी आणि सामाजिकरणाला चालना देण्यासाठी एक शक्तिशाली साधन म्हणून उदयास आले आहे. तळागाळातील चळवळी आणि धर्मादाय उपक्रमांना सोशल मीडियाचा उपयोग करणाऱ्यांना चांगल्या प्रकारे पाठिंबा मिळत आहे. आपत्ती निवारणाचे प्रयत्न असोत, पर्यावरण संवर्धन असोत किंवा आरोग्य आणि शिक्षणाचा प्रचार असो, सोशल मीडियामुळे व्यक्ती आणि संस्थांना त्यांचा आवाज समाज घटकापर्यंत पोहचवण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की भारतीय समाजावर सोशल मीडियाचे सकारात्मक परिणाम झाले आहेत. संवाद वाढवण्यासाठी, संपर्क वाढवण्यासाठी आणि माहितीचा प्रसार करण्यासाठी सोशल मीडिया महत्त्वपूर्ण ठरले आहे. यामुळे अधिक परस्परसंबंधित, माहितीपूर्ण आणि सामाजिकदृष्ट्या लोकांमध्ये जागरुकता निर्माण झाली आहे. तथापि, हे मान्य करणे महत्त्वाचे आहे की हे सकारात्मक पैलू महत्त्वपूर्ण असले तरी, सोशल मीडियाचा प्रभाव समाजावर संतुलित व सुनिश्चित करण्यासाठीची आव्हाने देखील निर्माण झाली आहेत.

**भारतीय समाजावर सोशल मीडियाचा नकारात्मक प्रभाव –**

**अ. चुकीच्या माहितीचा प्रसार –**

**१. फेक न्यूज आणि त्याचे परिणाम –**

सोशल मीडियाशी निगडीत सर्वात महत्वाची चिंता म्हणजे चुकीची माहिती आणि खोट्या बातम्यांचा झपाट्याने होणारा प्रसार. चुकीची माहिती त्वरीत प्रसारित केली जाऊ शकते, ज्यामुळे व्यापक गैरसमज आणि चुकीच्या धारणा निर्माण होतात. भारतीय संदर्भात जर विचार केला तर जातीय तणाव, राजकीय हेराफेरी आणि सार्वजनिक दहशतीच्या घटनांसह बनावट बातम्यांचे गंभीर परिणाम झाले आहेत. सोशल मीडियातून खोट्या बातम्या पोहोचण्याचे प्रमाण वाढते व त्यामुळे माहितीवर विश्वास ठेवण्यापूर्वी किंवा शेअर करण्यापूर्वी त्याचे मूल्यांकन करणे आवश्यक ठरते.

**२. चुकीच्या माहितीचा सामना करण्यासाठी प्रयत्न –**

सोशल मीडियावरील चुकीच्या माहितीचा प्रसार रोखणे हे एक महत्त्वाचे आव्हान आहे. तथ्य–तपासणी सहयोग आणि सामग्री नियंत्रणाद्वारे खोट्या बातम्यांना आळा घालण्यासाठी पावले उचलली जात आहेत, परंतु सामग्रीच्या मोठ्या प्रमाणामुळे संपूर्ण निर्मूलन कठीण होते. वापरकर्त्यांना अचूक माहिती शोधणे आणि पडताळणे याविषयी शिक्षित करण्यासाठी डिजिटल साक्षरता उपक्रम सुरु करण्यात आला आहे. परंतु चुकीच्या माहितीविरुद्धच्या लढाईसाठी वापरकर्ते आणि अधिकारी यांच्याकडून एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**ब. मानसिक आरोग्याची चिंता –**

**१. वाढलेला स्क्रीन वेळ आणि त्याचे परिणाम –**

सोशल मीडियाच्या व्यापक वापरामुळे स्क्रीन टाईममध्ये वाढ झाली आहे. ज्यामुळे मानसिक आरोग्यावर होणाऱ्या परिणामाबद्दल चिंता निर्माण झाली आहे. डिजीटलच्या वापराचे व्यसन, झोपेचा त्रास आणि संज्ञानात्मक विकासावर विशेषत: तरुण वापरकर्त्यांमध्ये नकारात्मक प्रभाव यासारख्या समस्यांशी स्क्रीन वेळ जोडला गेला आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर इतरांच्या जीवनाच्या केलेल्या आदर्श आवृत्त्यांचे बऱ्याचदा सतत प्रदर्शन बऱ्याचदा अपुरेपणाची भावना वाढवते, ज्यामुळे ''सोशल मीडिया ईर्ष्या'' म्हणून ओळखली जाणारी घटना घडते.

**२. सायबर गुंडगिरी आणि ऑनलाईन छळ –**

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे प्रदान केलेल्या निनावीपणामुळे सायबर गुंडगिरी आणि ऑनलाईन छळ वाढण्यास मदत झाली आहे. विशेषत: तरुण वापरकर्ते, दुखावणाऱ्या टिप्पण्या, अपमानास्पद संदेश आणि धमक्यांचे

बळी होऊ शकतात. या नकारात्मक अनुभवांचे चिरस्थायी मनोवैज्ञानिक प्रभाव असू शकतात, ज्यामुळे चिंता, नैराश्य आणि ऑनलाईन व्यस्त राहण्याची अनिच्छा येते. काही प्लॅटफॉर्म रिपोर्टिंग यंत्रणा आणि गुंडगिरी विरोधी उपायांची अंमलबजावणी करत असूनही, या समस्येचे निराकरण करण्यासाठी जागरुकता, शिक्षण आणि कठोर अंमलबजावणीचा समावेश असलेला सर्वांगीण दृष्टिकोन आवश्यक आहे.

थोडक्यात सोशल मीडियाने भारतीय समाजात परिवर्तनशील बदल घडवून आणले असले तरी त्याचे नकारात्मक परिणाम दुर्लक्षित करता येणार नाहीत. चुकीच्या माहितीचा अनियंत्रित प्रसार आणि मानसिक आरोग्यावरील हानीकारक प्रभाव कमी करण्यासाठी जबाबदार वापर आणि सक्रिय उपाययोजनांची आवश्यकता आहे. भारत या आव्हानांना तोंड देत असताना, सुरक्षिति आणि अधिक माहितीपूर्ण ऑनलाईन वातावरण सुनिश्चित करण्यासाठी व्यक्ती आणि प्लॅटफॉर्म पुरवठादार दोघांचे प्रयत्न महत्त्वाचे आहेत.

**भारतीय राजकारणात सोशल मीडियाची भूमिका –**

**A. राजकीय एकत्रीकरण आणि व्यस्तता –**

**१. निवडणुकीत सोशल मीडियाच्या भूमिकेची उदाहरणे –**

सोशल मीडियाने भारतीय राजकारण लक्षणीयरीत्या बदलून टाकले आहे. ज्यामुळे अभूतपूर्व राजकीय सहभाग वाढला आहे. निवडणुकीदरम्यान, ट्विटर, फेसबुक आणि व्हॉट्सॲप सारखे प्लॅटफॉर्म राजकीय चर्चांचे केंद्र बनतात. पक्ष आणि उमेदवार मतदारांशी थेट संपर्क साधण्यासाठी या प्लॅटफॉर्मचा वापर करतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा त्यांच्या प्रचारादरम्यान सोशल मीडियाचा प्रभावीपणे वापर हे राजकीय संप्रेषण आणि मोबिलायझेशनसाइी डिजिटल प्लॅटफॉर्मचा फायदा घेण्याचे एक प्रमुख उदाहरण आहे.

**२. निवडणुकीदरम्यान फेक न्यूजशी संबंधित आव्हाने –**

राजकारणातील सोशल मीडियाच्या भूमिकेतील वाढीमुळे आव्हाने निर्माण झाली आहेत. विशेषत: बनावट बातम्या आणि चुकीच्या माहितीचा प्रसार वाढला आहे. निवडणुकांदरम्यान, खोट्या बातम्यामुळे लोकांच्या मतावर परिणाम होतो. या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी प्लॅटफॉर्म, तथ्य–तपासणी संस्था आणि नियामक संस्था यांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे, जेणेकरुन अचूक माहिती मतदारांपर्यंत पोहोचेल. अभिव्यक्ति स्वातंत्र्य आणि सोशल मीडियाचा गैरवापर रोखणे यामधील समतोल राखणे ही चिंतेची बाब आहे.

**३. सामाजिक सक्रियता आणि निषेध –**

**१. सामाजिक बदलासाठी सोशल मीडियाचा उपयोग –**

सोशल मीडिया हे भारतातील सामाजिक सक्रियता आणि निषेधासाठी उत्प्रेरक बनले आहे. हे नागरिकांना त्यांच्या समस्या मांडण्यासाठी, समर्थन एकत्रित करण्यासाठी आणि विविध समस्यांबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करते. निर्भया आंदोलन, मी टु चळवळ आणि सामाजिक अन्यायाविरुद्धच्या मोहिमा यासारख्या चळवळींना सोशल मीडियाच्या प्रवर्धक शक्तीने गती मिळाली आहे. हॅशटॅग आणि व्हायरल सामग्रीमुळे व्यक्तींना एकत्र येण्यास आणि सरकार आणि समाज या दोघांकडून बदलाची मागणी करण्यास सक्षम केले आहे.

**२. वास्तविक – जागतिक प्रभावासह ऑनलाईन सक्रियता संतुलित करणे –**

सोशल मीडिया कार्यकर्त्यांना सशक्त करत असताना, ऑनलाईन सक्रियतेचा प्रभाव हा वादाचा विषय आहे. हॅशटॅग आणि ट्रेंडिंग हे विषय जागरुकता वाढवू शकतात, मात्र प्रयत्नांतील सातत्य आणि मूर्त परिणामांसाठी अनेकदा तळागाळातील आधिक व्यापक सहभाग आणि ऑफलाईन संस्था यांचे सहकार्य आवश्यक असते. अर्थपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी प्रत्यक्ष कृतीसाठी चांगल्या – परिभाषित धोरणांद्वारे ऑनलाईन सक्रियता पूरक आहे.

शेवटी असे म्हणता येईल की, भारतीय राजकारणात सोशल मीडियाची भूमिका बहुआयामी आहे. यात संधी आणि आव्हाने दोन्ही आहेत. नागिरकांची जमवाजमव करण्याची, राजकीय प्रचार आणि सामाजिक सक्रियतेला चालना देण्याची क्षमता राजकीय परिदृश्याला आकार देत आहे. मात्र, चुकीच्या माहितीचा प्रसार आणि ऑनलाईन उत्साहाचे मूर्त बदलामध्ये भाषांतर करण्याची गरज याकडे काळजीपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. भारतीय राजकारणाच्या क्षेत्रात ज्याप्रकारे सोशल मीडियाचा वापर केला जातो तो आगामी काळातही प्रशासन, लोकसहभाग आणि राजकीय सक्रियतेच्या गतिशीलतेला आकार देत राहील.

थोडक्यात, भारतातील सोशल मीडियाचा सांस्कृतिक प्रभाव भाषा, संप्रेषण पध्दती आणि जीवनशैली निवडीवर खोलवर पसरलेला आहे. संस्कृतीचे गतिशील स्वरुप, तंत्रज्ञान आणि परस्परसंवादाद्वारे ऑनलाईन आणि ऑफलाईनचा प्रभाव सतत आकार घेते. जसजसे सोशल मीडिया विकसित होत आहे, तसतसे भारतीय समाजावर डिजिटल युगाचा प्रभाव सांस्कृतिक नियम आणि अभिव्यक्ति तयार करण्यात एक महत्त्वपूर्ण भूमिका राहील.

**पूजा शिवाजी गुंड**
एस.वाय.बी.ए.
राज्यशास्त्र विभाग

## सोशल मीडियातील वाचन संस्कृती



आज माहिती तंत्रज्ञान युगात टी.व्ही., रेडिओ, मोबाईल, संगणक, इंटरनेट, ट्विटर, फेसबुक, व्हाट्सअप, इत्यादी आधुनिक प्रसारमाध्यमांच्या उपलब्धतेत वाचन साहित्य आणि वाचन सवयीवर मोठा परिणाम झाल्याचे दिसत आहे. समाजातील तरुणमंडळी किंवा प्रौढ व्यक्तीजवळ यापैकी एक तरी साधन असतेच. दिवसेंदिवस समााजिक माध्यमे वाढतच आहे. आज सर्रास समाजात माणसं या साधनांचा वापर करत आहे. आधुनिक वाचकवर्ग मोबाईलवर, संगणकवर, ई-रिडरवर किंवा इ्तर प्रसारमाध्यमाद्वारे वाचन करत आहे. थोडक्यात वाचक तर प्रसारमाध्यमाच्या विळख्यात सापडल्याने वाचन सवयीवर किंवा वाचन उपलब्धतेवर काय चांगले - वाईट परिणाम झाले हे बघणे आज गरजेचे आहे.

पुस्तकांना पूर्वीसारखा वाचक मिळत नाही. आज पुस्तक प्रकाशन होतांना इ-स्वरुपात पण पुस्तक प्रकाशन होत आहे. आताचे आधुनिक वाचक सरळ-सरळ गुगल वर जाऊन इ-स्वरुपातील वाचन साहित्य डाउनलोड करुन वाचतात. आज ग्रंथांना पुर्वी सारखी मागणी होत नाही असा आरडा ओरड समाजातील किंवा साहित्य व्यवहारात होताना दिसून येत आहे. आधुनिक प्रसारमाध्यमांच्या प्रभावामुळे पुस्तकाचा वाचकवर्ग दुरावत चालला आहे. पुर्वी करमणुकीचे साधन म्हणुन पुस्तक वाचन करायचे ; पण आज करमणुकची साधन म्हणुन ट्विटर, फेसबुक, व्हाट्सअप, टी.व्ही. किंवा युट्यूब सारखे नवनवीन सामाजिक साधने वापरतात. पूर्वीचा काळ असा होता की पुस्तकाचे वाचन करणे हा एक गौरव किंवा कौतुक समजला जायचा. संग्रह करणे, लेख लिहिणे, पोथी-पुराण लिहिणे हे सगळे वैचारिक लक्षणे समजले जायचे. ग्रंथ आदान-प्रदान करुन पहिले वाचायचे आणि नंतर स्वत:च हस्ताक्षरामध्ये लिहून काढायचे. काही लोक तर ग्रंथच पाठांतर करायचे. उदा.साने

गुरुजी यांना रामरक्षा वाचण्याची खुप आवड होती. पण त्यांच्या घरी रामरक्षा पुस्तक नव्हत. गुरुजींचा शेजारी मित्र भास्करकडे हे पुस्तक होते. गुरुजींनी हे पुस्तक त्यांच्याकडून मागुन घेतले. पहिले संपुर्ण पुस्तक वाचुन काढले नंतर संपुर्ण पुस्तक अगदी थोड्याच दिवसात हस्ताक्षरामध्ये लिहुन काढले आणि सर्वात शेवटी पाठांतर करुन घेतले.

पुर्वी समाजात कोण कोणती व किती वाचन साहित्य वाचली त्यातून काय मिळाले याविषयी चौकाचौकांत आपआपसात चर्चा–विवाद करत असायचे. याचबरोबर गावागावात व शहराशहरात दैनिक वृत्तपत्र वाचण्यासाठी वाचक वाचनालयामध्ये दररोज येत असायचे. तेथे लहानपणापासून तर प्रौढांपर्यंत सगळे वाचक एकत्र मिळून वृत्तपत्र वाचायचे. पण आता ते दुरावत होतांना दिसत आहे. तेथे एकमेकांशी संवाद व्हायचा त्या संवादामधून माहिती–ज्ञान मिळायची. त्यांनी नवीन वाचकाला वाचनाची आवड–सवय लागत होती. चांगल्या व प्रेरणादायी कथा, कादंबऱ्या वाचताना वाचक त्या ग्रंथात भावनिक स्थितीत हरवला जायचा. मग यामध्ये अजून इतर वाचन साहित्याचा भर पण पडायचा. कथा, कादंबरी, प्रवासवर्णन, ललित–कथा, हास्यकथा, पोथी–पुराण, आत्मचरित्र, आत्मकथा, विज्ञान लेख इत्यादी गद्य–पद्य यांच्या वाचणाने रसिक वाचक आणखी समृद्ध होत जायचा. याचबरोबर दैनिक पेपर, दैनिक लेख, नियतकालिके, विशेष अंक, संशोधन लेख, वृत्तपत्रातील रविवारच्या अंकातील साहित्य व प्रेरणादायी लेख किंवा पुरवण्या यावर वाचकांच्या ज्ञानात व वाचनाची सवयी मध्ये एक मोठा भर पडायचा.

पूर्वीचे एखादे चांगले उत्तम पुस्तक बाजारात आल्या आल्याच पुस्तकाच्या सर्व आवृत्ती हातोहात खपल्या जायच्या असा तो गौरवाचा काळ होता. पुर्वी लोक वाचन साहित्याचा वापर व संग्रह आवडीने करत होते. बाजारात पुर्वी पुस्तक वाचक प्रेमी पुस्तक खरेदी करायचे. पण आता बघता–बघता वाचक व वाचन सवयी दुरावतांना दिसत आहे. त्याचबरोबर पूर्वीचा वाचक–वाचन साहित्याचा कौतुकास्पद व गौरवाचा काळ होता ; तो पण लोप पावत चालला आहे. याला कारणीभुत आत्ताची स्थिती आहे. यामध्ये संगणक, मोबाईल, इंटरनेट, टीव्ही, सोशल मीडियामध्ये फेसबूक, व्हाट्सअप, ट्विटर, इंस्टाग्राम, युट्युब यासारखे आधुनिक करमणुकीचे प्रसारमाध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे वाचक व वाचन साहित्य वाचनास आले आहे. पुर्वी जे वाचन साहित्य रांगा लावून हातोहात विकली जायची ती आता सवलत–सुठ देऊनही विकली जात नाहीत.

आधुनिक माहिती तंत्रज्ञान व प्रसारमाध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे वाचक वाचनसाहित्यापासून दुरावत का चालला आहे ? वाचन गौरवाचा व कौतुकास्पद काळ का लोप होतांना दिसत आहे ? वाचन सवयीचा व वाचन संस्कृतीचा लोप होतांना का दिसत आहे ? बालक–पालक वाचन साहित्य वाचत असतील तर काय वाचतात ? बालक–पालक एकत्र बसून वाचन करतात का ? तंत्रज्ञान युगात वाचनाची गरज खरच राहिली आहे का ? यावरील विविध प्रश्नांची चर्चा होतांना आधुनिक प्रसार माध्यमांचा वाढता प्रभाव तर परिणामकारक आहेच ; पण याशिवाय आणखी काही कारणे आहेत. पूर्वी करमणुकीचे साधन म्हणजे कुस्ती, कबड्डी, क्रिकेट, हॉकी, ग्रंथ वाचन, ग्रंथलेखन, इतर खेळ खेळणे किंवा शेतीचे कामे इत्यादी साधनांची करमणूक व्हायची. पूर्वी करमणूक साधनांचा अभाव असल्यामुळे लोक रिकाम्या वेळेत ग्रंथ वाचन, ग्रंथलेखन, ग्रंथ देवाण–घेवाण करतांना ग्रंथालयांमध्ये वेळ घालवायचे. मात्र आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाच्या काळात करमणुकीची साधणे झपाट्याने वाढत चालले आहे. टी.व्ही., रेडीओवर वाढत्या चॅनल संख्येमुळे लहान मुलापासून तर प्रौढव्यक्ती पर्यंत घरबसल्या आपल्या आजूबाजूची नाही तर संपूर्ण जगाच्या कानाकोपऱ्यातील कोणत्याही विषयाची माहिती कुठेही व केव्हाही अत्यंत थोड्याच वेळात आणि उत्तम रीतीने माहिती मिळू लागली आहे. त्याचबरोबर गुगल व याहू यासारख्या सर्च इंजिनद्वारे घरबसल्या कोणत्याही विषयावरती माहिती अगदी



काही सेकंदातच मिळते.

गुगलवर लाखो-करोडो ई-स्वरुपात वाचन साहित्य उपलब्ध आहे. वाचकवर्ग ई-स्वरुपातील साहित्य आज शैक्षणिक क्षेत्रात किंवा ईतर क्षेत्रात वापरतांना दिसत आहे. त्याचबरोबर गुगलवर असलेले युट्युब हे तर लहान मुलांना सांभाळणारा किंवा मुलांचे पालनपोषण/जडणघडण करणारा साधन ठरत आहे. मुलगा जेवायला जर टाळाटाळ करत असेल तर, पालकवर्ग इतर कामात व्यस्त असेल तर, मुलगा रडत असेल तर मुलगा हट्ट करत असेल तर यासारख्या अनेक कारणासाठी आता घरात युट्युब वर मुलांना गाणे किंवा व्हिडिओ लावून दिल्या जात आहे. संपूर्ण जगच आता बघता-बघत सारा समाज गुगलमय होत चालला आहे.

आज वेगवेगळ्या ठिकाणी इंटरनेट व संगणकाचा वापर होत आहे. यामध्ये सरकारी - खाजगी ऑफिस पासून तर बाजारपेठात सुद्धा इंटरनेट व संगणकाने शिरकाव केला आहे. शहरापासून तर खेड्यागावापर्यंत सगळेच माणसं गुगल व इंटरनेटचं वापर करतांना दिसत आहे. आज मोजकेच लोक असतील की त्यांच्या जवळ मोबाईल व इंटरनेट नसतील. संपुर्ण जगातच प्रसारमाध्यम साधनांनी पुस्तकाची जागा घेतली आहे. तेव्हा प्रश्न एकच लोकांना समोर पडतो. जगाची माहिती अगदी सोप्या पद्धतीने इंटरनेटवर मिळत आहे तर ग्रंथालयात जाऊन पुस्तकांची शोधाशोध करतीलच कशासाठी ? हातातलं सोडून आरशातले घेण्याची समाजाची वृत्ती कधीच नसते. कमी वेळेत, कमी खर्चात, कमी श्रमात, कधीही-केव्हाही आणि कुठेही एखादी गोष्ट जर मिळत असेल तर आजच्या आधुनिक विज्ञान तंत्रज्ञान जगात कोणालाच नको असते. या सर्व गोष्टीच्या परिणामुळे वाचक वाचतांना कमी होत चालले आहे. समाजात फेसबुक, व्हाट्सअॅप, ट्विटर या सोशल मीडियावर लोकांचा जास्त वेळ जात असल्याने वाचकवर्ग कमी होत चालले आहे.

वाचक, वाचन संस्कृती व वाचन सवयीचा लोप होतांना दिसत आहे. असे असताना लेखक, शिक्षक, प्रकाशकांचीही काही नैतिक जबाबदारी असतेच. वेळ व काळानुसार होत असलेला बदल काळाच्या व वेळेच्या बदलत्या प्रवाहा बरोबर पालक-शिक्षक व लेखक-प्रकाशकांनी बदलायला पाहिजे. वाचकांसाठी प्रोत्साहनपर पुस्तके, अवांतर वाचन साहित्य, बालक वाचन साहित्य, तरुण वाचन साहित्य लेखकांनी लिहायला पाहिजे. जेणे करुन वाचक अजुन वाचनाकडे वळतील व वाचनाची सवय-आवड निर्माण होतील. आताची आधुनिक इंटरनेटसारख्या माध्यमांचा उत्तमप्रकारे वापर करुन वाचकांमध्ये वाचनाची गरज, वाचनाची सवय अगदी साध्या पद्धतीने वाढवता येईल. आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रसारमाध्यमांची साधने व इंटरनेट आदि गोष्टीने वाचन संस्कृतीला आक्रमक व प्रभाव न मानता ती वाचन संस्कृतीला लाभलेली देणगी आहे. याविचाराने ई-स्वरुपातील वाचन साहित्य वाचकांनी वाचन करायला पाहिजे.

आज गुगल वर ई-पुस्तके, ई-लेख, ई-शोधलेख, ई-प्रबंध, ई-वर्तमानपत्र, ई-मासिके इत्यादी ई-स्वरुपातील वाचन साहित्य वाचकांसाठी आज उपलब्ध आहे. याचं चांगल्याप्रकारे जर वापर करण्याची सवय लागली तर पुर्वी पेक्षाही आज जास्त वाचन साहित्य उपलब्ध आहे. पुर्वी ई-स्वरुपातील वाचन साहित्य खुप कमी प्रमाणात होते. या विचारोन व भावनेने यांचा वापर करुन घेता येऊ शकेल. कारण या इंटरनेट व आधुनिक प्रसारक माध्यमाद्वारे गद्य-पद्य ही ई-साहित्य, सी.डी., डी.व्ही.डी., चित्रे, ब्लॉग, व्हिडीओ ची प्रसिद्धी करता येईल. या दृष्टीने माहिती तंत्रज्ञान व इंअरनेट उपयुक्त ठरतील. इंटरनेट व गुगलवर लाखो-करोडो ई-स्वरुपात वाचन साहित्य उपलब्ध आहेत. विनामूल्य किंवा अगदी थोड्याच वर्गणीद्वारे त्यांच्या संकेतस्थळावरुन आपण डाऊनलोड करु शकतो. या ई-स्वरुपातील वाचन साहित्य आपण मोबाईल, संगणक किंवा ई-रीडरवर अगदी सोप्या पद्धतीने व आवडीने वाचू शकतो. लहान मुलं तर प्रसारमाध्यमांचा जास्तच वापर करता आहे. मुलांना शाळेतुन

गृहपाठ हे मोबाईल वर दिल्या जात आहे. बालक–पालकांकडून गृहपाठ हे मोबाईलवर करुन व्हाट्सअपवर पाठवतांना दिसत आहे. लहान मुलांपासून तर वयोवृद्ध पर्यंतचे वाचन–अभ्यास स्वरुपातील सी.डी., डी.व्ही.डी., चित्रे, ब्लॉग, व्हिडीओ इत्यादी आज इंटरनेट वर उपलब्ध आहे. खास करुन खपाजगी वर्ग (कोचिंग क्लासेस) यांचे तर सगळेच सगळे वर्ग तासिका हे इंटरनेटवर उपलब्ध करुन देतात. इथे वाचकाला ऑनलाईन अभ्यास करता येतो किंवा ऑनलाईन परीक्षा पण देता येते. इतकेच काय तर आपण पुस्तकाचं संग्रही करु शकतो.

इंटरनेट व गुगल हे पुस्तक प्रकाशनापेक्षा स्वस्त, जलद आणि प्रभावी माध्यम आहे. इंटरनेटवर असलेले वाचन साहित्य हे जगभर कुठेही केव्हाही वाचू शकतात. इंटरनेटवर प्रसिद्ध केलेले वाचन साहित्य अगदी काही सेकंदातच जगभराच्या वाचकांना उपलब्ध होऊ शकते. यावर चर्चा, परिसंवाद, विचार, आढावा आणि फेरबदल करणे सहज शक्य होते. ई–मेल, व्हाट्सअप, फेसबुक सारख्या प्रसार माध्यमांद्वारे आपण पीडीएफ स्वरुपातील ई–वाचन साहित्य सहज आदान–प्रदान करु शकतो. थोडक्यात काय तर सामाजिक प्रसार माध्यमांनी जर वाचनावर प्रभाव पाडला असेल तरी वाचकांसाठी ई–स्वरुपातील वाचन साहित्य आज माहिती प्रसार माध्यमामार्फतच उपलब्ध झालेले आहेत. वाचक आज जलद गतीने वाचन करुन नवनवीन शोध लावत आहे ; व माहितीची देवाण–घेवाण करत आहे. असे एका संशोधनातून दिसुन आले.

**विश्वम दीपक बांडे**
टी.वाय.बी.ए. (मराठी)

## पारनेर भूषण डॉ.बाबा आढाव

बाबासाहेब पांडुरंग आढाव (जन्म : १९३६) पुण्याचे निवासी असलेले परंतु मुळचे पारनेर तालुक्यातील सांगवीसूर्य गावचे बाबा आढाव हे असंघटित कष्टकऱ्यांचे नेते म्हणून परिचित आहेत. ते सत्यशोधक चळवळीचे नेते समजले जातात. बाबा आढाव हे डॉ.नरेंद्र दाभोलकर यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सक्रिय कार्यकर्ते आहेत.

**प्रकाशित साहित्य :–**

- एक गाव, एक पाणवठा
- सत्यशोधनाची वाटचाल
- हमाल पंचायत
- रिक्षाचालक संघटना

डॉ.बाबा आढाव हे एक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि महाराष्ट्रातील समता चळवळींचे मार्गदर्शक आहेत त्यांच्या हमाल पंचायत स्थापनेच्या कार्याबाबत, एक गाव–एक पाणवठा यांसारख्या सामाजिक – राजकीय सुधारणा त्यांनी घडवून आणल्या. भारताचा स्वातंत्र्य लढा, महात्मा गांधींना त्यांनी स्वत: प्रत्यक्ष पाहिले, भाई वैद्य यांच्याशी वैचारिक वाद, आदींबाबत त्यांच्या गोष्टी ऐकणे खरोखरच अविस्मरणीय आहे. त्यांनी आख्खे आयुष्य समाजाच्या भल्यासाठी वाहून घेतले. रोजंदारीवर काम करणाऱ्या असंघटित आणि वंचित कामगारांसाठी सामाजिक सुधारणा घडविण्याचे उदात्त ध्येय साध्य करण्यासाठी त्यांनी किती सहजपणे त्यांच्या नोकरीचा आणि जीवनशैलीचा त्याग केला ! या सुधारणा कधी अमलात येतील, हे माहित नसतानाही हा निर्णय किती अवघड होता, हे समजणे कठीण आहे. ते एकूण ५३ वेळा तुरुंगात जाऊन आले आहेत परंतु त्यांच्याकडे ही अटळ इच्छाशक्ती कुठून आली ही बाब मला आश्चर्यचकित करते. सर्व वंश, जातीतील लोक समान पायावर उभे असावेत, यासाठी ही विद्यमान सामाजिक उतरंड बदलली पाहिजे, ही प्रेरणा त्यांच्या मनात तरुणवयात

सेवादलाचे काम करत असताना रुजली.

वयाच्या नव्वदीतही ते नागरी हक्कांसाठी विविध मोर्च्यांत भाग घेतात, सामाजिक, राजकीय बदल घडविण्यासाठी भारतभर फिरतात. तुम्ही खरंच आमच्या मनातील एक महान आणि आदरणीय व्यक्ती आहात, तुम्ही तुमच्या कार्याप्रति दर्शविलेली तळमळ आणि निष्ठा याला तोड नाही. तुम्ही ९३ वर्षांचे तरुण आहात. उत्तम आरोग्याचे मूर्तीमंत चित्र आहात. परंतु मला असे वाटते की, तुम्ही थोडी विश्रांती घ्यावी तुम्हाला इतके दीर्घ आयुष्य मिळावे, जेणेकरुन तुम्ही कधी अज्ञात क्षेत्रात उपक्रम राबविता त्याप्रमाणे भारतात जे बदल घडवत आहात, त्या सामाजिक राजकीय सुधारणांबाबत आम्हालाही शिकत राहता येईल. आमचे भविष्य घडविण्यासाठी आम्ही तुमच्याशिवाय इतर कोणाकडून कसे शिकणार ?

'प्रार्थना समाजाचा इतिहास' या १९२७ साली प्रकाशित झालेल्या ग्रंथाची द्वितीय आवृत्ती २०१९ साली प्रकाशित झाली. या आवृत्तीचे संपादक डॉ.राजा दीक्षित यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेत लिहिले आहे की, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर डॉ.बाबा आढाव आणि त्यांच्या आंदोलनाला स्थान मिळायला तसा उशीर झाला. तथापि, बाबांचे योगदान हे महात्मा फुले यांच्या सत्यशोधकी वैचाकिर वारशाशी जोडलेले आहे. यासाठी हा संदर्भ उद्धृत केला. भारतीय कामगार चळवळीच्या इतिहासात डाव्या, उजव्या आणि समाजवादी संघटना नेत्यांची नावे सतत घेत आलो आहोत. या संघटनांच्या पलीकडे महाराष्ट्रातले एक नाव अपरिहार्य आहे आणि ते अर्थातच बाबा आढाव यांचे आहे. त्यांच्या नावाखेरीज हा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीची ६५ वर्षे बाबांच्या नावाशी जोडलेली आहेत. याच काळात त्यांनी देशातील असंघटित कामगार वर्गाच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी लढे दिले, दिल्लीला जाऊन आंदोलने केली. या वर्गाला पेन्शन देऊन त्याला सामाजिक सुरक्षा द्या, असा आग्रह धरला. आजही तीच चिंता त्यांच्या मनात आहे. स्थालांतरित मजुरांच्या प्रश्नाने ते अस्वस्थ आहेत. ज्या तळमळीने त्यांनी साऱ्या अंगमेहनत करणाऱ्या वर्गाचा प्रश्न मांडला, सोडवला, तो सगळा लढा आपल्या सामाजिक न्यायाच्या इतिहासात नमूद करावाच लागेल !

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आठ–दहा वर्षांत पुण्यात 'हमाल पंचायत' स्थापन होते ; बिगारी आणि वेठबिगारी कष्टकऱ्यांच्या श्रेणीतील हा मजूर प्रतिष्ठेचे स्थान मिळवतो. बाबांनी सुरु केलेल्या या 'हमाल पंचायत' कल्पनेचे विशेष स्वागत अनेक अभ्यासक, संशोधकांनी केले आहे. हमाल हा माणूस आहे, त्याची प्रतिष्ठा जपली पाहिजे, त्याला रोजगार सुरक्षा दिली पाहिजे हा आग्रह बाबांनी धरला आणि पुण्यातून सुरु झालेली ही चळवळ महाराष्ट्राच्या छोट्या तालुक्यापर्यंत पोहोचली.

हमाल, कष्टकरी जागे झाले, आपल्या हक्कांसाठी लढू लागले. हा एक मोठा सामाजिक संघर्ष होताच ; पण तो बदलाचा टप्पाही होता. हमालांच्या वर्गणीतून 'हमाल भवन' उभे राहिले. आज तेथे बाबांचे ज्येष्ठ सहकारी नवनाथ बिनवडे काम करत असतात. अप्पा कोरपे हे जुने सहकारी. त्यांनी 'मी तो हमाल' हे आत्मकथन लिहिले. ते अहमदनगरचे या सगळ्या वाटचालीत राज्य सरकारने 'हमाल माथाडी महामंडळ' स्थापन करणारा कायदा केला. तो एक महत्त्वाचा टप्पा आहे. हा कायदा १९६९ साली झाला आणि देशातील अशा स्वरुपाचा अभिनव कायदा, ज्यामुळे हमाल वर्गाला कामाची आणि रोजगाराची सुरक्षा मिळाली. वैद्यकीय व्यवसाय आणि अल्पकाळ केलेले संसदीय राजकारण, यातून बाहेर पडून पूर्णपणे सामाजिक सेवेला वाहून घ्यायचे बाबांनी ठरवले, तेव्हा ते जेमतेम तिशीत होते. यानंतरच त्यांच्या सामाजिक कामाचे नवनवे पैलू आपल्याला बघायला मिळाले. संसदीय राजकारण सोडून सामाजिक न्यायाच्या संघर्षशील समाजकारणाकडे बाबा आढाव गेले, हे माझ्या दृष्टीने त्यांच्या आयुष्यातील ऐतिहासिक वळण आहे. त्याचबरोबर हे वळण महाराष्ट्राच्या सामाजिक आणि

समतेच्या चळवळीचेही ऐतिहासिक असेच म्हणावे लागेल ! बाबांच्या सामाजिक न्यायाच्या आंदोलनात, ज्या वर्गांना न्याय मिळाला असे वर्ग कोणते होते ?

वर म्हटल्याप्रमाणे हमाल, कष्टकरी, वंचित वर्गातील स्त्रिया, कचरावेचक महिला, प्रकल्पग्रस्त शेतकरी, शेतमजूर, विस्थापित झालेले लोक, देवदासी, महापालिकेतील सफाई कामगार, झोपडपट्टीतील गरीब, तलाक पीडित महिला, मोलकरीण भगिनी, तंबाखू कारखान्यातील महिला कामगार, भटके-विमुक्त, अपंग वर्ग .... अशा सर्व वर्गांसाठी बाबा काम करत राहिले. आजही हे काम थांबलेले नाही. धरणग्रस्त आणि प्रकल्पग्रस्त शेतकरी व विस्थापित यांच्यासाठी १९६२ साली बाबांनी ही संघटना स्थापन केली. त्यातून पुढे 'आधी पुनर्वसन, मग धरण' ही भूमिका बाबांनी आग्रहाने मांडली. त्यातूनच राज्य सरकारने पुनर्वसनाचा कायदा केला. त्यासाठी बाबा आढाव महाराष्ट्रातील अनेक मोठ्या धरणांच्या ठिकाणी सत्याग्रह करण्यासाठी गेले होते. त्यांनी तिथे यासंदर्भात मेळावे देखील घेतले. त्यामुळेच राज्य सरकारला पुनर्वसनाचा कायदा करणे भाग पडले. यामुळे प्रकल्पग्रस्त आणि धरणग्रस्त या वर्गाला निश्चितच न्याय मिळाला. आज या प्रश्नाबाबत मेधा पाटकर यांचे नाव जागतिक पातळीवर सन्मानाने घेतले जाते. मात्र या लढ्याची सुरुवात बाबांनी केली होती, याचे विस्मरण सामाजिक इतिहास लिहिताना होऊ नये, ही अपेक्षा व्यक्त केली तर ती गैरवाजवी ठरु नये.

आज आपण स्थलांतरित आणि असंघटित कामगार असे शब्द प्रयोग सतत वापरत आहोत. बाबांनी विषमतेविषयी आंदोलन उभे करताना काही सूत्रे समोर ठेवली होती. हमाल पंचायत स्थापन केल्यानंतर या सामाजिक प्रबोधनाची म्हणून काही मार्गदर्शक तत्त्वे बाबांनी ठरवली होती. त्यामुळे संघटनेचे स्वरुप व्यापक वैचारिक पायावर उभे राहत होते. ही चार तत्त्वे होती ; पहिले संवादाचे, दुसरे जागृती निर्मितीचे अर्थातच प्रबोधनाचे, तिसरे कल्याणकारी उपक्रम आणि विकासाचे काम, चौथे अर्थातच संघर्षाचे किंवा आपल्या हक्कांचा लढा करण्याचे.

महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि डॉक्टर राम मनोहर लोहिया यांच्या विचारांच्या आधारे बाबा आपली आंदोलने उभी करत राहिले. त्यामुळे आर्थिक उपेक्षा किंवा अन्याय नव्हे, तर विषमतेच्या विरोधातील भूमिकेचीही जोड या आंदोलनांना मिळाली हे विशेषत्वाने लक्षात घेतले पाहिजे.

बाबांच्या एकूण आंदोलनांचे चित्र आणि व्यापक स्वरुप आपण समजून घेतले तर लक्षात येते, की या देशातील काही कोटी लोकांच्या अन्यायाच्या प्रश्नाची दखल त्यांनी घेतली. हे लढे करताना ते अहिंसात्मक मार्गाने आणि संसदीय लोकशाहीच्या परिघात कसे राहतील, याची काळजी बाबांनी नेहमीच घेतली. साधारणत: १९८० च्या दरम्यान पुण्यामध्ये कष्टकरी महिलांची एक महागाई विरोधी परिषद बाबांनी आयोजित केली होती. याच काळात ग्रामीण कष्टकरी परिषद, शेतमजूर अल्पभूधारक आणि रोजगार हमी वरील मजुरांच्या परिषदाही आयोजित करण्यात आल्या होत्या. या सर्व परिषदांमधून असंघटित वर्गांसाठी विविध मागण्या करण्यात आल्या होत्या. या सर्व मागण्या खूप महत्त्वाच्या होत्या. यात पहिली मागणी होती ती म्हणजे, जीवनाश्यक वस्तू रेशनिंग मिळाव्यात. या परिषदेमध्ये जे ठराव केले, त्यामध्ये या अकरा जीवनावश्यक वस्तुंची यादी दिलेली होती. तसेच असंघटित कामगारांनाही भविष्य निर्वाह निधीचा लाभ मिळावा आणि त्याला जोडून विमा योजना असावी, अशी मागणी करण्यात आली होती. या साखळीतील एक महत्त्वाची सत्यशोधक महिला परिषद माजी पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंह यांच्या उपस्थितीत १९९० साली महात्मा फुले यांच्या स्मृती शताब्दी वर्षाचे औचित्य साधून भरवण्यात आली होती.

असंघटित कामगारांना पेन्शन मिळावी, ही मागणी घेऊन बाबांनी वयाच्या ८२ व्या वर्षी नवी दिल्लीत पेन्शन परिषद भरवली होती. देशातील अनेक मान्यवर या परिशदेला हजर

होते. अजूनही या प्रश्नावर समाधानकारक तोडगा निघाला आहे, असे बाबांना वाटत नाही. सामाजिक सुरक्षा कायदा २००८ साली झाला ; पण त्याची अंमलबजावणी होण्यात अजूनही राजकीय इच्छाशक्ती अपुरी पडते असे बाबांना वाटते. या चळवळीला व्यापक अर्थाने इतिहास स्वरुप देण्याचे कामही बाबांनी 'पुरोगामी सत्यशोधक' मासिकाच्या रुपाने केले आहे. गेली ४५-४६ वर्षे हे त्रैमासिक नियमितपणे प्रकाशित होते आहे.

बाबांच्या सत्यशोधकी वाटचालीतील आणि महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीच्या इतिहासातील 'एक गाव एक पाणवठा' हा फार महत्वाचा ऐतिहासिक टप्पा आहे, हे विसरुन चालणार नाही. महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची शताब्दी १९७३ मध्ये होती. त्यानिमित्ताने बाबांनी सामाजिक मंथनाची भूमिका घेऊन या मोहिमेला सुरुवात केली. या दौऱ्यात बाबांनी महाराष्ट्रातील ७० ते ७५ तालुक्यांतून १८३ गावांचा लेखाजोखा घेतला. या सर्व वाटचालीत नवा समाज निर्माण करणाऱ्या तरुणांना साद घालत बाबांनी त्यांना चळवळीशी जोडून घेण्याचा प्रयत्न केला. या 'एक गाव, एक पावठा', मोहिमेतील अनुभवांची आपली शिदोरी १९७६ साली प्रसिद्ध झालेल्या याच नावाच्या पुस्तकात आपल्याला तपशीलवार वाचायला मिळते. बाबांचे हे पुस्तक म्हणजे महाराष्ट्रातील सामाजिक विषमतेचे स्वरुप उघड करणारे आणि पुरोगामी महाराष्ट्राच्या डोळ्यात अंजन घालणारे समाजाचे चित्र आहे.

गांधीजींनी ज्या शेवटच्या माणसाचे गाऱ्हाणे ऐका असे सरकारला आणि समाजाला सांगितले होते, त्या शेवटच्या माणसापर्यंत त्या शेवटच्या माणसाचे दु:ख समजून घेऊन त्याला आधार देण्याचे काम बाबा करत आले आहेत. महात्मा फुले यांची प्रेरणा बाबांनी आपल्या कार्यात स्विकारली आहे. त्या महात्म्याचे निवासस्थान हे राष्ट्रीय स्मारक व्हावे म्हणून बाबांनी सतत प्रयत्न केले. शेवटी १९९३ मध्ये महात्मा फुले यांचा वाडा हे राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित झाले आणि उभारले ही गेले, याचे श्रेय ज्याप्रमाणे त्यावेळेच्या महाराष्ट्र सरकारला द्यावे लागेल ; त्यापेक्षाही जास्त श्रेय बाबांचे आहे हे विसरुन चालणार नाही.

महाराष्ट्रातील विचारी जनांना, कलावंतांना, कार्यकर्त्यांना एकत्र येऊन बाबांनी सामाजिक चळवळी आणि आंदोलनांचा डोलारा उभा केला. त्यात पुण्यात हमाल बांधवांची स्वत:ची घरे उभी राहिली. जे सामाजिक कार्यकर्ते विषमतेविरुद्ध लढू पाहत होते, त्यांच्यासाठी 'सामाजिक कृतज्ञता निधी' या विश्वस्त संस्थेची स्थापना झाली. त्यामुळे महाराष्ट्रातील विविध आंदोलनातील तरुण कार्यकर्त्यांना मदतीचा हात मिळाला. हमीद दलवाई, राम बापट, नरेंद्र दाभोलकर, ताहेरभाई पूनावाला, श्रीराम लागू असे कितीतरी मान्यवर बाबांच्या चळवळीशी जोडले गेले.

आजही 'महात्मा फुले समता प्रतिष्ठान' टिंबर मार्केटमधील कार्यालयात ठरलेल्या वेळी बाबा आलेले असतात. महाराष्ट्रातून तरुण कार्यकर्ते, अनेक संघटनांचे लोक त्यांना भेटायला येत असतात. त्यांना बाबांचे मार्गदर्शन हवे असते. बाबांशी संवाद करायला ते उत्सुक असतात. आज सामाजिक चळवळींची एकूणच पाटी कोरी असल्यामुळे बाबा हाच एक आधार या सर्वांना वाटतो. आज नव्वदाव्या वर्षीही बाबा कार्यरत आहेत. आपल्या सरकारने, समाजाने त्यांची नेहमीप्रमाणे गौरव - सन्मानाबाबत उपेक्षा केली आहे. तरीही बाबांची याविषयी तक्रार नाही. आपल्या भारत सरकारने आणि महाराष्ट्र सरकारने सरकारी स्तरावरील गौरव देताना बाबा आढाव यांना नेहमीच दुर्लक्षिले आहे ; पण आज देशातील कष्टकरी वंचित वर्गातील महिला, तसेच पुरुष बांधवही त्यांना जे प्रेम देतात ते खरोखर अभूतपूर्व आहे.

**तेजश्री बाळू घोलप**
टी.वाय.बी.ए. (मराठी)

# ग्रंथ हेच गुरु ...



जन्माला आल्यापासून.... नव्हे तर गर्भात असल्या पासूनच ''आई'' हा आपला गुरु पहिला असतो. तिचे आचार विचार याचा आपल्यावर परिणाम होत असतो. अभिमन्युची गोष्ट सर्वांना माहीत असेलच तो गर्भात असतानाचा युद्धाचे सर्व डावपेच शिकला होता.

या जगात आल्यावर आई वडील हेच आपले चालते बोलते ग्रंथालय असते. आणि त्याची सुरुवात होते ते आपल्या बोबड्या बोलांनी... आई सारखा गुरु मग ते स्पष्ट बोलता यावे यासाठी प्रयत्न करते. बाबा बोट धरुन चालायला शिकवतात. पुढे शाळेत गेल्यावर वाचनाची सुरुवात होते ती एक दोन अंक आणि अ आ इ ई या बाराखडी पासून.

शाळेत निरनिराळे विषय शिकवणारे गुरुजन आपले ज्ञान समृद्ध करतात. पण प्रत्येक वेळी गुरु हा मानवी रुपातच असतो असे नाही. तो वर्तमानपत्र, पुस्तक, कथा, कादंबरी, कविता आणि धार्मिक, आध्यात्मिक ग्रंथांच्या रुपातही भेटतो. चांगल्या शरीर प्रकृतीसाठी पौष्टिक अन्न खाणे गरजेचे असते. तसे बुद्धीची पौष्टिकता ही चांगल्या वाचनाने वाढते.

पुर्वी टी.व्ही., मोबाईल नव्हते तेव्हा वाचन हेच एक विरंगुळ्याचे साधन होते. त्यामुळे वाचनाची आवड आपोआपच वाढत गेली. आणि पाठोपाठ आपसुकच मिळणारे ज्ञान... ज्या ज्या गोष्टींमुळे आपल्याला ज्ञान मिळते, विचारांना चालना मिळते, बुध्दीवर्धन होते ते सर्वच ''गुरु'' आहेत असे म्हणायला हरकत नाही.

एक सच्चा आणि योग्य मार्गदर्शन करणारा मित्र हा सुद्धा गुरुच असतो. मानवी गुरुला गुरुदक्षिणा द्यावी लागते. पण पुस्तक रुपी, ग्रंथ रुपी गुरुला मात्र गुरुदक्षिणा द्यावी लागत नाही. त्यांच्यामुळे आपल्या ज्ञानात भर पडते. एकलव्याला गुरु दक्षिणा म्हणून अंगठा द्यावा लागला होता, पण ग्रंथ गुरु मात्र अंगठे बहाद्दराला भरभरुन ज्ञान देऊन जातो. आध्यात्मिक आणि व्यवहारी ज्ञान, गणित ज्ञान, विज्ञान औषध शास्त्र आयुष्याला दिशा देण्याचे काम करतात.

बडबड गीते, चांदोबा, परिकथा, राक्षस कथा, विक्रम वेताळ, अकबर बिरबल, इसापनीती पासून वाचनाला सुरुवात होते, आणि मग वयानुसार त्यात बदल होत जातात. ख्रिस्ताचे बायबल, मुस्लिमांचे कुराण, शिखांचे ग्रंथ साहिब आणि हिंदुचे रामायण, महाभारत, भगवद्गीता किती किती म्हणून गुरु ग्रंथ आहेत. ते जसे चांगले काय करायचे तसे वाईट काय करु नये हे एकाच वेळी शिकवतात.

महाभारतात कर्णासारखे दानशूर, मित्रनिष्ट असावे हे सांगतानाच, निव्वळ मित्र प्रेमापोटी द्रौपदी सारख्या परस्त्रीचा अर्वाच्च शब्द वापरुन, भर सभेत अपमान करणे सर्व नाशास कारण ठरते या वरही प्रकाश टाकते... रुप गर्विता द्रौपदीने कर्णाचा लग्न मंडपात केलेला आणि दुर्योधनाचा मयसभेत अपमान हा तिच्या वस्त्रहरण होण्यास कारणीभूत झाला होता. ही तिची महान चूक महाभारत घडण्यास जेवढी कारणीभूत होती तेवढीच घरातील मोठ्या, कर्त्या लोकांनी डोळ्यावर पट्टी बांधली तर त्या घरात महाभारत हे होणारच. ही शिकवण त्यातून दिली आहे. महाभारत वाचताना दुर्योधनाच्या वाईट प्रवृत्तींवर लक्ष केंद्रित करण्यापेक्षा एक बलशाली योध्दा म्हणून बघणे, त्या बरोबरच कानात विष टाकणाऱ्या शकुनी मामामुळे त्याचा कसा शेवट झाला ते बघणे महत्त्वाचे आहे. कुणाचे केव्हा आणि किती ऐकावे याची समज त्यातून दिली आहे. योग्य निर्णय घेताना कुणाशी टक्कर घ्यायची आहे, याचा विचार न करता कर्म करण्याकडे लक्ष ठेवावे. हे कृष्ण अर्जुनाला सांगतो. हा मामा भाचा, हा मामा, हा काका, हा आजोबा, हा गुरु यापेक्षा चुकीच्या माणसाला साथ द्यायची नाही ही शिकवण कुरुक्षेत्रावर

सांगितलेल्या गीतेतून मिळते.

संस्कृत भाषेतील महान साहित्यकार महाकवी कुलगुरु कालिदास याच्या साहित्याशिवाय संस्कृत भाषेचा अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही. मेघदुत ही काव्य रचना, शाकुंतल हे संस्कृत नाटक – महाकाव्य या बद्दल काय सांगावे.

रघुवंशम् यात राम सीता लक्ष्मण दशरथ यांच्या आदर्श वादाचे वर्णन असलेली मानवता सत्यता यांच्या जवळची आहे.

''वाचाल तर वाचाल''

त्याचबरोबर वाचाल तसे वागाल तर आपण चांगले आयुष्य जगू हेच खरे.

**सोनाली धनंजय भूतांबरे**
टी.वाय.बी.एस्सी. (रसायनशास्त्र)

## पर्यावरण संतुलन



पर्यावरण हा शब्द दोन शब्दांची संधी होऊन झालेला आहे. शब्द कोशाप्रमाणे परी म्हणजे सर्व बाजुंनी व आवरण म्हणजे झाकलेले वातावरणाने आपणास सर्व बाजुंनी झाकलेले आहे. हेच ते पर्यावरण या पर्यावरणाचे मुख्य चार घटक आहे.
१) मृदावरण २) जलावरण ३) वातावरण व जीवावरण हे चार असुन त्यांना संलग्न असे काही घटक आहेत, त्यात माती व वनस्पती मुख्य आहेत, कारण वनस्पतीवर जलसंपत्ती अवलंबुन असते. जलसंपत्तीवर भुसंपत्तीचे अस्तित्व असते. जीव सृष्टीचे जीवण सर्वस्वी पर्यावरणारच अवलंबून असते. त्याच्या प्राथतिक गरजाची पूर्तता पर्यावरणातच होते व पर्यावरणातच त्यांचा विकास होतो. निसर्ग हे एक पर्यावरणाचे घर आहे. वृक्ष हे खांब, हवेच्या भिंती व आभाळाचे छत असुन हे पर्यावरण आप, तेज वायु, पृथ्वी आकाश या पंचमहाभुतांच्या संतुलित अविष्कारातुन निर्माण झालेले आहे म्हणून त्यांची व्याख्या अनेक प्रकारे केली जाते.

१) पर्यावरण म्हणजे भुतलावरील जैविक व भौतीक वस्तुंचे संतुलन.

२) मानवाच्या सभोवताली असणारी नैसर्गिक परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय.

३) कोणताही सजीव निर्माण होतो, त्याची वाढ होते व नाश पावते या तीन क्रिया पूर्ण होण्यासाइी ज्या सभोवतालच्या घटकांची गरज असते त्याला पर्यावर असे म्हणतात. सभोवतालची परिस्थिती म्हणजे अनेक सजीव आणि निर्जीव उदा. सजीव, विषाणू, जीवाणू किटक वनस्पती व प्राणी, मानव, दगड, माती, प्राणी, हवा, तापमान इत्यादी हे सर्व नैसर्गिक घटक आणि त्यांच्यातील परस्पर संबंध व अंतर क्रिया यासाऱ्यासाठी पर्यावरण हा शब्द म्हणून वापरला जातो.

आजुबाजुच्या नैसर्गिक आणि कृत्रिम परिस्थितीतून निर्माण होणारे समिश्र परिस्थितीचा जीव सृष्टीवर परिणाम होत असतो त्याला पर्यावरण असे संबोधले जाते. थोडक्यात पर्यावरण म्हणजे वचाातवरणातला साधला जाणारा समतोल होय, पर्यावरण शब्दांत सृष्टीतील विविध पदार्थाचे एकमेकांशी

असणारे संबंध गृहित धरले आहे ते एकमेकावर अवलंबून असणारे परिणाम करणारे विविध घटक म्हणजे पर्यावरण होय.

विद्यार्थी मित्रांनो, या भुतलावर लाखो प्रकारचे वनस्पती व प्राणी आहेत त्यांच्यात सकारात्मक संतुलन असते. हे संतुलन राखण्याचे काम निसर्ग करत असतो. निसर्गातील प्रत्येक सजीवासाठी निसर्गदत्त कर्तव्य आहे. त्याचे पुरक प्रमाणात कार्य चालू असते. तो पर्यंत निसर्गाचे संतुलन व्यवस्थित असते. कुठल्याही कारणाने एखाद्या घटकावर एखादा परिणाम झाला तर त्याचा सर्व परिणाम सर्व जीवसृष्टीच्या वाट्याला येतो. कारण जेथे नैसर्गिकता संपते तेथे प्रदुषण निर्माण होते. असा हा निसर्ग आणि त्यातून निर्माण होणारे पर्यावरणाच्या केंद्रस्थानी मानव आहे. निसर्गातील जमीन, पाणी, हवा, प्रकाश या चार प्रमुख अंगापासुन आपण सर्व प्रकारची सुखे भोगत असतो. म्हणून माणसांच प्राणीमात्राच जीवण या काळ्या मातीशी वरच्या आभाळाशी, झाडांशी, पाण्याशी अतिनिगडित आहे. वरतून पडणारा पाऊस आणि धरती हे सर्व जीव सृष्टीला जगवित असतात, त्याकरिता विनाशा खेरीज विकास साधावा लागेल. पृथ्वी तलावर प्रत्येक सजीवाच्या अस्तित्वाचे ठरावीक महत्त्व आहे. वास्तविक पाहता मानवाचा जगण्याचा जेवढा अधिकार निसर्गावर आहे, तेवढाच किंबहूना त्यापेक्षा अधिक अधिकार प्राणीमात्राचा आहे.

मानवाने स्वत:च्या सुखसोयीसाठी निसर्ग नियमाचा विचार केला नाही, निसर्ग निर्मीती होत असताना त्यात निर्माण करण्यात आलेल्या सर्व घटक एकमेकावर कसे अवलंबून आहेत, हे पाहण्यासाठी निसर्ग ग्रंथ समजावून घेणे खुप महत्वाचे आहे. कारण या विश्वातील प्रत्येक घटक निसर्ग ग्रंथातील अक्षर आहे, तात्पर्य असे की, पर्यावरणाचे संतूलन या वाक्य प्रकाराची व्याप्ती म्हणजे मानव आणि तिच्या अवती भोवती असणाऱ्या निसर्ग यांच्या परस्परावलंबीत्वाची जाणीव ठेवणे होय, त्याच्यामधील समतोल कायमचा ढासळत जाणार नाही, त्याबद्दल प्रयत्न करीत राहणे हे मला योग्य वाटते.

विद्यार्थी मित्रहो वने ही मानवाच्या अगोदर अस्तित्वात आली यापूर्वी आदि मानवाचे संपूर्ण जीवण हे वनावरच अवलंबुन होते मानवाला अन्न, वस्त्र, निवारा वनाने पुरविला व मानवाने स्वत:च्या प्रगतीसाठी वापरलेली साधनसंपत्ती वनक्षेत्रातुनच उपलब्ध करुन घेतली म्हणुन मानवाचे निसर्गाशी पूर्वापार अतुट नाते आहे. मानव हा एक निसर्गाचा अविभाज्य घटक आहे.

मानवी उत्क्रांतीचा इतिहास पुढे-पुढे सरकत जाऊन ओसाड-उजाड आणि पर्यावरणाचे संतुलन हरवून बसलेल्या संस्कृती पर्यंत आला आहे. त्यामुळे निसर्गाचे संतुलन राखणे व पर्यावरणाचे रक्षण करणे आवश्यक बाब झाली आहे. म्हणुन मानव जातीने शास्त्रांची मर्यादा मोडु नये. या निसर्गाची वाट मोडू नये कारण जेथे विज्ञानाची हद्द संपते तिथे निसर्गाची हद्द सुरु होते. वरील विषयास अनुसरुन मी माझ्या मनातील निसर्गावरील, पर्यावरणावरील संतुलन व संवर्धन याबद्दल मी माझे मत मांडण्याचा प्रयत्न केला आहे तरी मी माझी छोटीसी वाक्यरचना इथेच थांबवतो.

पर्यावरण संतुलन व संवर्धन ...!

**वैष्णवी बाळासाहेब बोऱ्हुडे**
टी.वाय.बी.एस्सी. (रसायनशास्त्र)



# पार

पार रात्रंदिवस माणसांच्या वरदळीने गजबजलेला असे. गावातील जनतेचा सुखदु:खात तो साक्षीदार असे. हा पार गावातील अनेक गोष्टीचा साक्षीदार असे. गावातील यात्रेच्या निमित्ताने होणाऱ्या तमाशाचा फड असेल, धार्मिक सप्ताह निमित्ताने होणारा प्रवचन कीर्तनाचा कार्यक्रम असेल, निवडणुकीमध्ये होणाऱ्या राजकीय पक्षांच्या सभा असो, गावातील ग्रामसभा असो हे सर्व कार्यक्रम गावातील मध्य ठिकाणी असणाऱ्या पारावरच होत असत. पार हे गावातील आणि ग्रामीण जनतेच्या जीवनातील एक संदेश वहन करणारा अविभाज्य घटक आहे.

